CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, १४ नोव्हेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ७ | पाने १२ | किंमत रु. ६/-


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

दर्बी
क्लॉथ मार्केट
(नवी पेठ)
सुटींग, शर्टिंग, लिनन, खादी, कॉटन, सिल्क
प्रीमियम व एक्सक्लुझिव्ह शुटिंग आणि शर्टिंग साठी एकदा आवश्य भेट द्या...!
१०६, गोल्डफिंच पेठ, (नवी पेठ), सोलापूर - ४१३००७
9422459645 | 9130008644

## विनम्र अभिवादन



स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांची आज जयंती.



क्रांतिवीर लहुजी साळवे यांची आज जयंती



चाळीसगाव विधानसभा मतदारसंघातील प्रचारसभेत अमित शाह यांचा असा पारंपरिक पद्धतीने सत्कार करण्यात आला

# वक्फचा कायदा बदलणारच

## अमित शाह यांचा राहुल गांधींवर हल्लाबोल

**मुंबई, १३ नोव्हेंबर**

केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे नेते अमित शाह यांनी वक्फ बोर्ड कायद्याच्या मुद्यावरून राहुल गांधींना थेट आव्हान दिले आहे. राहुल गांधी, कान उघडे ठेऊन ऐका, 'डंके की चोट पर' पंतप्रधान नरेंद्र मोदी वक्फचा कायदा बदलणार. आता तुम्ही कुणाच्याही भूमीवर कब्जा करू शकणार नाही, अशा शब्दांत अमित शाह यांनी धुळे येथे बुधवारी झालेल्या प्रचारसभेला संबोधित करताना राहुल गांधी यांना आव्हान दिले. अमित शाह यांची राज्यात अनेक ठिकाणी आज सभा झाली.

या देशात, अनेक लोक वक्फ कायद्यामुळे त्रस्त आहेत. नुकतेच कर्नाटकात, तेथील वक्फ बोर्डाने निर्णय केला की, अनेक गावे, संपूर्ण वक्फची संपत्ती आहेत. चारशे-चारशे वर्षांची जुनी मंदिरेही वक्फची संपत्ती झाली, शेतकऱ्यांची शेतीही वक्फची संपत्ती झाली आणि लोकांची घरेही वक्फची संपत्ती झाली. मला सांगा हा वक्फचा कायदा बदलायला हवा की नको? जनतेतून आवाज आला 'हो...'. आमची बदलायची इच्छा आहे, एक विधेयक घेऊन आलो आहोत. पण, राहुल गांधी आणि पवार विरोध करत आहेत, असे अमित शाह म्हणाले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी लक्षात ठेवावे की, त्यांची चौथी पिढी आली तरी मुस्लिमांना एससी, एसटी आणि ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण देऊ शकणार नाही, असा हल्लाबोल शाह यांनी केला.

काही दिवसांपूर्वी उलेमांनी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षांची भेट घेतली आणि मुस्लिमांना आरक्षण देण्याची मागणी केल्याचे शाह यांनी सांगितले. *(तभा वृत्तसेवा)*

### उद्धव ठाकरेंवर प्रश्नांचा भडिमार


या सभेत अमित शाह यांनी उद्धव ठाकरे यांना बोचरे प्रश्न विचारले. उद्धवबाबू, तुम्ही औरंगाबादचे संभाजीनगर असे नामकरण करण्यास विरोध करणाऱ्यांसोबत बसलात, ज्यांनी राममंदिर उभारणीला विरोध केला, तिहेरी तलाक रद्द करण्यास विरोध केला, ज्यांनी कलम ३७० निष्प्रभ करण्यास विरोध केला, ज्यांनी सर्जिकल स्ट्राईकला विरोध केला आणि जे हिंदूंना दहशतवादी म्हणाले त्यांच्यासोबत तुम्ही गेलात, असा प्रश्नांचा भडिमार अमित शाह यांनी उद्धव ठाकरेंवर केला.




## महत्त्वाचे

### बाजारांत घसरणीचे सत्र कायमच

**मुंबई** : मागील आठवड्यापासून देशांतर्गत शेअर बाजारात सुरू असलेले घसरणीचे सत्र बुधवारीही कायम होते.



बाजार बंद होताना निर्देशांकात ९८४ अंकांची मोठी आणि निफ्टीतही ३२४ अंकांची घसरण झाली. मुंबई शेअर बाजारातील घसरणीमुळे कंपन्यांचे बाजार भांडवल ६.८ लाख कोटी रुपयांनी घसरून ४३०.४५ लाख कोटी रुपयांवर आले. किरकोळ महागाई दरातील वाढ, कंपन्यांचे कमकुवत तिमाही निकाल, विदेशी गुंतवणूकदारांकडून शेअर्स विक्रीचा सपाटा, डॉलरमधील वाढ या सर्व कारणांमुळे बाजारात विक्रीचा दबाव दिसून आला. महिंद्राच्या शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण नोंदविण्यात आली.

### नितीन गडकरी यांची आज नळदुर्ग येथे सभा

**अणदूर** : केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची तुळजापूर विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ आज सकाळी १० वाजता नळदुर्ग येथील अक्कलकोट रोडवरील मरीआई मैदानात ही सभा होणार आहे. या सभेस नागरिक बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपाच्या वतीने करण्यात आले आहे. सभेची सर्व तयारी पूर्ण झाली असून नळदुर्ग परिसरातील ग्रामीण भागातून हजारो मतदार ही सभा ऐकण्यासाठी व आपल्या मतदारसंघात विकासाचे वारे वेगाने वाहण्यासाठी प्रयत्न करणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी येणार आहेत.



### मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाची मोठी घोषणा

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने महाविकास आघाडीला पाठींबा जाहीर केला आहे. मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते सज्जाद नोमानी यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत याबद्दलची माहिती दिली. मविआच्या २६९ उमेदवारांना पाठिंबा जाहीर करण्यात आलेला आहे. याशिवाय बोर्ड वंचित, एमआयएम, सपा, बविआसह अपक्ष उमेदवारांनादेखील पाठींबा देणार आहे. संविधानाच्या रक्षणासाठी महाविकास आघाडीला पाठिंबा देत असल्याची घोषणा सज्जाद नोमानी केली.

### अरविंदरसिंग साहनी होणार 'आयओसी'चे अध्यक्ष

**नवी दिल्ली** : देशातील सर्वांत मोठी तेल कंपनी इंडियन ऑईल कॉर्पोरेशन अर्थात् आयओसीच्या अध्यक्षपदी अरविंदरसिंग साहनी यांची नियुक्ती करण्यात आली. साहनी सध्या आयओसीचे कार्यकारी संचालक आहेत. ऑगस्टमध्ये त्यांची व्यवसाय विकासासाठी कंपनीचे संचालक म्हणून निवड झाली होती. साहनी यांना त्यांच्या पदभार स्वीकारल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी आयओसीच्या अध्यक्षपदावर नियुक्त करण्याच्या मंत्रालयाच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने मान्यता दिली आहे.

# योग्य कारणाशिवाय 'बुलडोझर' कारवाई नाही

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**नवी दिल्ली, १३ नोव्हेंबर**

घर बांधणे हा मूलभूत अधिकार आहे. एखाद्या निर्दोष व्यक्तीला त्याच्या घरापासून वंचित ठेवणे पूर्णपणे घटनाबाह्य आहे, असे स्पष्ट करीत पंधरा दिवसांची नोटीस दिल्याशिवाय कोणतीही मालमत्ता पाडता येणार नाही, असा आदेश बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने दिला.

बुलडोझर याचिकेवर न्यायालयाने बुधवारी नाराजी व्यक्त केली आहे. न्यायालयाने सर्व राज्यांना निर्देश देत कडक शब्दांत सुनावले. केवळ आरोपी आहे म्हणून घर पाडता येत नाही, खटला चालवल्याशिवाय कोणालाही दोषी ठरवता येत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाने देशातील सर्व राज्यांसाठी मालमत्ता पाडण्यासंदर्भातील ही मार्गदर्शक तत्त्वे मांडली असल्याचे स्पष्ट केले आहे.

प्रशासन न्यायाधीश होऊ शकत नाही. बेकायदेशीरपणे घर पाडले असल्यास नुकसान भरपाई द्यावी. बेकायदेशीर कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर पहिले कारवाई झाली पाहिजे. राज्य आणि त्याचे अधिकारी मनमानी आणि अतिरेकी



उपाययोजना करू शकत नाहीत, असे न्यायालयाने म्हटले.

राज्य किंवा प्रशासनाला एखाद्या व्यक्तीला दोषी घोषित करू शकत नाही आणि न्यायाधीश बनू शकत नाही आणि आरोपी व्यक्तीची मालमत्ता पाडण्याचा निर्णय घेऊ शकत नाही. मालमत्तेच्या मालकाला १५ दिवसांची पूर्वसूचना दिल्याशिवाय कोणतीही इमारत पाडू नये, असा निर्देश न्यायालयाने दिला.

### सामान्य नागरिकांसाठी घर जिव्हाळ्याचा विषय

असतो, असे सांगून सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, एका सामान्य नागरिकासाठी घर बांधणे ही अनेक वर्षांची मेहनत, स्वप्ने आणि आकांक्षा यांचा कळस आहे. कुटुंबासाठी घर सुरक्षितता आणि भविष्याची सामूहिक आशा मूर्त रूप देते. रात्रभर महिला, मुले रस्त्यावर पाहणे हे आमच्यासाठी योग्य दृश्य नाही. जर राज्य किंवा प्रशासनाने आरोपीचे घर काढून टाकले गेले, तर अधिकाऱ्यांवर कारवाई करणे हा एकमेव मार्ग असेल, असे देखील न्यायालयाने स्पष्ट केले. *(वृत्तसंस्था)*

# झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यात ६५ टक्के मतदान

## लोहरदग्यात सर्वाधिक ७३.२१ टक्के

**रांची, १३ नोव्हेंबर**

नक्षलग्रस्त राज्य म्हणून ओळख असलेल्या झारखंडमध्ये बुधवारी लोकांनी मोठ्या संख्येने घराबाहेर पडून मतदानाचा हक्क बजावला. पहिल्या टप्प्यात १५ जिल्ह्यांत ४३ विधानसभा मतदारसंघांसाठी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ६५.२७ टक्के लोकांनी मतदान केले आणि आमचा लोकशाहीवर विश्वास असल्याचे सिद्ध केले. २०१९ च्या तुलनेत (६३.७५ टक्के) या निवडणुकीत जास्त मतदान झाले.

लोहरदगा जिल्ह्यात ७३.२१ टक्के मतदान झाले, तर हजारीबाग जिल्ह्यात सर्वांत कमी ५९.१३ टक्के मतदान झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

इतर जिल्ह्यांत सरायकेला - खरसावन (७२.१९), गुमला (६९.०१), सिमडेगा (६८.६६), खुंटी (६८.३६), गढवा (६७.३५), लातेहार (६७.१६), पश्चिम सिंगभूम (६६.८७), रामगढ (६६२), पूर्व



सिंगभूम (६४.८७), चत्रा (६३.२६), पलामू (६२.६२), कोडरमा (६२), रांची (६०.४९) आणि हजारीबाग (५९.१३) टक्के मतदान झाले.

पहिल्या टप्प्यात माजी मुख्यमंत्री चम्पई सोरेन आणि माजी खासदार गीता कोडा यांच्यासह ६८३ उमेदवार रिंगणात होते.

झारखंडचे राज्यपाल संतोष कुमार गंगवार यांनी रांची येथील एटीआय मतदान केंद्रावर मतदान केले.

आज झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी मतदानाचा पहिला टप्पा आहे. मी सर्व मतदारांना मतदानाचा संवैधानिक अधिकार बजावण्याचे आवाहन करतो. लक्षात ठेवा, आधी मतदान करा आणि मग नाश्ता करा! असे संतोष कुमार गंगवार म्हणाले.

मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनीही निवडणुकीत लोकांना समर्थन मागितले. 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये ते म्हणाले की, जर तुम्हाला आमचे काम आवडले असेल तर कृपया आम्हाला पाठिंबा द्या.

दिवसभरात, ओडिशाचे राज्यपाल रघुबर दास, राज्याचे आरोग्य मंत्री बन्ना गुप्ता, माजी मुख्यमंत्री चम्पई सोरेन आणि जमशेदपूर पश्चिम मतदारसंघातील जदयू उमेदवार सरयू रॉय यांनी विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात मतदान केले.

दुसऱ्या टप्प्यातील मतदान २० नोव्हेंबरला होणार असून, २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, सर्व मतदारांना लोकशाहीच्या या उत्सवात पूर्ण उत्साहाने मतदान करण्याचे आवाहन केले. *(वृत्तसंस्था)*

# विधानसभेच्या ३१ जागांवरील पोटनिवडणूकीसाठी झाले मतदान

## अनेक बुथवर सायंकाळी ५ नंतरही मतदारांच्या रांगा

**नवी दिल्ली, १३ नोव्हेंबर**

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची धामधूम सुरू असतानाच बुधवारी १० राज्यांच्या ३१ विधानसभा जागांसाठी पोटनिवडणुका झाल्या. तसेच केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघात मतदान झाले. येथे ६०.७९ टक्के मतदान झाले. येथे काँग्रेस नेत्या प्रियांका वाढरा निवडणूक लढत आहेत.

**वायनाड लोकसभेत ६०.७९ टक्के मतदान**

सिक्कीमच्या दोन जागांवर सिक्कीम क्रांतिकारी मोर्चाचे दोन्ही उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. लोकसभा निवडणुकीत १० राज्यांतील ३१ विधानसभा जागांपैकी २८ आमदार लोकसभेत खासदार म्हणून निवडून आले. याशिवाय दोघांचा अकाली मृत्यू आणि एकाचा पक्ष बदलल्यामुळे पोटनिवडणूक होत आहे. त्यापैकी १८ जागा विरोधकांकडे तर ११ जागा एनडीएकडे होत्या.

निवडणूक आयोगाच्या योजनेनुसार, वायनाड लोकसभा आणि १० राज्यांतील ३१ विधानसभा जागांवर होत झालेल्या पोटनिवडणुकीत अधिकृतपणे संध्याकाळी ५ वाजता मतदान संपले. मात्र, अनेक बुथवर सायंकाळी पाचनंतरही मतदारांच्या रांगा लागल्या होत्या.

काँग्रेसशासित कर्नाटक, भाजपशासित मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्येही मतदान झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गृहराज्य गुजरातमधील विधानसभेच्या जागेवरही निवडणूक झाली. *(वृत्तसंस्था)*

# एकनाथ शिंदे, अजित पवार, फडणवीस यांच्याही बॅगची तपासणी

**मुंबई, १३ नोव्हेंबर**

निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रातील पालघरमधील कोलगाव हेलिपॅडवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सामानाची तपासणी केली. अधिकाऱ्यांनी शिंदे यांची बॅग, ब्रीफकेस व इतर सामानाची तपासणी केली. त्याची व्हिडिओग्राफीही करण्यात आली.



शिंदे अधिकाऱ्याला म्हणाले- कपडे आहेत.. अधिकाऱ्याने होकारार्थी मान हलवली. यानंतर शिंदे म्हणाले- कपडे आहेत, युरिन पॉट वगैरे नाही. शिंदे यांची ही टिप्पणी म्हणजे उद्धव यांच्या वक्तव्याला लगावलेला टोला मानला जात आहे.प्रत्यक्षात ११ आणि १२ नोव्हेंबरला हेलिपॅडवर उद्धव ठाकरेंच्या सामानाचीही दोनदा तपासणी करण्यात आली. त्यानंतर उद्धव यांनी त्याचा व्हिडिओ शेअर केला होता, ज्यामध्ये ते म्हणतात- माझी बॅग तपासा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही माझे युरिन पॉटदेखील तपासू शकता, परंतु आता मला तुमचा मोदींची बॅग तपासतानाचा व्हिडिओ देखील हवा आहे. तेथे शेपूट वाकवू नका. शिंदे यांच्याशिवाय बुधवारी पुण्यात केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हेलिकॉप्टरचीही तपासणी करण्यात आली. यापूर्वी मंगळवारी लातूरमध्ये नितीन गडकरी यांची बॅग निवडणूक आयोगाने तपासली होती. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या दोघांच्याही हेलिकॉप्टरची नुकतीच तपासणी करण्यात आली आहे. फडणवीस यांच्या हेलिकॉप्टर तपासणीचा व्हिडिओही भाजपने आजच जारी केला.

# घड्याळ चिन्ह गोठवणार नाही; शरद पवार गटाला 'सुप्रीम' झटका

**नवी दिल्ली, १३ नोव्हेंबर**

घड्याळ चिन्ह गोठवण्यात यावे, अशी याचिका दाखल करीत शरद पवार गटाने केलेली मागणी सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी फेटाळली आहे. त्याऐवजी अजित पवार गटाने एक परिपत्रक काढून त्यात उमेदवार आणि कार्यकर्त्यांना शरद पवारांचे फोटो व चित्रफिती वापरू नका, अशा सूचना देण्याबाबत न्यायालयाने सांगितले. तुम्ही स्वतंत्र पक्ष म्हणून लढा, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

तुम्ही दोघांनी आपापल्या युद्धभूमीवर लक्ष केंद्रित करा. व्हिडीओ वगैरेचा कधी-कधी प्रभाव पडतो. दरवेळी मतदारांना प्रभावित करेल असे नाही. आपल्या देशातील जनता खूप हुशार आहे, त्यांना कोणी फसवू शकत नाही, असे न्यायासनाने म्हटले. अजित पवारांना घड्याळाऐवजी दुसरे चिन्ह देण्यात



यावे, अशी मागणी शरद पवार गटाने केली होती. गेल्या सुनावणीत घड्याळ चिन्ह न्यायप्रविष्ट असल्याची जाहिरात अजित पवारांनी वर्तमानपत्रात द्यावी, असा निर्देश न्यायालयाने दिला होता.

सुनावणीवेळी अजित पवार गटाने न्यायालयाचा निर्देश पाळला असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. आम्ही बारामतीत फिरवत असलेल्या गाड्यांवर हा मुद्दा न्यायप्रविष्ट असल्याविषयीची जाहिरात दिली आहे, असे अजित पवार गटाच्या वकिलांकडून सांगण्यात आले.

यावेळी न्यायालयात अजित पवार आणि शरद पवार गटाच्या वकिलांमध्ये खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाले. घड्याळ चिन्ह गोठवण्याच्या मागणीवर अजित पवारांचे वकील म्हणाले की, कोणताही संभ्रम उरलेला नाही. हे कशाच्या आधारावर इथे अर्ज घेऊन आले? आम्ही न्यायप्रविष्ट प्रकरण असल्याचा मजकूर सर्वत्र प्रसिद्ध केला आहे, आज आम्ही पुरावे सादर केले आहे.

यावर शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी जोरदार हल्ला चढवला. हे स्वतः विरोधाभासी भूमिका मांडत आहेत. यांना शरद पवारांचे 'गूडविल' वापरायचे आहे. अमोल मिटकरी यांनी एक्सवर नुकत्याच केलेल्या पोस्टमध्ये शरद पवारांचा उल्लेख आहे. ग्रामीण भागातील मतदार एक्स वगैरे खरेच पाहतात का? ग्रामीण भागात दिल्लीतील घडामोडींचाही परिणाम होतो, असे सिंघवी यांनी म्हटले.

# पंतप्रधान मोदी यांची आज मुंबई, नवी मुंबईत सभा

**मुंबई, दि.१३ नोव्हेंबर:**

विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार शिगेला पोहोचला असताना गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मुंबई व नवी मुंबई येथे दोन जाहीर सभा होत आहेत दुपारी तीन वाजता खारघर येथील तळोजा मैदानावर तर सायंकाळी साडेसहा वाजता मुंबईत दादर येथील शिवाजी पार्कवर सभा होणार आहे.



दोन्ही सभांना प्रचंड गर्दी होणार असल्याने उद्या दोन्ही ठिकाणच्या वाहतुकीच्या मार्गात मोठे बदल करण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराची मुदत आता अवघ्या काही दिवसावर येऊन ठेपली आहे त्यानिमित्त सर्वच राजकीय पक्षांनी प्रचारासाहेबांचा धडाका सुरू केला आहे पंतप्रधान मोदी यांनी राज्यात अनेक ठिकाणी सभा घेतल्या असून गुरुवारी मुंबई व नवी मुंबईत माहितीच्या उमेदवारांसाठी सभा घेणार आहेत. यावेळी ते विरोधी म हाविकास आघाडीवर ते कसा प्रहार करतात, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता लागून राहिलेली आहे. मुंबई महानगरातील महायुतीच्या सर्व ३६ उमेदवारांसाठी शिवाजी पार्कवर घेण्यात येत असून या ठिकाणी भाजपा व घटक पक्षाकडून मोठ्या प्रमाणात शक्ती प्रदर्शन करण्यात येणार आहे त्यानिमित्य त्यामुळे सभेला मोठ्या संख्येने कार्यकर्ते जमा होतील असा अंदाज असल्याने पोलिसांनी ओरिसा बंदोबस्त बुधवारी रात्रीपासूनच तैनात केला आहे .शिवाजी पार्कच्या सभेपूर्वी दुपारी तीन वाजता नवी मुंबईत खारघर येथे सभा होणार आहे ठाणे ,रायगड व पालघर जिल्ह्यातील महायुतीच्या उमेदवारांसाठी ही सभा घेण्यात येणार आहे. नवी मुंबईतील वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आले आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# काही नेत्यांना तमाशा करण्याची सवय

## भाजपचा उद्धव ठाकरेंना टोला

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१३ नोव्हेंबर-**

जाऊ द्या काही नेत्यांना तमाशा करण्याची सवयच असते .उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बॅगची तपासणी झाली. पण, त्यांनी ना कोणता व्हीडिओ काढला, ना कोणती आगपाखड केली, अशा शब्दात भाजपा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे.

फडणवीस यांच्या बॅगेची तपासणी झाल्याच्या व्हिडिओ भाजपाकडून ट्विट करण्यात आला आहे. त्यासोबत म्हटले आहे की, ७ नोव्हेंबरला यवतमाळ जिल्ह्यात आमचे नेते देवेंद्रजी फडणवीस यांच्या बॅगची तपासणी झाली. पण, त्यांनी ना कोणता व्हीडिओ काढला, ना कोणती आगपाखड केली. तत्पूर्वी, ५ नोव्हेंबर रोजी कोल्हापूर विमानतळावर सुद्धा फडणवीस यांच्या बॅग्जची तपासणी झाली होती.दिखाव्यासाठी केवळ संविधान हाती घेऊन चालत नाही, तर संवैधानिक व्यवस्थाही पाळाव्या लागतात. संविधानाचे भान प्रत्येकाला असलेच पाहिजे, एवढीच आमची विनंती आहे. असेही त्यात म्हटले आहे.

# अॅड. राजेश कांबळे खून खटल्यास पुन्हा सुरुवात

## दोन साक्षीदारांनी नोंदवली साक्ष

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि, १३ नोव्हेंबर-**

अॅड. राजेश श्रीमंत कांबळे (वय ४५ राहणार ४३, ब्रह्मचैतन्य नगर नवीन आर टी ओ सोलापूर) याचा खून केल्याप्रकरणी आरोपी संजय उर्फ बंटी महादेव खरटमल, अॅड सुरेश तारू चव्हाण व श्रीनिवास महांकाळी येलदी यांच्यावर भरलेल्या खटल्याच्या सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश जे.जे.मोहिते यांच्यासमोर सुरू झाला.

यात हकीकत अशी की, दिनांक ८ जून २०१९ रोजी यातील मयत अॅड राजेश कांबळे हा सकाळी अकरा वाजेचे सुमारास पक्षकारांना भेटून एका तासाने परत येतो असे त्याच्या पत्नीस सांगून त्याच्या घरातून मोटरसायकलवर निघून गेला होता. त्यानंतर त्याच्या पत्नीने दुपारी बाराच्या सुमारास फोन लावला असता मयत राजेश याने मी बंटीच्या घरी आहे केस संदर्भात चर्चा चालू आहे असे सांगितले .त्यानंतर त्याची पत्नी त्याचा भाऊ यांनी फोन लावला असता मयत राजेश याचा फोन बंद लागत होता. रात्री शोधा शोध केली तरी मयत राजेश कांबळे हा मिळून आला नाही. त्यावर पोलिसांकडे तक्रार देण्यात आली होती. तपासादरम्यान यातील आरोपी बंटी खरटमल याच्यावर संशय बळावला तसेच पोलिसांना बंटी खरटमल याच्या घरातून दुर्गंधी येत असल्याचे दिसून आले. त्यावेळी पोलिसांनी घराचे कुलूप तोडून आत पाहिले असता मयत राजेश कांबळे याचे हात, पाय,धड व मुंडके हे तोडून दोन प्लास्टिक बॅगेत भरलेले दिसून आले. त्यावर पोलिसांनी खुनात सहभाग असलेले वरील तिन्ही आरोपींना अटक करून त्यांच्याविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले होते. खटल्याच्या सुनावणीच्या वेळी आज रोजी दोन साक्षीदारांनी साक्षी नोंदविली. त्यात साक्षीदार आनंद निवृत्ती माने याने त्याच्या साक्षीमध्ये आरोपी बंटी खरटमल याने त्याच्याकडून हातउसने घेतलेले २५ हजार - रुपये परत केले, अशी महत्वपूर्ण साक्ष नोंदविली. त्यानंतर पंच साक्षीदार किरण सुभाष भोसले याने साक्ष नोंदविताना आनंद निवृत्ती माने यास आरोपी बंटी खरटमल याने घेतलेले हातउसने पैसे परत केले, त्या रक्कम रुपये २५ हजार रुपयाचा पंचनामा करून त्या नोटा जप्त केला त्याबाबतची महत्त्वपूर्ण साक्ष नोंदविली. आरोपींच्या वकिलांनी घेतलेल्या उलट तपासात साक्षीदारांनी नकारात्मक उत्तरे दिली. या खटल्याची पुढील सुनावणीस १४ नोव्हेंबर ही तारीख नेमण्यात आली.

या खटल्यात विशेष सरकारी वकील अॅड. उज्वल निकम, मूळ फिर्यादीतर्फे अॅड.मिलिंद थोबडे अॅड.विनोद सूर्यवंशी तर आरोपी नंबर १तर्फे अॅड राजेंद्र फताटे आरोपी नंबर २ तर्फे अॅड नागराज शिंदे आरोपी नंबर ३ तर्फे अॅड जयदीप माने हे काम पाहत आहेत.

# जोगेश्वरीत शिवसेनेच्या दोन्ही गटात राडा

## पैसे वाटत असल्याच्या आरोपावरून दगडफेक; गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१३ नोव्हेंबर -**

मतदारांना पैसे वाटत असल्याच्या आरोपावरून जोगेश्वरी येथील मातोश्री क्लब समोर शिवसेनेच्या दोन्ही गटाच्या समर्थकांमध्ये मंगळवारी रात्री तुफान राडा झाला. शिवीगाळ करीत मारहाण व दगडफेक करण्यात आली. पोलिसानी सोमी लाठीमार करीत समर्थकांना बाजूला हटवल्याने पुढचा अनर्थ टळला. याबाबत पोलीस ठाण्यात दोन्ही बाजूकडून गुन्हे दाखल करण्यात आले असून परिसरात तणावाचे वातावरण आहे.

जोगेश्वरी मतदारसंघात खासदार रवींद्र वायकर यांच्या पत्नी मनीषा वायकर या शिंदे गटाच्या उमेदवार आहेत. जोगेश्वरीमध्ये मंगळवारी रात्री मातोश्री क्लबमध्ये त्यांच्या समर्थकांकडून मतदारांना देण्यासाठी पैशाचे वाटप करण्यात येत आहे अशी माहिती ठाकरे गटाच्या समर्थकांना मिळाले त्यानुसार मोटरसायकल वरून तीन मोटरसायकल वरून ते तिथे गेले व मोबाईल वरून शूटिंग घेऊ लागले त्याला शिंदे गटाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी आक्षेप त्याचा मोबाईल काढून घेतला त्यामुळे त्याच्यात वादावादी झाले दोन्ही बाजूचे समर्थक जमून एकमेकावर शिवीगाळ करू लागले. त्यामुळे मातोश्री क्लबबाहेर मोठ्या संख्येने जमाव जमा झाल्याने रस्त्यावर वाहतुकीची कोंडी झाली. पोलिसांनी हस्तक्षेप करीत दोन्ही बाजूच्या समर्थकांना बाजूला काढले.याबाबत नागरिकांना नाहक त्रास दिल्याप्रकरणी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. दुसऱ्या गुन्ह्यात शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार मनिषा वायकरांच्या महिला कार्यकर्त्यांच्या गाडीचा पाठलाग करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिसऱ्या गुन्ह्यात ठाकरे गटांच्या कार्यकर्त्यांकडून शिवसेना शिंदे गटाच्या महिला कार्यकर्त्यांना धक्काबुक्की झाल्यामुळे विनयभंगाचा गुन्हा देखील चार ते पाच कार्यकर्त्यांवर दाखल करण्यात आला आहे. या राड्यामध्ये सध्या जोगेश्वरीमध्ये तणावाचे वातावरण आहे. सध्या मातोश्री क्लबबाहेर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# निवडणुकीच्या कामकाजात महसूल सेवक अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि १३ नोव्हेबर-**

निवडणूक आयोगाने निवडणुका घोषित करताच अक्कलकोट तहसील प्रशासनाने जोरदार तयारी सुरु केली असून महसूल विभागाचे कान, नाक, डोळे, समजले जाणारे महसूल सेवक हे हिरहिरीने निवडणुकीचे काम करताना पाहायला मिळत आहेत. अक्कलकोट चे तहसीलदार विनायक मगर यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सहायक, यांच्या समवेत हाती पडेल ते काम हे महसूल सेवक पूर्ण करण्याचे काम करत आहेत. शिवाय महसूल सेवक हा निवडणुकीच्या कामकाजात अतिशय तरबेज असून, CU, BU, VVPT पेरिंग करणे, एम-३ बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व व्हीव्हीपॅड, मशीन वापर,निवडणुकीतील नवीन कायदे, तरतुदी व अध्यावत सूचना, पोस्टल मतदान, व निवडणूक कार्य प्रमाणपत्र, मशीन सिलिंग, व व्हीव्हीपॅडची डूज अॅड डोन्ट्स, संकलन केंद्र, स्ट्रॉंग रूम मधून पेट्या बाहेर काढणे, ठेवणे, मतदान पूर्व, मतदान दरम्यान, मतदान समाप्तीवेळी करावयाची कामे ,मतदान याद्या बाणफुली शिक्का, तसेच साहित्याचे काम, मतदार व मतदानाकरिता लागणाऱ्या सर्व बाबी ह्या त्यांना नेहमीच्या असल्याने त्यांना निवडणूकिचे कामकाज करणे अगदी सोयीचे ठरत असल्याचे . पाहायला मिळत आहे.



विधानसभा निवडणुकीच्या कामकाजात तालुका अध्यक्ष शपीक वाडीकर जिल्हाध्यक्ष विठ्ठल गुरव, रेवण सुतार, प्रविणकुमार बाबर,शिवानंद कोळी सुनील मुलगे, दीपक कांबळे सोमनाथ आलुरे , जाकीर कागदे, वीरभद्र आकाश घंटे स्वामी, दत्ता कोळी, फिरोज तांबोळी ,हनुमंत सानप, सैपन पठाण,स्वामीनाथ जमादार महादेव, अर्जुन सनके, जगदीश देसाई, चांगदेव चव्हाण,चंद्रकांत तळवार, सुचिता काळे,अनिल जमादार,प्रवीण गुंजले, सूर्यकांत रामपुरे, ममता कोळी, श्रीमंत कोळी, मल्लिनाथ कळशेट्टी, सोमनाथ जमादार, काशिनाथ माने, चौडप्पा कुंभार, राजेंद्र पाटील, रेणुका कुंभार, बाबू कोरबू, शिवशरण कोळी, यांच्यासह तालुक्यातील ५२ महसूल सेवकांचे कामकाज युद्धपातळीवर सुरु आहे.




# अति. मुख्य कार्यकारी अधिकारी कोहिनकर यांची सांगोला विधानसभा मतदारसंघात भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. १३ नोव्हेंबर-**

सांगोला विधानसभा मतदारसंघात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी भेट देऊन पंचायत समितीमध्ये शिक्षण, आरोग्य, आयसीडीएस, बांधकाम, पाणीपुरवठा, लपा या विभागातील खातेप्रमुखांची विधानसभा निवडणूक कामी सभा घेऊन विधानसभा अंतर्गत मूलभूत सुविधांचा आढावा घेतला.

पिण्याचे पाणी, महिला व पुरुष यांच्यासाठी स्वतंत्र शौचालय व्यवस्था, हिरकणी कक्ष, लाईट व्यवस्था, फर्निचर याविषयी सुचना दिल्या. त्यानंतर जि.प.शाळा पुजारवाडी व ग्रामपंचायत मेडशिंगी येथील मतदान केंद्राची पाहणी केली. यावेळी मतदानाचा टक्का वाढवणे व तालुक्यातील सर्वच मतदान केंद्रे आदर्श मतदान केंद्र करणे याबाबत सक्त सूचना त्यांनी दिल्या. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. संदीप भंडारे, बांधकाम विभाग उपअभियंता बाळासाहेब नकाते, पाणीपुरवठा विभाग उपअभियंता सेनापती केदार, विस्तार अधिकारी अमोल तोडकरी उपस्थित असल्याचे मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी सांगितले.

# दक्षिण तालुक्याचा कायापालट करणार : युवराज राठोड

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १३ नोव्हेंबर -**

विद्यमान आमदारांनी दक्षिणच्या विकासाकडे दुर्लक्ष केल्याने मतदारांना विविध अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. मूलभूत सोईसुविधांना झगडावे लागत आहे.

दोन साखर कारखानदार स्वार्थासाठी निवडणूक लढवित आहे. त्यांना मतदारसंघाच्या विकासाची पर्वा नाही. विकासासाठी मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. म्हणून मतदारांनी संधी दिल्यास दक्षिणचा कायापालट करणार असल्याचे प्रतिपादन अपक्ष उमेदवार युवराज राठोड यांनी केले. विंचूर, निंबर्गी शंकर नगर तांडा येथे पदयात्रा काढून मतदारांशी संवाद साधताना राठोड बोलत होते. यावेळी मधुकर चव्हाण, विनोद कोळी, याल्लापा कोळी, अर्जुन पुजारी, श्रीकांत चव्हाण, नाना साबळे, करण साबळे, माउली घंटे आदि उपस्थित होते.



# क्रीडा

# सोलापूर महिला संघाचा पुणे संघावर दणदणीत विजय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**





महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या सीनियर महिला संघाची निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत सोलापूरने सोलापूर संघाचे चार पैकी दोन सामने जिंकले आणि दोन सामन्यात पराभव स्वीकारले. त्यांनी पुण्याच्या पुनीत बालान आणि बी.वी.जे. या संघावर विजय मिळविला. नाशिक आणि जळगावसंघाकडूनस त्यांना३ पराभव स्वीकारावा लागला.

हे सामने पुणे येथे सुरु आहेत. यात सोलापूरने ही कामगिरी केली आहे. यात आर्या उमापचे फलंदाजीतील सातत्य आणि भक्ती पवारची भेदक गोलदांजी करीत विजय खेचून आणले. या संघास स्नेहल जाधव, किरण मणियार, मानसी जाधव, सारिका कुरुनूरकर यांचे मार्गदर्शन लाभले. संघाच्या सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन रणजितसिंह मोहिते पाटील आणि सेक्रेटरी चंद्रकांत रेंबर्सू यांनी अभिनंदन केले.

**चार सामन्यातील कामगिरी :** आर्या उमाप (२४२ धावा), भक्ती पवार (७५ धावा आणि ११ बळी), साक्षी वाघमोडे (८६ धावा व २ बळी), प्रतिभा माशाळे (१०० धावा व ४ बळी), संचिता सपाटे (८९ धावा व ३ बळी), प्रतीक्षा नंदर्गी ( ४ बळी), साक्षी लामकाने ३ बळी).



# राज्य डायव्हिंग स्पर्धेत वालचंदच्या हर्षदा गोली हिस ३ पदके

## महाराष्ट्र संघात निवड : १ सुवर्ण, १ रौप्य, १ कांस्य पदकाची कमाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

पुणे येथे झालेल्या राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धेत वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अॅंड सायन्सच्या हर्षदा गोली हिने १ सुवर्ण, १ रौप्य, १ कांस्य अशी तीन पदकांची कमाई केली. तिने ३ मिटर स्प्रिंगबोर्ड प्रकारात सुवर्ण पटकाविले. तसेच तिने हायबोर्डमध्ये रौप्य तर १ मिटर स्प्रिंगबोर्डमध्ये कांस्य पदकाची कमाई केली. या कामगिरीवर तिची महाराष्ट्र संघात निवड झाली. तिला क्रिडाशिक्षक राहुल हजारे व प्रशिक्षक मनीष भावसार यांचे मार्गदर्शन लाभले. तिचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. आश्विन बोंदार्डे, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे, कार्यालय अधिक्षक संतोष सरसमकर आदी उपस्थित होते.

# शालेय राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत मॉडेल स्कूलच्या गौरी पाटीलला सुवर्ण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१३ नोव्हेंबर-**

शालेय राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत येथील मॉडेल पब्लिक स्कूल व श्री समर्थ स्पोर्टस् नर्सरीच्या गौरी पाटील हिने सांघिक गटात सुवर्णपदक पटकाविले.




जम्मु येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत स्पर्धेत गौरी हिने १४ वर्षाखालील मुलींच्या गटात फॉईल या प्रकारात ही कामगिरी केली. यात गौरीबरोबरच महाराष्ट्राच्या जिजाऊ पाटील, स्वामीनी डोंगरे, वैष्णवी कावळे यांचा समावेश आहे. तिला एन.आय.एस प्रशिक्षक अक्षय माने, आकाश लाटणे व अथर्व माने यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे मॉडेल पब्लिक स्कूलचे सचिव अमोल जोशी, छत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते अशोक दुधारे, महाराष्ट्र तलवारबाजी असोसिएशनचे सचिव डॉ. उदय डोंगरे, उपाध्यक्ष प्रा प्रकाश काटूळे, क्रीडासंघटक राजेंद्र माने, जिल्हा सचिव दीपक शिंदे यांनी अभिनंदन केले.

# अॅथलेटिक्स स्पर्धेत सेंट जोसेफ स्कूलची ५ पदकांची कमाई

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

शालेय अॅथलेटिक्स स्पर्धेत सेंट जोसेफ स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण व तीन रौप्य पदकाची कमाई केली. एस आर पी एफ ग्राउंड येथे झालेल्या या स्पर्धेत १७ वर्षाखालील गटात १०० मीटर व २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत वसंत वाघमोडे याने प्रथम क्रमांक पटकावला. २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत पृथ्वीराज चौहान आणि श्रद्धा सरवदे यांनी द्वितीय स्थान मिळविले. ४ बाय १०० आणि ४बाय ४०० मीटर रिले मध्ये स्कूलने द्वितीय स्थान संपादिले. वसंत वाघमोडे, पृथ्वीराज चौहान, अथर्व गायकवाड, श्रावण म्हेत्रे यांचा यात समावेश होता. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक सनी भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक रेव्ह. आनंद गायकवाड यांनी अभिनंदन केले.



# सुमतीबाई स्कूलचा गौरव चव्हाण राज्य योगासन स्पर्धेत तृतीय

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

येथील पी. एस. इंग्लिश मीडियम स्कूलच्या गौरव चव्हाण याने राज्य योगासन स्पर्धेत तृतीय स्थान संपादिले.



श्री श्री रविशंकर माध्यमिक विद्यालय लातूर येथे झालेल्या गौरवने १४ वर्षाखालील मुलाच्या गटात ही कामगिरी केली. त्यास क्रीडा शिक्षक अजित पाटील, रोहन घाडगे व सोमनाथ यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्राविका संस्थेचे सचिव हर्षवर्धन शहा, मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा, हायस्कूलचे मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे यांनी अभिनंदन केले.

# राज्य बॉलबॅडमिंटन स्पर्धेत सोलापूर पाचव्या स्थानावर

## मुलींचा संघ सातवा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

द. महाराष्ट्र बॉलबॅडमिंटन असोसिएशन व द. सांगली बॉलबॅडमिंटन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने खंडेराजुरी (ता. मिरज जि. सांगली) येथे झालेल्या ६९व्या राज्य बॉलबॅडमिंटन स्पर्धेत सोलापूर जिल्ह्याच्या मुलांच्या संघाने पाचवे तर मुलींच्या संघाने सातवे स्थान संपादिले.

या यशाबद्दल जिल्हा बॉलबॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश भूतडा, उपाध्यक्ष सुहास चंचुरे, सचिव राजेंद्र माने यांनी अभिनंदन केले. संघास राजेंद्र माने, शिवकुमार स्वामी व शब्बीर शेख यांचे मार्गदर्शन लाभले.



मुलांच्या संघाने अकोला संघाचा ३५-१५,३५-१६, सिंधुदुर्ग संघाचा ३५-९,३५-५, ठाणे संघाचा ३५-४,३५-१८,पुणे संघाचा ३५-३३,३५-३२,मुंबई संघाचा ३५-१३,३५-२२,नाशिक ग्रामीण संघाचा ३५-१४,३५-१८ असा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला व उपांत्य फेरीत बुलढाणा संघासोबत निसटता पराभव झाला.

तसेच मुलींच्या संघाने मुंबई संघाचा ३५-२६,३५-२३, नाशिक ग्रामीण संघाचा ३५-८,३५-९, संघाचा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला मात्र पुण्याच्या संघासोबत निसटता पराभव सोसावा लागला.

**संघ : मुले :** प्रसाद नितीन मोरे (कर्णधार), विश्वजित गणेश यादव, सार्थक दत्तात्रय शिंदे, प्रेम संदीप चकोर, ओम शहाजी ढोबळे, राजेश बाजीराव भोसले, सिद्धांत तुपेरे, महेश हेडे, प्रसाद काटकर, प्रज्वल माळी.

**मुली :** ज्योती दिलीप भोसले (कर्णधार), कादंबरी दीपक माने, मोहिनी ज्ञानेश्वर घाडगे, तनुष्का सारंग जाधव, सुफिया गौसपाक इनामदार, सायली सोमनाथ माळी, सलोनी लक्ष्मण वनखंडे, आराध्य पांडुरंग शिंदे, साजिदा चांदसाहेब पटेल.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# मोदींची प्रचारातील रोखठोक विधाने

पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्र आणि झारखंडमधील विधानसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा प्रचारामध्ये उतरले असून त्यांनी अनेक जाहीर सभांना संबोधित करताना मतदारांच्या मनात १०० टक्के मतदानाच्या आवश्यकतेची ज्योत प्रज्वलित करण्याचे काम केले आहे. विकासाचे मुद्दे दामटण्यासाठी डबल इंजीनचे सरकार कसे आवश्यक आहे, यावरही नरेंद्र मोदी प्रकाश टाकत आहेत. महाराष्ट्रातील मतदारांच्या मनाचा ठाव घेताना त्यांनी 'एक है तो सेफ है'चा रोखठोक संदेशही दिला आहे. ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी काय करावे लागेल, या मुद्यांकडेही जनतेचे लक्ष वेधले आहे. पंतप्रधान सांगतात त्याप्रमाणे महाराष्ट्राचा विकास करण्याची दृष्टीच महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये नाही, हे पुन्हा एकदा अधोरेखित केले जायला हवे. महाविकास आघाडीतील नेते खरोखरीच राज्याच्या भल्यासाठी एकत्र आले आहेत की आपल्या परिवाराच्या भविष्याच्या चिंतेने त्यांना एकत्र येण्यास भाग पाडले, हे मायबाप जनता जाणतेच. विकास कामांना ब्रेक लावण्याचे काम मात्र विरोधी पक्षाच्या नेत्यांना चांगलेच जमते. त्यांनी राज्यातील अनेक विकास प्रकल्पांमध्ये आपले उपद्रव मूल्य सिद्ध करून दाखवले आहे. महायुतीच्या अडीच वर्षांच्या सत्तेपूर्वी राज्याची सत्ता महाविकास आघाडीच्याच हातात होती. त्यावेळी त्यांनी विकास कामे अडकवणे, लटकवणे आणि भटकवण्याचेच काम केले. या कामात त्यांनी आचार्य पदवी संपादित केली आहे. वाढवण बंदराचे काम रेंगाळले, त्याला मान्यता मिळू नये, पर्यावरणीय परवाने मिळताना त्यात अडचणी निर्माण व्हाव्या, विविध कायद्यांच्या कचाट्यात हा प्रकल्प अडकून पडावा, यासाठी महाविकास आघाडीने केलेले प्रयत्न जनता जाणतेच. हा प्रकल्प प्रचंड रोजगाराची क्षमता असल्याचे जाणूनदेखील त्यात अडथळे आणण्याचे काम विकास आघाडीच्या नेत्यांनी केले आहे. एकीकडे महाराष्ट्रातील प्रकल्प गुजरातेत चालल्याची ओरड करायची, राज्यातील बेरोजगारी वाढत असल्याचा टाहो फोडायचा आणि तिकडे येथे येऊ घातलेल्या प्रकल्पांना मोडता घालायचा, ही कामे वर्षानुवर्षे आघाडीतील तीन घटक पक्षांनी वेळोवेळी केलेली आहे. आघाडीतील नेते भ्रष्टाचारात आकंठ बुडालेले आहेत, याबाबत तर राज्यातील जनतेच्या मनात मुळीच शंका नाही. उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातील, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांच्या नेत्यांची नावे भ्रष्टाचारात आलेली आहेत. त्यांना ईडीच्या चौकशीसाठीसुद्धा उभे राहावे लागले आहे. कुणा भ्रष्टाचारी नेत्याच्या घरून नोटांची बंडले तर कुणाच्या घरून सोन्या-चांदीचे दागिने जप्त होणे, हे आता नवे राहिलेले नाही. आघाडी सरकारमधील नेत्यांवर गृहबांधणी प्रकल्पांमधील भ्रष्टाचाराबद्दलही कारवाई झालेली आपण बघितले आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्येही या पक्षातील नेत्यांची नावे आल्याचे सर्व जाणतात. मात्र, आधी भ्रष्टाचार करायचा, महिलांना अश्लाघ्य भाषेत हिणवायचे आणि सरकारची चौकशी बसली की त्यांच्यावर ईडीचा दुरुपयोग करण्याचा किंवा सीबीआय हा केंद्र सरकारचा बोलका पोपट झालाय म्हणून टिप्पणी करायची, हे कितपत सत्य आहे, याची शहानिशा जनताजनार्दनाने करून घेतली पाहिजे. म्हणूनच या पक्षाचे नेते भ्रष्टाचारात आकंठ बुडाल्याचे मोदी सांगतात, तेव्हा आश्चर्य वाटत नाही.

महाराष्ट्रामध्ये भाजपाच्या नेतृत्वातील महायुती सरकारने मोठमोठ्या योजनांना मंजुरी दिलेली आहे. विशेष म्हणजे शिंदे सरकार दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी प्रसिद्ध आहे. अनेक प्रकल्पांना तर इतक्या अत्यल्प वेळेत मंजुरी मिळालेली आहे की, त्यामुळे आश्चर्याचा धक्का बसल्याशिवाय राहात नाही. निवडणुकीमुळे मुख्यमंत्र्यांनी पदाचा राजीनामा दिला असला तरी त्यांनी लागू केलेल्या योजना भविष्यकाळातही सुरू राहणार, याची गॅरंटी राज्यातील जनतेला आहे. लाडकी बहीण योजना ही राज्यातील महिलांना संजीवनी देणारी ठरणार, याबाबत कुणाच्या मनात किंतु-परंतु नाही. ही बाब ध्यानात घेतली जायला हवी. याच सरकारच्या काळात दलितांसाठी अनेक योजना राबविल्या गेल्या; त्या योजनांची इतर राज्यांनीही री ओढली. शेतकऱ्यांना चोवीस तास वीज पुरवठा, हा निर्णय तर बळीराजाच्या जीवनात परिवर्तन आणणारा ठरणार आहे. पंतप्रधान आवास योजनेचेही अनेक जण लाभार्थी ठरलेले आहेत. अनेकांनी पंतप्रधान सूर्यघर योजनेचा लाभ घेऊन आपले विजेचे बिल शून्यावर आणून ठेवले आहे. पूर्वीच्या सरकारमध्ये डिजिटायझेशन नसल्यामुळे लाभार्थींच्या खात्यात विविध योजनांचे पैसे डीबीटी पद्धतीने टाकण्याची सोय नव्हती. पण आता या योजनांचे लाभ त्या-त्या व्यक्ती, समूहाला कुठलाही गैरव्यवहार न करता थेट मिळत आहेत. ईव्हीएम मशीनमध्ये करण्यात आलेल्या सुधारणा निश्चितच स्वागतार्ह आहेत. नागपुरात निर्माण झालेल्या विभिन्न विद्या शाखांच्या अभ्यासाची एक मालिकाच सांगता येईल. शिक्षणाच्या संधींसोबतच त्याच प्रमाणात रोजगाराच्याही संधी मिळाव्या, ही व्यक्त होत असलेली अपेक्षा चुकीची नाही. याबाबत नव्याने प्रयत्न होतील, अशी अपेक्षा करायला हरकत नसावी. तथापि, महायुती सरकारने विकासाची गती दुप्पट केली याबाबत कुणाचे दुमत असायचे कारण नाही. एक्सप्रेस वे, अटल सेतू आणि समृद्धी महामार्गाचे भूमिपूजन करून सरकार थांबले नाही, तर त्या प्रकल्पांची पूर्तताही करून दाखविली. विकास कामांचा निवळ डंका पिटायचा नाही तर त्या कामाच्या प्रगतीचा सातत्याने ध्यास घ्यावा, ही पंतप्रधानांनी व्यक्त केलेली भावना अतिशय समर्पक म्हणायला हवी.

पंतप्रधानांनी महाविकास आघाडीतील नेत्यांवर केलेल्या शरसंधानामुळे त्यांना चांगलीच मिरची झोंबलेली आहे. लोकसभा निवडणुकीत एकगठ्ठा मतदानाच्या झालेल्या कटामुळे साऱ्या हिंदूंमध्ये लोकशाहीतील निवडणुकांचे पर्व सुरू असताना नाराजी पसरली आहे. या प्रकाराबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही महाविकास आघाडीच्या नेत्यांवर टीका केली आहे. देशातील हिंदूंमध्ये जाती-जमातींमध्ये संघर्ष पेटविण्याच्या इंडिया आघाडीच्या नेत्यांची कारस्थाने यापुढे यशस्वी होणे नाही; त्यासाठी हिंदू समाजानेच आता रान पेटविण्याचे काम सुरू केलेले आहे. महाराष्ट्रात मतांच्या राजकारणापोटी मराठा आणि ओबीसी यांच्यात तेढ निर्माण करण्याचे आणि आगीत तेल ओतण्याचे काम इंडिया आघाडीतील नेत्यांनी केले आहे. मुस्लिम नेत्यांना भडकावून त्यांना भाजपाविरोधात मतदान करण्यास बाध्य करण्यातही ही नेतेमंडळी आघाडीवर होती. 'चारसो पार' झाले तर भाजपाच्या नेतृत्वाखाली सरकार संविधान बदलेल, मुस्लिमांची धार्मिक स्थळे जमीनदोस्त करेल, असा फेक नॅरेटिव्ह चालवला गेला. त्यातूनच मतदारांनी भाजपा-महायुतीविरोधात मते टाकली; ज्यामुळे अनेक उमेदवारांचा पराभव झाला. भाजपाही बहुमतापासून दुरावला. काँग्रेस आणि त्यांच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीच्या नेत्यांना दलित, मागासवर्गीय आणि आदिवासींची प्रगती सहन होत नाही, ही वस्तुस्थिती आहे, याकडे मोदींनी अंगुलिनिर्देश केला आहे. डॉ. आंबेडकरांनी दलितांच्या आरक्षणासाठी प्रयत्न केले, पण पंडित नेहरूंनी त्यांना आरक्षण मिळू नये, यासाठी शिकस्त केली. बाबासाहेबांना आरक्षणासाठी मोठा संघर्ष करावा लागला. इंदिरा गांधींनीही वडिलांच्या पावलावर पाऊल टाकले. राजीव गांधींनी ओबीसी आरक्षणास जाहीर विरोध केला होता, याकडेही पंतप्रधानांनी उपस्थितांचे ध्यान आकर्षित केले. या सर्व बाबी ध्यानात घेता राज्यातील युती सरकारने अनुसूचित जाती, जनजाती आणि भटक्या विमुक्तांसाठी केलेली कामे आणि त्यांच्या उन्नतीसाठी घोषित केलेल्या योजना लोकांचा उत्कर्ष साधणाऱ्या आहेत. युती सरकारने पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात केलेली कामगिरी अवर्णनीयच आहे. मोदींनीही त्यांच्या भाषणात हे मान्य केले आहे. राज्यात मेट्रोचा विकास करताना, त्याची गती गेल्या सरकारच्या कितीतरी पट जास्त राहील, याची काळजी घेतली गेली. रस्त्यांच्या विकासाबाबत मोदी सरकारमधील वजनदार मंत्री नितीन गडकरी यांनी बजावलेल्या कामगिरीचे तर संसदेमध्ये सर्वपक्षीय नेत्यांनी कौतुक केल्याचे आपण बघितले आहे. राज्य सरकारने संस्कृतीच्या क्षेत्रातही उत्तुंग कामगिरी बजावलेली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याने या भाषेच्या विकासासाठी मोठा निधी मिळणार आहे. गोमातेला राजमातेचा दर्जा आणि प्रत्येक गौळाऊ गायीसाठी दररोज ५० रुपयांचे अनुदान हे निर्णयही या सरकारची जमेची बाजू आहे. जातीय संघर्षाबाबत देशातील चिघळत जाणारी परिस्थिती बघता, पंतप्रधानांनी 'एक है तो सेफ है' अशी घोषणा का केली, याचा अन्वयार्थ काढण्याएवढी जनता सुबुद्ध आहे.

## इतस्ततः

# ये वक्फ, वक्फ हैं... वक्फ!

**डॉ. विवेक राजे**

सगळ्या देशात दिवाळीची धामधूम चालू असताना कर्नाटकातून आलेल्या दोन बातम्या लक्ष वेधून घेत होत्या. या दोन्ही बातम्या कर्नाटक वक्फ बोर्ड आणि मालमत्तांशी संबंधित होत्या. पहिली बातमी कर्नाटकच्या विजापूर जिल्ह्यातील होती. विजापूर जिल्ह्यातील शाह अमिनोद्दिन दर्ग्याने जवळजवळ १२०० एकर शेतजमीन आपल्या मालकीची आहे, असा दावा ठोकला. या दाव्याची दखल घेत तेथील तहसीलदारांनी शेकडो शेतकऱ्यांवर नोटिसा बजावल्या. दुसरी बातमी कर्नाटक वक्फ बोर्डाने भारतीय पुरातत्त्व खात्याच्या ताब्यात असलेल्या कर्नाटकातील ५३ ऐतिहासिक वास्तूंवर आपली मालकी असल्याचा दावा ठोकला असल्याची आहे. विजापूरमधील आदिलशाही राजवटीतील गोल घुमट, बारा कमान तसेच बीदर आणि कलबुर्गीचे किल्ले यांसारख्या ५३ मालमत्ता आपल्या मालकीच्या आहेत, असा दावा कर्नाटक वक्फ बोर्डाने ठोकल्याची बातमी डेक्कन हेरॉल्डने दिलेली आहे.

एका अहवालानुसार वक्फकडे असलेल्या नोंदणीकृत अचल मालमत्तांपैकी ७ टक्के मालमत्तांवर अतिक्रमण आहे. २ टक्के मालमत्तांसंबंधी विवाद चालू आहे तर ५० टक्के मालमत्तांची स्थिती कोणालाही निश्चित माहिती नाही. ज्या उर्वरित ५० टक्के जमिनी आहेत त्यातील १७ टक्के जमिनी या कब्रस्तान आहेत. १६ टक्के शेतजमिनीच्या स्वरूपात आहेत, १४ टक्के जमिनींवर मशिदी असून उरलेल्या १३ टक्के जमिनींवर दुकाने आहेत. याचा अर्थ वक्फ बोर्ड आपल्या मालकीच्या म्हणून ज्या अचल संपत्तीवर दावा करते त्यातील ५० टक्के संपत्तीच्या बाबतीत वक्फ बोर्डाकडे कोणतेही ठोस दस्तऐवज किंवा मालकी हक्क प्रस्थापित करू शकतील, असे कागदोपत्री पुरावे नाहीत. पण तरीही वक्फ बोर्ड त्या मालमत्ता आपल्या मालकीच्या आहेत, असे सांगते आहे.

या पृष्ठभूमीवर भारतातील वक्फ कायद्याचा इतिहास पाहिला तर कायद्याच्या कक्षेत सातत्याने वाढच झालेली दिसते. १९१३ च्या इंग्रज सरकारने केलेल्या तरतुदीनुसार कायदेशीर वक्फ विलेख/करारपत्र (डिड) असणे आवश्यक होते. १९२३ मधील तरतुदीनुसार वक्फ विलेख/करारपत्र नोंदणीकृत असणे आवश्यक होते. तर, १९५४ चा स्वतंत्र भारत सरकारने नेहरूंच्या पंतप्रधानपदाच्या काळातील वक्फ कायदा, वक्फ बोर्डाची स्थापना करतो. १९९५ चा सुधारित वक्फ कायदा अचल मालमत्तांच्या मालकी हक्काचे विवाद सोडविण्यासाठी वक्फ न्यायाधीकरणाची स्थापना करतो आणि या न्यायाधीकरणाचे निवाडे अंतिम मानले जातील, असे सांगतो.

आज भारतात अस्तित्वात असलेल्या वक्फ कायद्यानुसार, तीन पद्धतींनी वक्फ किंवा मुस्लिम धर्मदाय संस्था तयार करण्याची मुभा आहे. (१) मालमत्ता तोंडी सूचना देऊन किंवा लेखी वक्फ विलेख तयार करून (२) एखाद्या मालमत्तेचा/जमिनीचा वापर जर दीर्घकाळ मुस्लिम धर्म आणि मुस्लिम धर्मदाय म्हणून करण्यात येत असेल तर (३) वारस न राहिल्याने एखाद्या आधीच अस्तित्वात असलेल्या वक्फला मालमत्ता दान करून. येथे मालमत्तांची कायदेशीर मालकी असलेल्या व्यक्तीकडूनच वक्फ केले जाणे, हे गृहीत धरलेले आहे. मात्र, प्रत्यक्षात तोंडी वक्फ करण्याचे प्रावधान असल्याने तसेच दीर्घकाळ धार्मिक कार्यासाठी वापराचे प्रावधान असल्याने कुठेही, कोणतीही जमीन वक्फची मालमत्ता म्हणता येऊ शकते. सामाजिक न्याय व सशक्तीकरण समितीच्या अहवालानुसार भारतातील बहुतेक राज्य सरकारांनी वक्फ मालमत्तांचे सर्वेक्षणाचे काम अजूनही पूर्ण केलेले नाही. हे सर्वेक्षण वरील कार्यपद्धतीत संपूर्ण जमीन इस्लामची होत नाही तोपर्यंत होऊ शकणार नाही. कारण सध्याच्या वक्फ कायद्यात सुधारणा न केल्यास, इस्लामचे बंदे भविष्यातही नव्या नव्या जमिनी या सतत ताब्यात घेत राहणार आहेत.

आता केंद्र सरकारने जवळजवळ ४० नियंत्रणात्मक सुधारणा वक्फ कायद्यात करण्यासाठी संसदेच्या मागील अधिवेशनात बिल मांडले आहे. अल्पसंख्यक मंत्री किरण रिजिजू यांनी ०८/०८/२०२४ रोजी मागील लोकसभा अधिवेशनात मांडलेल्या 'एकीकृत वक्फ प्रबंधन सशक्तीकरण दक्षता आणि विकास अधिनियम १९९५' मुळे अनेक प्रादेशिक पक्ष व मुस्लिम समाज आज अस्वस्थ झाले आहेत.

वक्फ कायद्यामध्ये आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. या कायद्याचा मुस्लिम समाज कसा दुरुपयोग करून घेतो आहे, याचेच कर्नाटकातील दोन्ही बातम्या हे ढळढळीत उदाहरण होय. देशाच्या फाळणीच्या वेळेस पाकिस्तानात स्थलांतरित झालेल्या मुसलमानांची मालमत्ता मुस्लिम समाजाच्या धार्मिक वा सामाजिक कार्यासाठीच उपयोगात याव्यात, त्या मालमत्तांना संरक्षण मिळावे या उद्देशाने स्वतंत्र भारतात वक्फ कायदा १९५४ अस्तित्वात आला. त्याचा उद्देश पूर्णतः सफल होऊन आता त्या कायद्याचा मुस्लिम समाज दुरुपयोग करीत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. हे लक्षात आल्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने जिंदाल विरुद्ध राजस्थान वक्फ बोर्ड (संदर्भ : सिव्हिल अपील नंबर २७८८-८९ ऑफ २०२२) या विवादात राजस्थान वक्फ बोर्डाला, तुम्हाला तुम्ही मालकी हक्काचा दावा ठोकत असलेल्या जमिनीच्या मालकी हक्काचा स्रोत, योग्य ती कागदपत्रे सादर करावीच लागतील, असे खडसावत वक्फ बोर्डाच्या विरोधात आणि जिंदाल कंपनीच्या बाजूने निकाल दिला. कोणी तुमच्या दाव्याचा प्रतिवाद केला नाही, आक्षेप घेतला नाही किंवा एखाद्या जमिनीवर तुम्ही मजार, मशीद वा थडगे बांधले म्हणून ती जमीन तुमच्या मालकीची होत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे आपल्या निकालपत्रात नमूद केले आहे.

फाळणीच्या धामधुमीच्या काळात कदाचित वक्फ कायदा पारित करणे गरजेचेही असेल. पण आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. त्यामुळे या कायद्यात काही मूलभूत बदल करणे आवश्यक झालेले आहेत. केंद्र सरकारने याची योग्य दखल घेत या कायद्यात ४० सुधारणा सुचवल्या आहेत. यापैकी सगळ्यात महत्त्वपूर्ण बदल म्हणजे केंद्रीय वक्फ परिषद आणि वक्फ बोर्डांवर दोन मुस्लिमेतर, दोन महिला तसेच एक शिया मुस्लिम, एक सुन्नी मुस्लिम आणि एक मागासवर्गीय मुस्लिम असावा. यामुळे मुस्लिम समाजातील सर्वच वर्गातील लोकांना तसेच मुस्लिमेतर या संस्थांवर प्रतिनिधित्व मिळेल. दुसरे म्हणजे वक्फ सर्वेक्षण आयोगाऐवजी जिल्हाधिकारी हे सर्वेक्षणाचे काम करतील. त्यामुळे पूर्वीच्या वक्फ सर्वेक्षण आयोगाचे सगळे अधिकार या संशोधनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात येतील. तिसरे म्हणजे वक्फने मालकी हक्काचा दावा केलेल्या सगळ्या सरकारी मालमत्तांवरील वक्फचा मालकी हक्क संपुष्टात येऊन जिल्हाधिकारी या मालकी हक्कासंबंधात निर्णय देतील. तर, महत्त्वपूर्ण सुधारणा म्हणजे वक्फ न्यायाधीकरणाने दिलेले निर्णय अंतिम समजण्यात येणार नाहीत. उलटपक्षी वक्फसंबंधित विवाद थेट उच्च न्यायालयात दाखल करता येतील.

अर्थात वक्फ (म्हणजे धर्मदाय संस्था) आणि वक्फ बोर्ड हे केंद्र आणि राज्य सरकारच्या सामयिक यादीत असल्यामुळे काही राज्य सरकारे यात अनावश्यक ढवळाढवळ भविष्यात निश्चितच करू शकतात. त्यामुळे जर हिंदू समाजाला आपण आणि आपल्या पूर्वजांनी घाम गाळून मिळविलेल्या मालमत्तांचा निर्वेध उपभोग घ्यायचा असेल तर भविष्यात येऊ घातलेल्या प्रत्येक निवडणुकीत वक्फ कायद्यात सुधारणा करून त्याला कायदा आणि लोकशाहीच्या मर्यादांमध्ये ठेवणाऱ्या हिंदुत्ववादी पक्षाच्या पाठीशी एकवटले पाहिजे.

९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

# तुष्टीकरणाला ठोस उत्तर देण्याची वेळ

'लव्ह जिहाद' शब्दाचा अर्थ आता सर्वांनाच परिचयाचा झाला आहे. या शब्दामागील भयावहता याआधी अनेक घटनांमधून समोर आली. काही घटना समोर आल्या नसल्या, तरी जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या ठरल्याची अनेक उदाहरणे प्रत्येक गावात प्रत्येकाच्या सभोवताली आहेत. केवळ 'लव्ह जिहाद'च नव्हे तर 'लॅण्ड जिहाद'चे संकटही गावोगावी दिसून पडते. हे सर्व कमी की काय म्हणून 'व्होट जिहाद'ची प्रत्यक्ष घोषणा गत लोकसभा निवडणुकीत देण्यात आली. गठ्ठा मतांच्या जोरावर हवे ते घडवून आणण्याचे जोरकस प्रयत्न देशात सुरू असल्याचे चित्र आहे. 'सत्तेसाठी वाट्टेल ते' ही मनोवृत्ती असणाऱ्या राजकीय विचारधारा या प्रयत्न करणाऱ्यांच्या सापळ्यात सुरुवातीपासूनच अलगद अडकतात. मग त्यांना देश, संविधान, आंतरिक सुरक्षा, बाह्य सुरक्षा आदी या कुठल्याही विषयाचे भान राहत नाही. एरवी संविधानाच्या सुरक्षेसाठी टाहो फोडणारी, आम्ही संविधानाचे एकमेव रक्षणकर्ते आहोत, असा आव आणणारी ही राजकीय जमात जेव्हा संविधानाऐवजी धर्मावर आधारित राज्याच्या पुरस्कर्त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपते. तेव्हा हे समाजाचे, राष्ट्राचे दुर्दैव नव्हे तर काय, असा प्रश्न पडतो.

लोकसभा निवडणुकीच्या एक महिनाआधी समाजवादी पार्टीच्या एका महिला नेत्याने मुस्लिमांनी गठ्ठा मतदान करावे, असे आवाहन करीत त्याला 'व्होट जिहाद'चे नाव दिले होते. महाराष्ट्रात याच पॅटर्नने मतदान झाल्याचा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक पुराव्यानिशी केला. धुळे लोकसभा मतदारसंघातील विजयी आणि पराभूत उमेदवाराच्या आकडेवारीवरून या आरोपांमध्ये तथ्य असल्याचे स्पष्ट होते. विधानसभा निवडणुकीचे मतदान अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले आहे. पण विधानसभा निवडणुकीत हाच पॅटर्न राबवून सत्ता मिळविण्याचा प्रयत्न सुरू असल्याची वेगवेगळी उदाहरणे पाहावयास मिळतात. पश्चिम विदर्भातील



अकोला पश्चिम या जागेवर गत सहा टर्मपासून भाजपा विजयी होत आहे. हा मतदारसंघ भाजपाचा गड आहे. या मतदारसंघात कथित गठ्ठा मतदारांची संख्या मोठी आहे. महाविकास आघाडीच्या काँग्रेसने येथे मुस्लिम उमेदवाराला संधी दिली. पण पक्षातीलच नाराज दुसऱ्या मुस्लिम नेत्याने काँग्रेसचा त्याग करून वंचित बहुजन आघाडीची उमेदवारी मिळविली. या प्रकारामुळे गठ्ठा मतदान विभाजित होण्याची भीती निर्माण झाली. मग काय, थेट दिल्लीपासून ते गल्लीतील सारे उलेमा, मौलवी बंडखोरी करणाऱ्या नेत्याच्या एकत्र घरी गेले. बंडखोरी करणाऱ्या त्या नेत्यावर सर्व प्रकारचा दबाव टाकून त्याला 'कौम'साठी उमेदवारी परत घेण्याच्या आणाभाका देण्यात आल्या. अखेर शेवटच्या क्षणी त्या उमेदवाराला रिंगणातून बाहेर पडावे लागले, अशी चर्चा अकोलेकरांमध्ये आहे. विधानसभेच्या एका जागेसाठी थेट दिल्लीसह स्थानिक धार्मिक नेत्यांचा असा पुढाकार 'व्होट जिहाद' निर्विघ्न व्हावा यासाठीच आहे. एकीकडे गठ्ठा मतदान महाविकास आघाडीच्या पदरात पडावे म्हणून विविध प्रयत्न सुरू असतानाच दुसरीकडे दक्षिणेत असलेला केरळ येथील वायनाडच्या पोटनिवडणुकीत प्रियांका गांधी यांनी कट्टरपंथी इस्लामिक संघटन जमात-ए-इस्लामी हिंद यांचा पाठिंबा घेऊन निवडणुकीला सामोरे जात आहेत, असा आरोप येथील डाव्या आघाडीच्या नेत्यांनी केला आहे. जमात-ए-इस्लामी हिंदने प्रियांका यांना पाठिंबा दिला असेल आणि त्यांनी तो घेतला असेल तर 'ये रिश्ता क्या कहलाता है' असेच म्हणावे लागेल.

समाजमाध्यमावर विविध बाबी सतत प्रसारित होत असतात. त्यात गत काही दिवसांपासून ऑल इंडिया उलेमा बोर्डद्वारा काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना उबाठा गटाला दिलेले पत्र चर्चेत आहे. या पत्रात १७ मागण्या मांडण्यात आल्या आहेत. त्यातील अनेक मागण्या असंवैधानिक असून काही मागण्या तर देशद्रोहाचे खुले समर्थन करणाऱ्या आहेत. या पत्रासोबतच काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटांच्या प्रदेशाध्यक्षांचे पत्रही प्रसारित होत त्यांनी उलेमा बोर्डाच्या मागण्या मान्य केल्याचे म्हटले आहे. अद्याप काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट किंवा शिवसेना उबाठा यांनी याबाबत आक्रमणपणे भूमिका मांडून आपले मत व्यक्त केल्याचे समोर आले नाही. जर हे पत्र आणि त्याला दिलेले समर्थन खरे असेल तर हा तुष्टीकरणाचा कळस असून या देशघाती राजकीय वृत्तीला मतदानातून राष्ट्रभक्तांनी ठोस उत्तर देण्याची वेळ आली आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# कोण होणार महाराष्ट्राचा मुख्यमंत्री?

**श्यामकांत जहागीरदार**

संपूर्ण देशाचे लक्ष लागून असलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला आता एक आठवड्यापेक्षाही कमी कालावधी उरला आहे. आजपासून पाच दिवसांनी प्रचार संपेल आणि २० नोव्हेंबरला विधानसभेच्या २८८ जागांसाठी मतदान होणार आहे. राज्यातील जनतेचा कौल कोणाला मिळाला, याचे उत्तर २३ नोव्हेंबरला मतमोजणीनंतर मिळणार आहे. देशात उत्तरप्रदेशनंतर लोकसभेच्या दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वाधिक म्हणजे ४८ जागा महाराष्ट्रात आहेत. उत्तरप्रदेशात लोकसभेच्या देशात सर्वाधिक म्हणजे ८० जागा आहेत. त्यामुळे अन्य राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा देशातील राजकारणावर दीर्घकालीन असा परिणाम होणार आहे.

महाराष्ट्रात भाजपाच्या नेतृत्वातील महायुती तर काँग्रेसच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी यांच्यात या निवडणुकीत खरी लढत होत आहे. व्यूहरचनेचा भाग म्हणून महायुती आणि महाविकास आघाडीने आपापला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केलेला नाही. निवडणुकीनंतर मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय घेतला जाईल, असे दोन्ही आघाड्यांतर्फे सांगितले जात आहे. महायुतीत भाजपा १५१, शिवसेना ८० आणि राष्ट्रवादी काँग्रेस ५० जागा लढवत आहे. पाच जागा मित्रपक्षांसाठी सोडण्यात आल्या आहेत. महाविकास आघाडीत काँग्रेस १०३, शिवसेना उबाठा ८९ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट ८७ जागा लढवत आहेत. आघाडीने सहा जागा आपल्या छोट्या मित्रपक्षांसाठी सोडल्या आहेत. विशेष म्हणजे जागावाटपाबाबतची अधिकृत घोषणा दोन्ही बाजूने करण्यात आलेली नाही. काही जागांवर दोन्ही आघाड्यात मैत्रिपूर्ण लढती होत आहे. महायुतीत एक माजी आणि एक आजी असे दोन मुख्यमंत्री आहेत. भाजपाचे देवेंद्र फडणवीस हे माजी मुख्यमंत्री आहेत तर शिवसेनेचे एकनाथ शिंदे विद्यमान मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे महायुतीला बहुमत मिळाले तर देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यापैकी एकाच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडू शकते. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री होण्याची आपली इच्छा कधीच लपून ठेवली नाही. मात्र, यावेळीही ती पूर्ण होईल, असे वाटत नाही. कारण, महायुतीत तिसऱ्या क्रमांकाच्या जागा त्यांच्या पक्षाला मिळू शकतात. त्यामुळे त्यांच्या नावाचा मुख्यमंत्रिपदासाठी विचार होण्याची शक्यता नाहीच्या बरोबरच आहे. महायुतीत मुख्यमंत्र्याची निवड करताना ज्या पक्षाच्या जागा सर्वाधिक राहतील, त्या पक्षाला संधी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. महायुतीत जागा जिंकण्यात भाजपा पहिल्या क्रमांकावर, शिवसेना शिंदे गट दुसऱ्या क्रमांकावर तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट तिसऱ्या स्थानावर राहील, असा अंदाज आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील शिराळा येथे आयोजित सभेत महायुतीला बहुमत मिळाले तर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील, असे संकेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्यामुळे भाजपा गोटात उत्साहाचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक आहे. देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्राचे नेतृत्व करावे, अशी फक्त भाजपा कार्यकर्त्यांचीच नाही तर राज्यातील सर्वसामान्य जनतेचीही इच्छा आहे. मात्र, महायुतीच्या मुख्यमंत्रिपदाचा निर्णय तिन्ही पक्षांचे नेते एकत्र बसून करतील, त्याआधी भाजपा संसदीय मंडळाचीही बैठकही बोलवावी लागेल. त्यामुळे महायुतीचा मुख्यमंत्री कोण राहील, याबाबत आताच मतप्रदर्शन करणे घाईचे होईल. महाविकास आघाडीत शिवसेनेचे उद्धव ठाकरे आणि काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण हे माजी मुख्यमंत्री आहेत. यातील पृथ्वीराज चव्हाण हे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मात्र मुख्यमंत्रिपदाचे दिवसरात्र स्वप्न पाहणारे उद्धव ठाकरे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले नाहीत. विधानपरिषदेचे अनेक सदस्य निवडणुकीच्या रिंगणात असले, तरी उद्धव ठाकरे यांना विधानसभा निवडणूक लढवण्याची हिंमत झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी अर्धा डझन इच्छुक नेते गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत. यात प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, नितीन राऊत यांच्यासह आणखी अनेकांचा समावेश आहे. वेळ पडली तर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणही यात मागे राहणार नाहीत. कोरोना काळात मुख्यमंत्री झालेल्या आणि मंत्रालयात कधीच न गेलेल्या उद्धव ठाकरे यांना पुन्हा मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पडू लागली आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीने आपल्याला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करावे, असा अयशस्वी प्रयत्न त्यांनी आपले 'हिज मास्टर्स व्हॉईस' संजय राऊत यांच्यामार्फत करून पाहिला. मुख्यमंत्रिपदाबाबत उद्धव ठाकरे यांची द्विधा मनस्थिती आहे. आपण मुख्यमंत्री व्हावे की आपल्या मुलाला आदित्य ठाकरेला मुख्यमंत्री करावे, याबाबत त्यांचा गोंधळ उडत आहे. याचाच अर्थ उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाची संधी आहे, असा नाही.

एका शिवसैनिकाला मुख्यमंत्री करेल, असा शब्द मी बाळासाहेबांना दिला होता, असा दावा उद्धव ठाकरे पाच वर्षांपूर्वी करीत होते. स्वतःला मुख्यमंत्री करत त्यांनी बाळासाहेबांना दिलेला आपला शब्द खरा करून दाखवला. पण त्यावेळी राज्यातील भाबड्या जनतेला ठाकरे घराण्यातील कोणी मुख्यमंत्री होण्याऐवजी शिवसैनिकांमधून एखादा कर्तबगार नेता मुख्यमंत्री होईल, असे वाटत होते. नंतर जनतेच्या मनातील ही भावना एकनाथ शिंदे यांनी पूर्ण केली, हा भाग वेगळा. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात आता प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील वगळता मुख्यमंत्री होण्यासाठी नेतेच उरले नाहीत. महायुतीत जी स्थिती राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची आहे, तीच महाविकास आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची आहे. महाविकास आघाडीत जागांच्या बाबतीत काँग्रेस पहिल्या, शिवसेना उद्धव ठाकरे गट दुसऱ्या तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट तिसऱ्या स्थानावर राहील, असा अंदाज आहे.

उद्धव ठाकरे यांना ज्याप्रमाणे आपल्या मुलाला आदित्य ठाकरे यांना मुख्यमंत्री करायचे आहे, त्याचप्रमाणे शरद पवार यांना आपल्या मुलीला सुप्रिया सुळे यांना मुख्यमंत्री करायचे आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा सुप्रिया सुळे यांचाच होता. शरद पवार आपल्याला कधीही मुख्यमंत्री करणार नाही, याची खात्री असल्यामुळे अजित पवार शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडले होते. एकंदरीत महाराष्ट्रात महायुतीला बहुमत मिळेल की महाविकास आघाडीला, नवीन मुख्यमंत्री महायुतीचा होणार की महाविकास आघाडीचा, महायुतीला बहुमत मिळाले तर मुख्यमंत्री महायुतीतील कोणत्या पक्षाचा होणार, भाजपाचा की शिवसेनेचा तसेच महाविकास आघाडीला बहुमत मिळाले तर काँग्रेसचा होणार की शिवसेना उद्धव ठाकरे गटाचा याबाबत जनमानसात मोठी उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे.

९८८१७१७८१७

### प्रशासन व्यस्त, विद्यार्थी त्रस्त!

महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला विधानसभेची निवडणूक होत आहे. युद्धस्तरावर तयारी सुरू आहे. अगदी तलाठीपासून तर तहसीलदारपर्यंत संपूर्ण प्रशासन मागील एक ते दीड महिन्यापासून निवडणुकीच्या कामात व्यस्त आहे. अशातच एका महत्त्वपूर्ण परीक्षेच्या नोंदणीचा कालावधी जाहीर झाला आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे जानेवारी २०२५ शेवटी जेईई (जॉईंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन) ही अभियंता प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. या प्रवेश परीक्षेकरिता महाराष्ट्रातील जवळपास दीड ते दोन लाख विद्यार्थी बसणार आहेत. विद्यार्थ्यांना नोंदणीकरिता उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र, जात पडताळणी, नॉन क्रिमीलेअर आणि तत्सम प्रमाणपत्रांची आवश्यकता असते. परंतु संपूर्ण प्रशासन निवडणुकीच्या कार्यात व्यस्त असल्याने अशाप्रकारचे दाखले मिळायला विद्यार्थ्यांना, पालकांना अडचणी येत आहेत. यामुळे राज्यातील अनेक विद्यार्थी या परीक्षेपासून वंचित राहू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने स्वतः तसेच राज्यातील शिक्षण संस्थांनी, संघटनांनी, लोकप्रतिनिधींनी यात लक्ष घालून, पुढाकार घेऊन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे किंवा नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडे महाराष्ट्रातील जेईई नोंदणीची तारीख किमान एक ते दोन आठवड्यांनी पुढे ढकलण्याची विनंतीवजा मागणी करावी; जेणेकरून निवडणुकीमुळे विद्यार्थ्यांच्या करीअरचे नुकसान टाळता येईल.

**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

## वाचक पत्रे

### त्रिपुरारी पौर्णिमा

त्रिपुरारी पौर्णिमा हा उत्सव कार्तिक पौर्णिमा या तिथीला साजरा केला जातो. या दिवशी श्री शंकराने त्रिपुरासुर राक्षसाचा नायनाट केल्यामुळे हा उत्सव कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी साजरा करतात. त्रिपुर या दैत्याने ब्रह्मदेवाची आराधना करून त्यांची कृपा प्राप्त केली. त्रिपुराने 'त्याला अमरत्व प्राप्त होवो,' असे वरदान ब्रह्मदेवाला मागितले. वरदान मिळाल्यावर त्याने देवतांचा छळ सुरू केला. श्रीविष्णूलाही त्रिपुराला विरोध करता आला नाही. शेवटी श्री शंकराने तीन दिवस युद्ध करून



कार्तिक शुक्ल पक्ष पौर्णिमेला त्रिपुर राक्षसाचा वध केला आणि देवांचे हरवलेले वैभव परत मिळवून दिले. आपले गेलेले वैभव परत मिळालेले पाहून सर्व देवांना आनंदीआनंद झाला आणि त्यांनी शंकराची स्तुती करून दीपोत्सव साजरा केला. तेव्हापासून कार्तिक शुद्ध पौर्णिमेस हा उत्सव साजरा केला जातो. या दिवशी मोठ्या उंच दगडी खांबाच्या सभोवती दिवे लावले जातात. या खांबांना 'त्रिपुरी' म्हणतात. आसुरी शक्तीवर चांगल्या शक्तीचा विजय म्हणून हा उत्सव साजरा केला जातो. आपणदेखील तेजाचे अधिष्ठान असलेला हा दीपोत्सव साजरा करूया. आपल्या मनातील दुष्प्रवृत्तींचा नाश होऊन अंतःकरण निर्मळ करून या दीपोत्सवाच्या निमित्ताने भगवंताच्या चरणी प्रार्थना करूया...

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

### अज्ञानातून गैरसमज

रस्त्यावर होणाऱ्या वाहनांच्या अपघातांची कारणे तपासली तर बरेचसे अपघात योग्य माहिती नसल्यामुळे झाल्याचे आढळून येईल. समृद्धी मार्ग हा महाराष्ट्रातला आतापर्यंतचा सर्वात चांगला रस्ता आहे. पण वाहनांचा वेग, चाकातल्या हवेचा दाब किती ठेवावा, याची नीट माहिती नसल्यामुळे बरेचसे अपघात होतात. शहरातील रस्त्यांवरून जाणाऱ्या वाहनांचे मोमेंटम (वजन व वेग गुणाकार) यात किती फरक असतो, याची कल्पना नसल्यामुळे लहान वाहनांच्या चालकांचे जीवघेणे अपघात होतात. एकाच वेगाने जाणारा डांस व जड वाहन यांच्या 'मोमेंटम' मध्ये खूप फरक असतो. सर्कसमध्ये हत्तीने मारलेला फुटबॉल किती दूर जातो, हे ज्यांनी पाहिले असेल त्यांना मोमेंटममधल्या फरकाची कल्पना येईल. दोन जात असलेल्या चारचाकीमध्ये नको तिथे धाडस दाखवून मध्ये घुसणाऱ्या स्कूटर चालकाला मागच्या चारचाकी वाहनांचा थोडा जरी धक्का लागला तरी तो किती दूर फेकला जातो, हे खूप उशिरा कळते. एका पारड्यात पाच सेकंद व दुसऱ्या पारड्यात आपला जीव टाकून हे 'बाईक बहाद्दर' मोठी रिस्क घेत असतात. दुसरे उदाहरण द्यायचे झाल्यास, कॉम्प्युटर चिपची कल्पना नसलेले व इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनवर बेछूट आरोप करणारे राजकारणी; देशाचा विकास म्हणजे काय व तो कसा होऊ शकतो, याचे ज्ञान नसताना केवळ पैसे कमवायच्या उद्देशाने निवडणुकीत उमेदवार असणारे भ्रष्ट राजकारणी यांचे देता येईल. सुदैवाने आज सुशिक्षित मतदारांची संख्या वाढते आहे, ही जमेची बाजू आहे. आजच्या या आधुनिक जगात वावरताना, योग्य ते ज्ञान ठेवून शहाणपणाने वागणे, यातच स्वतःचे, समाजाचे व देशाचे हित आहे, हे नेहमी लक्षात ठेवावे.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# डॉ. विलास आलुरे यांचे निधन



**अणदूर, दि. १३ नोव्हेंबर-**
येथील सेवानिवृत्त जिल्हा आरोग्य अधिकारी व बालरोगतज्ञ डॉ. विलास शिवप्पा आलुरे (वय ७०) यांचे बुधवार दिनांक १३ नोव्हेंबर २४ रोजी हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले.त्यांची अंत्ययात्रा गुरुवार दिनांक १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता अणदूर (ता. तुळजापूर) येथील त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. सेवानिवृत्त शिक्षक चंद्रकांत शि. आलुरे यांचे ते लहान बंधू होते तसेच बालरोगतज्ज्ञ डॉ. विकास आलुरे यांचे ते वडील होते व सोलापूर मनपाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश चौगुले यांचे ते सासरे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे.


## खरेदीपूर्व जाहिर नोटीस

सोलापूर येथील तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर, ता. दक्षिण सोलापूर, मौजे बक्षी हिप्परगे येथील ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन गट क्र. २७ यासी क्षेत्र ०. हे ६९ आर, + पोटखराब ० हे.०३ आर यासी आकार २. रु. ७५ पैसे, असे असून चतुःसिमा - पूर्वेस गट नं. ३० व ३१, पश्चिमेस सदर गट नंबर पैकी शिल्लक, दक्षिणेस गट नं.२८ व २९, उत्तरेस गट नं. २६. येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमीन मिळकत कब्जेवहिवाटीच्या हक्कासह.

वर नमुद मिळकतीचे मालक सौ. अर्चना सेनापती सुरवसे हे असून सदर मिळकतीच्या महसूल पत्रकी त्यांच्याच नावाची नोंद आहे. वरनमुद मिळकतीच्या मालकांनी वरील मिळकत आमचे अशिलास विक्री करण्याचे ठरवून इसारापावती लिहून दिलेली आहे.

वर नमुद मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलास खात्री दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल वर नमुद मिळतीबाबत व्यवहार करणार आहेत.

तरी वर नमुद मिळकतीबाबत कोणाचे कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास अथवा हरकत अथवा खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, टाच, जप्ती इ. असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत हरकती लेखी स्वरुपात कागदपत्रांनिशी खालील नमुद पत्यावर कळवाव्यात. हरकती मुदतीत न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून आमचे अशिल वर नमुद मिळकतीबाबतचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर येणाऱ्या हरकती आमच्या अशिलावर मुळीच बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ताः १३/११/२०२४.

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**ॲड. विष्णु बब्रुवान भोसले**
**ऑफि.नं.३, १३१, स्केअर वन कॉम्पलेक्स,**
**सिव्हल कोर्टासमोर, सिध्देश्वर पेठ, सोलापूर**
**मो.नं. ९१७२५५४४५५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः ता. बार्शी पैकी शहर वैराग व आसपासचे लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे वैराग येथील सि.स.नं. १५६ पैकी पश्चिम उत्तर कोपऱ्यातील क्षेत्र ४८.६० चौ. मी. याचाच नगरपंचायत मिळकत नं. ३०९/१ ही मिळकत ओंकार गुरुनाथ भस्मे यांचे खरेदी कब्जेमालकी वहिवाटीची आहे. त्यांनी सदर मिळकत खालील सही करण्यारे खरेदीदारास विक्री करणेचा ठराव करून त्यांचेकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदरची मिळकत मिळकतीचे मालकानी निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा आमचे आशिलास दिलेला आहे. सदर मिळकतीवर बँक ऑफ महाराष्ट्र शाखा वैराग यांचा गहाणखताचा बोजा नमूद आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, या उपर ओंकार गुरुनाथ भस्मे यांचेशी वरील नमूद मिळकतीबाबत बँक ऑफ महाराष्ट्र शाखा वैराग यांचे गहाणखताचे बोजा व्यतिरिक्त अन्य कोणाचा खरेदी, साठेखत, गहाण, दान, लिज, बोजा इ. प्रकारचा कसल्याही प्रकारे हस्तांतरणाबाबत व्यवहार असलेस त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ दिवसाचे आत खालील नमुद पत्त्यावर कागदपत्रानिशी आमचे आशिलास शहानिशा करून द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची हरकत न आल्यास आमचे आशिल वर नमुद ठरावाप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागावून कोणाची तक्रार चालणार नाही, कोणाची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. कळावे, ता. १२/११/२०२४.

**सही/-**
**ॲड. श्री. मिलिंद जयशंकर खुपसरे**
**ॲड. हृषिकेश मिलिंद खुपसरे**
**रा. वैराग, ता. बार्शी मो. नं. ९४२३३३२६११**
**खरेदीदारतर्फे ॲडव्होकेटस्**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः पानगांव ता. बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डी. सोलापूर सब डी. व तालूका बार्शी पैकी पानगांव हद्दीतील सि. स. नं. १४४२ याचे क्षेत्र ७०.२० चौ. मी. यापैकी श्री. बब्रुवान कुंडलीक वाघमारे यांच्या मालकीचे अविभक्त क्षेत्र याचा ग्रामपंचायत मिळकत नंबर १२५६ याचे ग्रामपंचायत रेकॉर्ड प्रमाणे क्षेत्र ३८.४८ चौ. मी. तसेच श्री. नामदेव कुंडलीक वाघमारे यांच्या मालकीचे अविभक्त क्षेत्र व यशवंत दत्तात्रय आपुणे व हणुमंत दत्तात्रय आपुणे यांच्या मालकीचे अविभक्त क्षेत्र १७.५५ चौ. मी, येणेप्रमाणे वर्णनाची खुली प्लॉट जागा ही श्री. बब्रुवान कुंडलीक वाघमारे, श्री. नामदेव कुंडलीक वाघमारे, यशवंत दत्तात्रय आपुणे व हणुमंत दत्तात्रय आपुणे यांचे मालकीची असुन हक्कपत्रकी त्यांचे नाव दाखल आहे. सदरची मिळकत ही आमचे पक्षकार यांनी खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा खरेदी देणार यांनी आमचे पक्षकारास दिलेला आहे. आमचे पक्षकार यांनी सदर जागेची बाजार भावाने होणारी योग्य ती किंमत देऊन खरेदी घेण्याचे ठरविले असुन तसा करार खरेदी देणार व आमचे पक्षकार यांचे दरम्यान झालेला आहे व इसारादेखील दिलेला आहे.

तरीदेखील वर नमुद मिळकतीसंबंधाने कोणाचेही कसलेही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास उदा. साठे-करार, खरेदीखत, गहाण, दान, लीज, लीन, पोटगीहक्क, वारसाहक्क, फेडपत्र, भाडेपट्टा, टाच, बोजा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्याची शाबिती संबंधिताने ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन पंधरा दिवसात कागदपत्रानिशी आमचे ऑफीसमध्ये येऊन तशी आमच्या पक्षकाराची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कसलीही लेखी हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असुन सदर मिळकतीशी कोणाचाही कसलाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही, व असल्यास त्याने तो स्वतः होऊन सोडून दिलेला आहे असे समजुन खरेदी व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून कोणाचीही, कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. मुदतबाह्य तक्रारींचा विचार केला जाणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सर्वाच्या माहितीकरिता हे जाहिर प्रसिध्दिकरण केले असे. ता. १३/११/२०२४.

**सही/-**
**ॲड. प्रवीण पी. करंजकर**
**रघु कुल, कर्मवीर नगर,**
**पाटील प्लॉट, बार्शी. ४१३४११**
**मो. नं. ९८२२०६५६६१**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम सोलापूर जिल्हा व विशेषतः शहर सोलापूर येथील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापुर पैकी मौजे कुमठे येथील जुना स. नं. २४ त्यांसी भूमापन / उपविभाग क्रमांक ४५ त्यांसी चतुःसीमाः पूर्वेसः १८ मीटर रुंद रस्ता, दक्षिणेसः खुलीजागा, पश्चिमेसः ९ मीटर रुंद रस्ता, उत्तरेसः ६ मीटर रुंद रस्ता, सदर चतुः सिमेतील जागा दि.०८/१२/१९७१ रोजीच्या एन ए ऑर्डर नं. LNB/II/CR/२५/३१ Sholapur प्रमाणे एन.ए. झालेल्या सदर लेआउट मधील १) प्लॉट नं. १२५ त्यांसी क्षेत्रफळ ६.००आर, २) प्लॉट नं. १३१ त्यांसी क्षेत्रफळ ४.७६आर, ३) प्लॉट न. ९७ त्यांसी क्षेत्रफळ ४.७५आर, ४) प्लॉट न. १२६ त्यांसी क्षेत्रफळ ३.८२.८५आर, ५) प्लॉट न. १२८ त्यांसी क्षेत्रफळ ५.३२आर, ६) प्लॉट नं. १२३ त्यांसी क्षेत्रफळ ५.०० आर, ७) प्लॉट न. १३३ त्यांसी क्षेत्रफळ ४.७६.००आर, ८) प्लॉट न. ९१ त्यांसी क्षेत्रफळ ४. ७५आर, ९) प्लॉट नं. १३२ त्यांसी क्षेत्रफळ ४.७६आर, १०) प्लॉट नं. ८८ त्यांसी क्षेत्रफळ ४.७५आर, ११) प्लॉट नं. १२९ त्यांसी क्षेत्रफळ ५.३२आर, १२) प्लॉट नं. १२७ त्यांसी क्षेत्रफळ ५.६०.७०आर, १३) प्लॉट नं. ८३ त्यांसी क्षेत्रफळ ४.३७आर, १४) प्लॉट न. ८२ त्यांसी क्षेत्रफळ ४.३७आर, १५) प्लॉट नं. १३० त्यांसी क्षेत्रफळ ४.७६आर, १६) प्लॉट नं. ९२ त्यांसी क्षेत्रफळ ४.७५आर. १७) प्लॉट नं. १०६ त्यांसी क्षेत्रफळ ५.४०आर. असे एकूण १७ प्लॉट आमचे अशिल चेतन मोहन गोसकि, लावण्या नागेश दासरी, शरद जगन्नाथ शुक्ला, श्रुतिका शिवराजकुमार कन्ना यांचे सामाईक मालकीचे वहिवाटीचे आहेत.

तथापि, सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिला आहे. त्यानुसार आमचे अशिलांनी सदर मालकांना इसारापोटी काही रक्कम दिलेली आहे ती मालकांनी स्विकारलेली आहे. त्यानंतर सदर खरेदीखताचा व्यवहार आमचे अशिल करणार आहेत.

सदर वर नमूद मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे अशी हमी व खात्री वर नमूद मालकांनी आमचे अशिलांना दिले आहे. तरी परंतू वर नमुद मिळकतीवर कोणाचा गहाण, दान, लीज, टाच, बक्षीसपत्र साठेखत, खरेदीखत, नोटरी कब्जासाठेखत, कुलमुख्यत्यारपत्र, पोटगी, कोर्ट केस, लीन, खाजगी सावकार व पतपेढी तसेच जमीनीचे मिळकतदार त्याबद्दल कोणाचीही हरकत, तक्रार वगैरे तसेच कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बोजा असल्यास त्यांनी ही प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापोसून ०७ (सात) दिवसांचे आत सदर मिळकतीचे संदर्भात लेखी कागदपत्र पुराव्यानिशी आमची खात्री करुन दयावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर खरेदी व्यवहार पुर्ण करतील, मग सदर मुदतीनंतर कोणाचीही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तो आमच्या अशिलावर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

ही जाहीर नोटीस दिली ता.१३/११/२०२४

**सही/-**
**ॲड. शशांक बळीराम साबळे**
**एम.बी.ए., एलएल.बी., ॲडव्होकेट**
**पत्ता : ४५, विशाल नगर,**
**आर. मिनिप्लेक्स थियटरच्या मागे,**
**जुळे सोलापूर, सोलापूर मो.नं.९७३०४७०७७७**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**


# सोलापुरात रात्री थंडीचा कडाका वाढला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि. १३ नोव्हेंबर-**
सोलापुरात रात्रीचा थंडीचा कडाका वाढला असून पहाटे आणि रात्री थंडी तर दिवसा ऊन अशा हवामानामुळे आजारांचे प्रमाण वाढल्याचे चित्र आहे. यंदा सोलापूरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात चांगला दमदार पाऊस झाला आहे. सोलापूर लगतहून जाणाऱ्या भीमा आणि सीना नद्यांमध्ये पाणी आहे. उजनी धरण अद्यापही ११० टक्के भरलेले आहे. पाऊस चांगला झाल्याने यंदा थंडी कडाक्याची राहणार आहे. याची चाहूल लागली आहे.

# शंकरराव खंडाळकर यांचे निधन

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**
नरसिंह नगर मोदी येथील मोची समाजाचे सामाजिक कार्यकर्ते शंकरराव जानप्पा खंडाळकर (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले आहे. इरिगेशन डिपार्टमेंट मुख्य आरेखक म्हणून निवृत्ती झाले. अंत्यविधी गुरुवारी (दि. १४) सकाळी अकरा वाजता मोदी स्मशानभूमी येथे होणार आहे. त्यांच्या पाठीमागे दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज यांचे सासरे होते.




केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम / A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

एआरएम शाखा : सर्कल ऑफिस बिल्डिंग, बालमट्टा रोड, मंगळुरू - 575001
**(भारत सरकारचा उपक्रम)**

## विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अंतर्गत जंगम आणि स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा, 2002 ची अंमलबजावणी सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 6 (2) सह वाचलेल्या नियम 8 (6) आणि 9 (1) ची तरतूद याद्वारे सर्वसाधारणपणे लोकांना आणि विशेषतः कर्जदारांना सूचना देण्यात येत आहे आणि खाली वर्णन केलेल्या जंगम आणि जंगम मालमत्ता गहाण ठेवलेल्या/ सुरक्षित कर्जदाराकडे शुल्क आकारले जाते, ज्याचा भौतिक ताबा घेतला आहे. कॅनरा बँकेचे अधिकृत अधिकारी जसे आहे तिथे, जसे आहे तसे वर विकले जातील, आणि 28/11/2024 रोजी जे काही आहे वसुलीसाठी रु. 33,99,24,830.16 (रुपये तेहतीस कोटी नव्याण्णव लाख चोवीस हजार आठशे तीस फक्त सोळा पैसे) 30/09/2024 रोजी तीस उत्तरदायित्व तसेच पुढील व्याज 01/10/2024 देय तारखेपर्यंत करारानुसार व्याजदर, आनुषंगिक खर्च, कॅनरा बँकेच्या .ठ. च् शाखा, सर्कल ऑफिसमुळे इतर शुल्क आणि खर्च इ. बिल्डिंग, मंगळुरु 575001 मे. शिवप्रियदर्शिनी कास्टिंग प्रायव्हेट लिमिटेड, त्याचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अण्णासाहेब सदाशिव चौगुला यांनी प्रतिनिधित्व केले. ज्ञात असलेल्या जंगम आणि स्थावर मालमत्तेचे तपशील आणि संपूर्ण वर्णन बोजा, जर असेल तर.

| Lot No. | मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | बयाणा रक्कम ठेव |
|---|---|---|---|
| **मालमत्ता 1: मालमत्ताधारकाचे नावः मेसर्स शिवप्रियदर्शिनी एंटरप्रायझेस** | | | |
| लॉट 1. | भूखंड क्रमांक ४८-अ म्हणून ओळखला जाणारा तो सर्व जमिनीचा तुकडा Sy मध्ये स्थित केंप्रसर औद्योगिक क्षेत्र. क्र. 536 होनागा गाव, काकती होबळी, बेळगाव तालुका, बेळगाव जिल्हा, ज्यामध्ये जाहिराती-मापने समाविष्ट आहे. दिनांक 9642/13-14 नुसार 2121.89 चौ.मी. 08/11/2013 औद्योगिक इमारतीसह त्यावर (1989 sq.mtrs ताबा प्रमाणपत्रानुसार दि 03/11/1997 कर्नाटक औद्योगिक क्षेत्र विकास मंडळ, बंगलोर.) सीमा: पूर्व : भूखंड क्रमांक 48/बी; पश्चिम : 60 रुंद रस्ता; उत्तर: भूखंड क्रमांक 47/ए-2; दक्षिण : भूखंड क्रमांक 49/ए. | रु. 3,42,25,000.00 | रु. 34,22,500.00 |
| लॉट 2: | सर्व हायपोथेकेटेड जंगम गुणधर्मांचा समावेश आहे. मध्ये स्थापित उपकरणे, वनस्पती आणि यंत्रसामग्री प्लॉट नं. 48, KIDB मध्ये वसलेली औद्योगिक इमारत, बेळगावातील RS क्रमांक 536 होनागा औद्योगिक येथे वसलेले आहे. क्षेत्र होनागा, काकती तालुका आणि जिल्हा बेळगावी. | रु. 60,32,000.00 | रु. 6,03,200.00 |
| **स्वतंत्र वैध बोली प्राप्त झाल्यास आणि संदर्भात यशस्वी झाल्यासच लॉट क्रमांक १ विकला जाईल लॉट २ चे आयटम. तथापि, पक्ष लॉट - १ आणि लॉट - २ दोन्हीसाठी बोली लावू शकतात आणि दोन्ही आयटम घेऊ शकतात.** | | | |
| **मालमत्ता 2: मालमत्ताधारकाचे नावः मेसर्स शुभम इंडस्ट्रीज (भागीदारी फर्म)** | | | |
| 2 | मालमत्ता (पुढील भाग कार्यालय आणि मागील समावेश बाजूचे औद्योगिक शेड/गोदाम आणि इतर सुविधा) भूखंड क्रमांक 49/A (भाग) आर.एस. क्रमांक 536 मोजमाप KIDB Honaga Industrial येथे 900 Sq.Mtrs क्षेत्र होनागा, बेळगावी. सीमा: पूर्व: प्लॉट क्रमांक 49/बी; पश्चिम : 60 रुंद रस्ता; उत्तर: भाग भूखंड क्रमांक 49; दक्षिण : भूखंड क्रमांक 50 ए. | रु. 1,17,29,000.00 | रु. 11,72,900.00 |
| **मालमत्ता 3: मालमत्ता मालकाचे नावः मेसर्स शिवप्रियदर्शनी कास्टिंग प्रा. लि.** | | | |
| 3 | मालमत्तेचा तो सर्व भाग आणि पार्सल प्लॉट नं.49-A (उत्तर भाग), R.S.No.536 मध्ये, 869.75 चौ.मी. KIDB औद्योगिक क्षेत्र, होनागा, बेळगाव. सीमा : पूर्व : भूखंड क्रमांक 49/बी; पश्चिम: रस्ता क्रमांक 4 म्हणजे 60 फूट रुंद रस्ता; उत्तर : भूखंड क्रमांक 48/अ; दक्षिण : भूखंड क्रमांक 49 (भाग) म्हणजे 49/अ (भाग) | रु. 87,21,000.00 | रु. 8,72,100.00 |

बयाणा रक्कम 27/11/2024 रोजी किंवा त्यापूर्वी संध्याकाळी 5.00 वाजता जमा केली जाईल. वरील मालमत्तेवर लिलावाच्या शीर्षकाला प्रभावित करणारे कोणतेही भार नाहीत आमच्या माहितीनुसार खरेदीदार.

अधिक माहितीसाठी श्रीमती शिमना हरिदास, मुख्य व्यवस्थापक, कॅनरा बँक, एआरएम यांच्याशी संपर्क साधा शाखा, मंडळ कार्यालय इमारत, मंगळुरू (फोन नं. 0824-2863367, 9361996755, 0824-2440469) ई-मेल आयडी: cb6296canarabank.com किंवा M/s. पीएसबी अलायन्स प्रा. लिमिटेड), (संपर्क नं.7046612345/ 6354910172/ 8291220220/ 9892219848/ 8160205051, ईमेल: support.ebkraypsballiance.com/ support.ebkrayprocure247.com).

**दिनांक : 08/11/2024**
**ठिकाण : मंगळुरू**
**सही/-**
**अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक,**

# सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, सोलापूर

**श्री पंचमुखी हनुमान नागरी सही. पतसंस्था म. शेळगी, सोलापूर**

**जा.क्र. झेड नोटीस/२०२४-२५ दिनांक : १३/११/२०२४**

**नमुना 'झेड' (Z Notice)**

म.स.सं.नियम १९६० मधील नियम १०७ (११)ड-१

## थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतचे नोटीस

ज्याअर्थी मला प्राप्त अधिकारानुसार मी हिप्परगे सुजाता मल्लिकार्जुन, विशेष वसुली व विक्री अधिकारीर श्री पंचमुखी हनुमान नागरी सहकारी पतसंस्था, मर्यादित, सोलापूर या पतसंस्थेचा खालील थकबाकीदारास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ खालील नियम अन्वये दिनांक १५/१२/२०२३ रोजी मागणी नोटीशीद्वारे वसुली दाखल्याप्रमाणे रक्कम भरण्याबाबत कळविले होते. तरीही त्यांनी रक्कम भरण्यास कसुर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. ऋणकोंना नोटीस देण्यात येत आहे की, खालील निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणारे अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ (११(ड-१) अन्वये रितसर बोजा नोंद करुन नोटीसीद्वारे ताबा घेतलेला आहे.

विशेष करुन थकबाकीदारांन आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येते की सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करु नये, आणि व्यवहार केल्यास श्री पंचमुखी हनुमान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शेळगी, सोलापूर यांच्या दिनांक २३/०३/२०२४ रोजी जप्ती आदेशातील बोजाची रक्कम रु. १७,०३/७४०/- व दिनांक २९/०४/२०२३ पासून रु. १५,७१,२३६/- वर १२ टक्केप्रमाणे खाते बार होईपर्यंतचे व्याज याला अधिन रहावे लागेल.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| अ. नं. | कर्जदाराचे नाव | मिळकतदार | दाखला क्र. व दिनांक | वसुलपात्र रक्कम | मिळकत क्रमांक | क्षेत्र | ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री मल्लिकार्जुन बसप्पा करकंब | श्री मल्लिकार्जुन बसप्पा करकंब | क्र. १३०/२०२३ दिनांक : १३/१२/२०२३ | रु. १८,९४,६९५/- | १४५/२ब/२/ प्लॉट नं. १७२ | ९२.९३.०० | १६/१०/२०२४ |

**ही ताबा नोटीस दिली असे : १३/११/२०२४**

शिक्का

**सही/-**
**हिप्परगे सुजाता मल्लिकार्जुन**
**विशेष वसूली व विक्री अधिकारी,**
**सोलापूर जिल्हा सह. पत. फेड. मर्या., सोलापूर**

# कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड,

**नोंदणीकृत कार्यालय, कटारे कॉम्पलेक्स, १४/३०, रविवार पेठ,**
**बी.विंग तळमजला गांधीनगर अक्कलकोट रोड सोलापूर - ४१३००६**
**CINL17119PN1980PLC022962 ई-मेल katarespinningmills@gmail.com**

## ३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाही अखेरकरिता अलेखापरिक्षीत स्थायी वितीय निष्कर्षाचा अहवाल (रु. लाखांत)

| अ. क्र. | विवरण | तिमाही समाप्त / 30 सप्टेंबर 2024 (अलेखापरिक्षत) | वर्ष ते तारीख आकडे/मागील वर्ष समाप्त 31 मार्च 2024 (लेखापरिक्षत) | मागील वर्षात संबधित ३ महिने संपले 30 सप्टेंबर 2023 (अलेखापरिक्षत) |
|---|---|---|---|---|
| 1 | एकूण उत्पन्न | 84.18 | 400.47 | 118.98 |
| 2 | कालावधीकरिता निव्वळ नफा(तोटा) (कर,अतिरिक्त व / वा अविविशेष बाबीपूर्व) | (47.23) | (206.05) | 4.97 |
| 3 | निव्वळ नफा / (तोटा) कर अतिरिक्त व / वा अविविशेष बाबीपश्चात) | (47.23) | (206.05) | 4.97 |
| 4 | कर पूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा(तोटा) (कर अतिरिक्त व / वा अविविशेष बाबीपश्चात) | (47.23) | (187.30) | 4.97 |
| 5 | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/तोटा समाविष्ट (कर पश्चात) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) | (47.23) | (187.30) | 4.97 |
| 6 | इक्विटी भाग भांडवल (दर्शनी मुल्य रु.१० प्रति शेअर) | 285 | 285 | 285 |
| 7 | राखीव (मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्याप्रमाणे पुनर्मुल्यांकन राखीव वगळून ) | -- | -- | |
| 8 | उत्पन्न प्रति शेअर<br>१. मुळ<br>२. सौम्य | (1.66) | (6.57) | 0.17 |

**टीप.**

अ) उपरोक्त हे SEBI च्या नियमन ३३ (दायित्व आणि प्रकटीकरण आवश्यकतांची सूची) विनियम, २०१५ च्या अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजमध्ये ३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीच्या आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. २०१५ समाप्त झालेल्या तिमाहीचे निकाल ३० सप्टेंबर २०२४ www.bseindia.com च्या वेबसाइटवर आणि कंपनीच्या www.katarespinningmillslimited.com वर उपलब्ध आहेत.

ब) वरील आर्थिक परिणामांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि कंपनीच्या संचालक मंडळाने १२ नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे.

**ठिकाण : सोलापूर**
**तारीख : 12/11/2024**

**कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड, करिता**
**सही /- किशोर ति. कटारे**
**डिन क्रमांक - 00645013**




# वकील बांधवांनी केला तौफिक शेख यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ नोव्हेंबर -**
शहर मध्य विधानसभा निवडणुकीतील अपक्ष उमेदवार तौफिक शेख यांचा ॲड. असीम बांगी यांच्या कार्यालय परिसरात शहरातील वकील मंडळींनी सत्कार केला.

यावेळी शेख यांना पुष्पहार अर्पण करत धर्मांद व जातीवादी पक्षाला थारा न देता तौफिक शेख सारख्या सच्चा माणसाच्या पाठीमागे आपण सर्वजण उभे राहण्याचा निर्णय काही वकील मंडळींनी घेतला.

ॲड. असीम बांगी यांच्या कार्यालयासमोर सत्कार कार्यक्रम पार पडला. यावेळी बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. सुरेश बापू गायकवाड, माजी उपाध्यक्ष ॲड. असीम बांगी, माजी सचिव ॲड. करण भोसले ॲड. खतीब वकील, ज्येष्ठ वकील ॲड. इनामदार, ज्येष्ठ वकील, ॲड. बडेखान सर, ज्येष्ठ वकील, ॲड रईसा मदनी, ज्येष्ठ वकील, ॲड. जाहिद दर्जी, ॲड. अब्दुल शेख, ॲड. परवेझ मुलाणी, ॲड. धनंजय येमुल, ॲड. फिरोज शेख, ॲड. इक्बाल शेख, ॲड. ऋषिकेश मट्रे, ॲड. आसिफ पटेल, ॲड. वसीम डोंगरी, ॲड. आकाश माने, ॲड. अब्दुल्ला खतीब, ॲड.सैफ शेख, ॲड. इरन्ना बिराजदार, ॲड. दनिया शेख आदींची उपस्थिती होती.


# PRECISION CAMSHAFTS LIMITED

PRECISION
Regd. Office : D5, M.I.D.C. Chincholi, Solapur, MH, 413006
CIN: L24231PN1992PLC067126

**Extract of unaudited Consolidated Financial Results for the Quarter and Half Year ended 30th September 2024 [(Regulation 47(1)(b) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015]**

(Rs. in lakhs),except Earnings Per Share)

| Sr. No. | Particulars | Consolidated | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended Sept. 30, 2024 | Half Year ended Sept. 30, 2024 | Quarter ended Sept. 30, 2023 |
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) |
| 1. | **Revenue From Operations** | **22,506.65** | **48,038.71** | **25,445.85** |
| 2. | Profit Before Exceptional Item & Tax | 1,966.94 | 3,459.34 | 1,058.43 |
| 3. | Profit Before Tax | 1,966.94 | 3,459.34 | 1,058.43 |
| 4. | Profit for the Period / Year | 840.18 | 2,002.13 | 842.93 |
| 5. | Total Comprehensive Income for the period/year, net of tax | 696.14 | 1,876.67 | 885.32 |
| 6. | Paid up Equity Share Capital (Equity Share of 10/- each) | 9,498.58 | 9,498.58 | 9,498.58 |
| 7. | Earnings per share (of Rs.10/- each) | | | |
| | Basic : | 0.89 | 2.11 | 0.89 |
| | Diluted : | 0.89 | 2.11 | 0.89 |

**Notes:**

1. The above financial results for the quarter and half year ended September 30, 2024 have been subjected to limited review by the statutory auditors of the Group and reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Holding Company at the meeting held on November 13, 2024.
2. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the Securities and Exchange Board of India ('SEBI') (Listing Obligations and Disclosure Requirements ('LODR')) Regulations, 2015. The full format of the unaudited Standalone & Consolidated Financial Results of the Company are available on the Stock Exchange's website **(www.bseindia.com and www.nseindia.com)** and also on the Company's website - **www.pclindia.in**.
3. These Financial Results have been prepared in accordance with Indian Accounting Standards ("Ind AS") prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 read with relevant rules issued there under and in terms of Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with SEBI circular no. CIR/CFD/FAC/62/2016 dated 5th July, 2016.
4. Key Standalone Financial information

(Rs. in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Standalone | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended Sept. 30, 2024 | Half Year ended Sept. 30, 2024 | Quarter ended Sept. 30, 2023 |
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) |
| 1 . | **Revenue From Operations** | **16,789.36** | **33,175.38** | **17,239.98** |
| | Profit Before Exceptional Item and Tax | 2,937.68 | 5,108.58 | 2,289.64 |
| | Profit Before Tax | 2,937.68 | 5,108.58 | 2,289.64 |
| | Profit for the period/Year | 1,836.32 | 3,636.65 | 1,986.11 |
| 2. | Total Comprehensive Income/ (loss) (after tax) | 1,843.33 | 3,650.66 | 1,988.45 |

**Place : Solapur**
**Date : November 13, 2024**

**For and on behalf of the Board of Directors**
**Sd/-**
**Ravindra R. Joshi**
**Whole-time Director & CFO**

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party** : Bharatiya Janata Party
***Name of the Election** : Maharashtra Legislative Assembly - 2024
**Name of State/UT** : Maharashtra
(1) Name of the Constituency : 248-Solapur City North
Name of the candidate : **Vijay Sidramappa Deshmukh**

| Sl.no | Criminal antecedents. | | |
|---|---|---|---|
| 1 | a. | Nature of the offences | 1) U/s. 188, 269, 270, 366 of IPC & u/s. 51 B Disaster management Act & u/s. 135 of Maharashtra Police Act, Disobeying order of Public Servant.<br>2) U/s.143, 188, 269, of IPC, u/s.51 B Disaster management Act & u/s. 135 of Maharashtra Police Act, member of unlawful assembly and disobeying order of public servant.<br>3) U/s. 188, 269, 366 of IPC & u/s. 135 of Maharashtra Police Act, u/s 51 B of disaster management Act, offence of Disobeying order of Public Servant. |
| | b. | Case no. | 1) SCC No.6277/2023<br>2) SCC No.6254/2023<br>3) Charge sheet not filed |
| | c. | Name of the Court | 1) RK Jangam JMFC, Solapur<br>2) MP Mardhekar JMFC, Solapur<br>3) Charge sheet not filed. |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | 1) No<br>2) No<br>3) No |
| | e. | Date of conviction, if any | NIL |
| | f. | Details of punishment undergone, if any | NIL |
| | g. | Any other information required to be given | The Cases are still under consideration before Hon'ble Court |
| 2. | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability"at the polls (not more than 100 words) | | Candidate Vijay Sidramappa Deshmukh has been very Senior Legislator. He has been Cabinet Minister of the State of Maharashtra. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3. | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

(2) Name of the Constituency: 248 - Solapur City North
Name of the candidate: Vijay Sidramappa Deshmukh
.........................................and so on

* In the case of election to Council of States or States or election to Legislative Council bye MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Date: 25.10.2024
Place: Mumbai.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
Chandrashekhar Bawankule
President,
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

## इति-उवाच...



काँग्रेसचा दावा होता, तिथे मित्रपक्षाने अगदीच चुकीचे उमेदवार दिले आहेत आणि आपला एकूण आकडा वाढविण्याच्या नादात त्या उमेदवारांची निवडून येण्याची अजिबात शक्यता नाही, असे उमेदवार पुढे आले आहेत. कुठल्या पक्षाचे त्याबद्दल मी बोलणार नाही.

**पृथ्वीराज चव्हाण,** काँग्रेसचे नेते



उद्धव ठाकरेंना समोर पराभव दिसत असल्याने ते बिथरलेत. लहान सहान गोष्टींवर कांगावा करताना दिसताहेत. अहो उद्धवजी, बॅगा फक्त तुमच्या तपासल्या जात नाही, तर प्रत्येकाच्या तपासल्या जातात. मात्र, तुमच्यासारखा पाणचटपणा कोणी करीत नाही. आम्हाला तेवढा वेळही नाही.

**चित्रा वाघ,** भाजपा



मोदी सरकारने वक्फ बिल आणले आहे, हा कायदा पास झाला, तर मशीद राहणार नाही, दर्ग्यांवर कब्जा केला जाईल. वक्फची संपत्ती ताब्यात घेणे हे त्यांचे एकच ध्येय आहे. पण, याचा मालक अल्ला आहे, त्यांना अल्लाची संपत्ती ताब्यात घ्यायची आहे.

**असदुद्दिन ओवैसी,** एमआयएमचे नेते



फक्त हातवारे करून आमदार होता येत नाही. एक युवराज वरळीकरांनी निवडून दिला. त्या युवराजाला निवडून तेथील जनता पश्चात्ताप करीत आहे. एका युवराजाला मत देऊन, जर मतदार पाच वर्षे पश्चात्ताप व्यक्त करीत असतील, तर या 'राज'पुत्राला तुम्ही मतदान करणार का?

**प्रिया सरवणकर**

## बोगस निवडणूक तपासणी पथकाने २५ लाख लांबविले

◆ **कोल्हापूर, १३ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने शासनाच्या तपासणी पथकांकडून सुरू असलेल्या तपासणीची हुबेहुब नक्कल करून बोगस पथकाने एका व्यावसायिकाची २५ लाख ५० हजारांची रोकड लांबविली. हा प्रकार पुणे-बंगळुरू महामार्गालगत तावडे हॉटेल उड्डाणपुलाजवळ घडला.

याबाबत व्यापारी सुभाष लक्ष्मण हारणे यांनी गांधीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांची पाच पथके संशयितांचा शोध घेत आहेत. व्यापारी सुभाष हारणे हे यात्रेत पाळणे लावण्याचा व्यवसाय करतात. ते सोमवारी झालेल्या व्यावसायाची रक्कम घेऊन पहाटेच्या सुमारास कारमधून तावडे हॉटेल येथे आले.

दरम्यान, २५ ते ३० वयोगटांतील अज्ञात पाच जणांनी हारणे यांची कार अडवली. विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर तपासणी सुरू आहे. ◂(वृत्तसंस्था)

# जुनी शिवसेना फोडण्याचे पुण्यकर्म पवार साहेबांनी केले

### छगन भुजबळांचा गौप्यस्फोट

◆ **नाशिक, १३ नोव्हेंबर**

शरद पवारांनी माझ्याबाबत आता का बोलले, हे मला कळले नाही. मात्र, शिवसेना फोडण्याचे पुण्यकर्म पवार साहेबांनी केले. पवार साहेबांनीच हे चांगले काम केले. ते जर केले नसते, तर आज फुटाफूट झाली नसती, असा सनसनाटी आरोप करीत शरद पवार यांनी केलेल्या टीकेवर छगन भुजबळ यांनी पलटवार केला आहे.

भुजबळांना आम्ही विधानसभा, विधानपरिषदेत संधी दिली, विरोधी पक्षनेते पद दिले. पण, त्यांनी काही उद्योग केले, त्यांना पद सोडावे लागले. ते तुरुंगात गेले. त्यांना भेटायला कोणी जात नव्हते. माझी मुलगी, आम्ही त्यांना भेटायला गेलो.



त्यांना पुन्हा संधी देत निवडून आणले, असे म्हणत शरद पवारांनी छगन भुजबळांवर थेट हल्लाबोल केला. त्यावर भुजबळ यांनी उत्तर दिले.

काँग्रेसमधून तुम्हाला दूर केले तेव्हा एकमेव माणूस छगन भुजबळ तुमच्या सोबत होता. मुकुल वासनिकांसह सर्व सांगत होते तुम्ही जाऊ नका, मी तुम्हाला मुख्यमंत्री करतो पण मी गेलो नाही. पवार साहेब तुमच्या प्रेमापोटी मी आलो होतो. माझ्यावर हल्ला झाला, तेव्हा पवार साहेब मला भेटण्यासाठी आले होते. पवार साहेब असे कसे काय विसरतात? आता हे सर्व मुद्दे काढण्याचे काय गरज आहे, जुने मुडदे उकरू नका, नव्या गोष्टी बाहेर आल्या, तर 'बात दूर तक जायेगी.' मात्र, पवार साहेबांबद्दल मला आदर आहे. तो कायम राहणार. पण, तुम्ही काही बोललात म्हणून मला खुलासा लागतोय्, असेही भुजबळ म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

### ...तर मला पद दिले नसते!

» बाळासाहेब ठाकरे यांनी मला आमदार, मंत्री केले. याबाबत मी आभार मानले आहे. शरद पवारांनी माझ्याबाबत आता का बोलले ते मला कळले नाही. माझ्यात काही तरी असेल म्हणूनच बाळासाहेबांनी मला मंत्रिपद दिले. माझ्यात काही नसते, तर मला पवार साहेबांनी पद दिले नसते, असे भुजबळ म्हणाले.

# अशोक चव्हाण यांनी अनुभवले चारही सभागृहांचे सदस्यत्व



### पित्याच्या विक्रमाची बरोबरी

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, १३ नोव्हेंबर**

शंकरराव चव्हाण आणि अशोक चव्हाण या पिता-पुत्रांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद सांभाळण्याचे भाग्य लाभले. देशात असे भाग्य आतापर्यंत चार राजकीय पिता-पुत्रांनाच लाभले. चव्हाण पिता-पुत्रांच्या राजकीय कारकीर्दीत आणखी दोन-तीन बाबतीत साम्य आहे.



शंकरराव चव्हाण आणि अशोक चव्हाण यांनी प्रत्येकी दोनवेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषवले. दुसरे साम्य म्हणजे शंकरराव चव्हाण यांनी संसदेच्या लोकसभा आणि राज्यसभा तसेच विधिमंडळाच्या विधानसभा आणि विधानपरिषद अशा चारही सभागृहांचे सदस्यपद भूषवले. तसेच भाग्य अशोक चव्हाण यांनाही लाभले. अशोक चव्हाण चारवेळा विधानसभेचे तर एकवेळा विधानपरिषदेचे सदस्य होते. लोकसभेत दोनदा सदस्य राहिलेले चव्हाण सध्या राज्यसभेत आहे.

चव्हाण पिता-पुत्रातील आणखी एक साम्य म्हणजे शंकरराव चव्हाण यांच्याप्रमाणेच अशोक चव्हाण यांनीही काँग्रेस सोडली. शंकरराव चव्हाण यांनी काँग्रेस सोडत महाराष्ट्र समाजवादी काँग्रेसची स्थापना केली. दोन वर्षांतच शंकरराव चव्हाण स्वगृही परतले. अशोक चव्हाण यांनी काँग्रेस सोडत आपला पक्ष न काढता भाजपात प्रवेश केला. पक्षात आल्याबरोबर चव्हाण यांना भाजपाने राज्यसभेत पाठवले आणि आपल्या वडिलांच्या चारही सभागृहाचे सदस्य होण्याच्या विक्रमाची बरोबरी केली.

शंकरराव चव्हाण यांनी केंद्रात अनेक महत्त्वाची मंत्रिपदे सांभाळली. अशोक चव्हाण यांना मात्र केंद्रात आतापर्यंत तरी एकदाही मंत्रिपद भूषवण्याची संधी मिळाली नाही. शंकररव चव्हाणांचा राजकीय वारसा जसा अशोक चव्हाण यांनी सांभाळला, तसाच आता अशोक चव्हाण यांचा राजकीय वारसा त्याची मुलगी श्रीजया सांभाळत आहे. भाजपाने श्रीजयाला विधानसभेची उमेदवारी दिली आहे.

वडिलांनंतर त्याच राज्याचे मुख्यमंत्रिपद मुलाला मिळण्याच्या चार घटना देशात घडल्या. तामिळनाडूत द्रमुकचे करुणानिधी अनेक वेळा मुख्यमंत्री होते. आता त्यांचा मुलगा एम. के. स्टॅलिन मुख्यमंत्री आहे. उत्तरप्रदेशात मुलायमसिंह यादव यांच्यानंतर त्यांचा मुलगा अखिलेश यादव मुख्यमंत्री झाला होता. जम्मू-काश्मिरात शेख □अब्दुल्ला यांच्यानंतर त्याचा मुलगा उमर अब्दुल्लाही मुख्यमंत्री झाला, आताही आहे. वडील मुलानंतर देशात बाप-लेकही मुख्यमंत्री होण्याची घटना घडली. मुफ्ती मोहम्मद सईद यांच्यानंतर त्यांची मुलगी मेहबुबा मुफ्ती मुख्यमंत्री झाल्या होत्या.

१९८५ मध्ये अशोक चव्हाणांनी राजकारणात प्रवेश केला. येताच प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस म्हणून त्यांच्यावर जबाबदारी आली. शंकरराव चव्हाण केंद्रातून महाराष्ट्रात मुख्यमंत्री म्हणून आल्यानंतर त्यांनी नांदेड लोकसभा मतदारसंघातील खासदारकीचा राजीनामा दिला. या जागेवर १९८७ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसने अशोक चव्हाण यांना उमेदवारी दिली. आपल्या पहिल्याच निवडणुकीत प्रकाश आंबेडकर यांचा पराभव करत चव्हाण विजयी झाले.

# भाजपासोबत जाण्याच्या बैठकीत अदानीही उपस्थित

### अजित पवारांचा मोठा गौप्यस्फोट

◆ **मुंबई, १३ नोव्हेंबर**



उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पहाटेच्या शपथविधीवर मोठा गौप्यस्फोट केला आहे. एका युट्यूब चॅनलला मुलाखत देताना अजित पवार म्हणाले, भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसला एकत्र आणण्यासाठी महत्त्वाची बैठक पार पडली होती त्यात उद्योगपती गौतम अदानीदेखील होते. नंतर मात्र अजित पवारांनी घूमजाव केला.

अजित पवार म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपाचे सरकार राज्यात आणण्यासाठी दिल्लीत पाच बैठका झाल्या. एक बैठक उद्योगपती गौतम अदानींच्या घरी झाली. यामधील एका बैठकीला अमित शाह, गौतम अदानी, देवेंद्र फडणवीस, प्रफुल्ल पटेल, पवार साहेब आणि आपण स्वतः उपस्थित होतो. त्या गोष्टी सगळ्यांनाच माहिती आहेत, असे अजित पवार म्हणाले. त्या गोष्टी आता काढून काही उपयोग नाही. त्याचा सर्व दोष माझ्यावर आला. त्याची संपूर्ण जबाबदारी मी घेतली आणि इतर नेत्यांना वाचवले, असे स्पष्टीकरण पवारांनी दिले आहे. पुढे अजित पवारांना त्या वेळी शरद पवारांच्या मनात काय होते, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, शरद पवारांच्या मनात काय आहे, हे जगातील कोणताही व्यक्ती सांगू शकत नाही. आमच्या काकीसुद्धा सांगू शकत नाहीत. ◂(वृत्तसंस्था)

### अशी बैठक झालीच नाही : सुप्रिया सुळे



» सुप्रिया सुळे म्हणाल्या, त्या बैठकीबद्दल अजित पवारांनाच विचारावे लागेल. अशी बैठक झाल्याची मला माहिती नाही. पहाटेच्या शपथविधीबाबत आम्हाला कुणालाच माहिती नव्हते. हे मी अनेकवेळा बोलले आहे. मला अजूनही तो दिवस आठवतो. मी झोपलेले होते. सदानंद सुळे यांनी मला उठवले आणि टीव्हीवर काय चालले ते बघायला सांगितले.

### माझी सगळ्यांमध्येच उठबस : शरद पवार



» मी गौतम अदानी नव्हे, तर रतन टाटा असो वा किर्लोस्कर यांच्यासह अनेकांच्या घरी जातो. महाराष्ट्रात औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्यांची इच्छा असलेल्यांच्या कामांना गती देणे, त्यांच्याशी सुसंवाद ठेवणे या गोष्टी राज्य म्हणून गरजेच्या असतात. माझी उद्योग जगतातील अनेकांकडे उठबस आहे, असे शरद पवार म्हणाले. अजित पवारांनी सांगितलेली एकही गोष्ट सत्य नाही, असा दावा त्यांनी केला.




झारखंड विधानसभेच्या पहिल्या टप्प्यात बुधवारी मतदान केल्यानंतर राज्याचे राज्यपाल संतोषकुमार गंगवार यांनी मतदान केल्याची खूण दाखवत मतदानाप्रती जागृती केली

# शिवसेनेतील सात जणांची हकालपट्टी

◆ **नवी मुंबई, १३ नोव्हेंबर**

बेलापूर विधानसभा मतदारसंघातील बंडखोर उमेदवार विजय नाहटा यांना मदत करणाऱ्या पक्षातील सात प्रमुख पदाधिकाऱ्यांची हकालपट्टी करण्याचा निर्णय अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे.

नाहटा यांच्या बंडखोरीला साथ देऊ नका, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली होती. ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनीही वाशीतील मेळाव्यात तशी भूमिका मांडली होती. त्यानंतरही नाहटा यांना साथ देणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बेलापूर विधानसभा मतदारसंघात भाजपाने मंदा म्हात्रे यांना उमेदवारी दिली असून, त्यामुळे पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी बंडखोरी करीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. महायुतीतील भाजपामध्ये हे बंड सुरू असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उपनेते विजय नाहटा यांनीही बंड करीत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.

संदीप नाईक यांच्या पक्ष प्रवेशापूर्वी काही दिवस नाहटा यांनी एका जाहीर कार्यक्रमात आपण शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करीत असल्याचे जाहीर केले होते. मात्र, संदीप नाईक यांच्या बंडाचा सुगावा लागताच शरद पवार यांनी नाहटा यांचा प्रवेश थांबिवला. पुढे संदीप नाईक यांच्या प्रवेशामुळे नाहटा यांना तुतारी हाती घेणे शक्यच झाले नाही. ◂(वृत्तसंस्था)

# बॅगा तपासल्या, चकल्या सापडल्या!

### अजितदादा म्हणाले, खा-खा बाबा...!!!

◆ **बारामती, १३ नोव्हेंबर**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बारामती येथे हेलिकॉप्टर आणि बॅगांची तपासणी करण्यात आली.

बारामतीत निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी अजित पवारांच्या हॅलिकॉप्टरची तपासणी केली. अजित पवारांच्या सर्व बॅगा तपासण्यात आल्या. अजित पवारांनी फोनवर बोलत असताना स्वतः बॅगा तपासण्यासाठी दिल्या. यावेळी एका बॅगेत चकल्या होत्या. बॅगेत चकल्या हातात घेऊन खा-खा बाबा...सगळ्या बॅगा तपास...त्या डब्यात पैसे आहेत का चेक कर...असे अजित पवार अधिकाऱ्यांना दिसले. दुसरीकडे गुलाबी जॅकेट देखील होते. एका बास्केटमध्ये थंड पाण्याच्या बाटल्यादेखील ठेवण्यात आल्या होत्या. ◂(वृत्तसंस्था)



**मिळाली परवानगी**

# शिवाजी पार्कवर रविवारी घुमणार मनसेचा आवाज

◆ **मुंबई, १३ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सांगता १८ नोव्हेंबरला होणार आहे. तत्पूर्वी रविवारी दादरच्या छत्रपती शिवाजी महाराज पार्कवर मनसे प्रमुख राज ठाकरेंची जाहीर सभा पार पडणार आहे. १७ नोव्हेंबरला शिवाजी पार्क मैदान मिळावे यासाठी उद्धव ठाकरे आग्रही होते. १७ नोव्हेंबरला बाळासाहेब ठाकरे स्मृती दिन असल्याने आमच्याशिवाय कुणाला परवानगी देऊ नका, अन्यथा संघर्ष होण्याची शक्यता आहे, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले होते. मात्र, नगरविकास विभागाकडून मनसेला सभेसाठी परवानगी मिळाल्याचे समोर आले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारसभेसाठी शिवाजी पार्क मैदान मिळावे यासाठी उद्धवसेना आणि मनसे यांनी केलेले अर्ज आणि स्मरणपत्रे मुंबई महापालिकेच्या संबंधित विभागाने नगरविकास खात्याकडे पाठवले होती. शिवाजी पार्कवर १० नोव्हेंबरला एकनाथ शिंदेंची सभा होणार होती. १२ नोव्हेंबरला भाजपाचीही सभा झाली नाही. १४ नोव्हेंबरला अजित पवार गटाला मैदानात सभा घेण्याची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे याच दिवशी महायुतीची एकत्रित सभा होण्याची शक्यता आहे.

सभा आणि विविध कार्यक्रमांसाठी शिवाजी पार्क ४५ दिवस आरक्षित असते. उद्धव ठाकरे गटाने अर्ज करण्यापूर्वीच मनसेने अर्ज केला होता. त्यामुळे प्रथम येणाऱ्या प्राधान्य या धर्तीवर मनसेला या मैदानावर सभा घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शिवाजी पार्क मैदानावरील राजकीय सभा या कायम चर्चेचा केंद्रबिंदू राहिल्या आहेत. मुंबईतील ३६ मतदारसंघातील माहीम, वरळी, शिवडी, भांडुप यासह विविध मतदारसंघांतील प्रमुख लढतीकडे सगळ्यांचे लक्ष लागून आहे. ◂(वृत्तसंस्था)

# उद्धव ठाकरे अन् मी एकत्र न येण्यासाठी प्रयत्न

### राज ठाकरेंचे खळबळजनक वक्तव्य

◆ **मुंबई, १३ नोव्हेंबर**

मी आणि उद्धव एकत्र येऊ नये, यासाठी अनेक लोक प्रयत्न करीत आहेत. त्यामध्ये आतले आणि बाहेरचे अशा सगळ्यांचा समावेश आहे, असे वक्तव्य मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केले. राज ठाकरे यांच्या या वक्तव्याने महाराष्ट्रातील राजकारणाला पुन्हा नवे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत यासंदर्भात भाष्य केले. तुम्ही उद्धव ठाकरे यांच्यासोबत एकत्र येणार का, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर राज ठाकरे यांनी उत्कंठा वाढवणारी अनेक वक्तव्ये केली. मी माझ्याकडून 'अलर्ट' असतो. अनेक गोष्टी माझ्या कानावर येत असतात. हा असे बोलला... तो तसे म्हणाला... अशा गोष्टी मला कळतात. पण, असल्या गोष्टी मी ऐकत नाही. उद्धव ठाकरे आणि मी एकत्र यायला पाहिजे, असे वाटणे वेगळे आहे. असे व्हायचे असते, तर ते कधीच झाले असते. समोरून त्यांच्याकडून काही लोक बोलत असतात, सांगत असतात, पण मी काय करणार, असे राज ठाकरे यांनी म्हटले.

उद्धव ठाकरे यांच्यासोबत एकत्र येणे हा माझ्या इच्छेचा विषयच नाही. प्रश्न असा आहे की, यात चर्चा होणे गरजेचे आहे. चर्चा जर होतच नसेल, तर त्या बोलण्याला काय अर्थ आहे. उद्धव ठाकरे यांना काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस जवळची वाटते, असे राज ठाकरे म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

### भाजपासोबत 'कम्फर्टेबल'

» मनसेच्या पाठिंब्यावर भाजपाचा मुख्यमंत्री होणार, असे विधानही राज ठाकरेंनी केले होते. त्यासंदर्भात ते म्हणाले, सध्याचे वातावरण तसे आहे, ज्यामुळे राज्यात महायुतीचे सरकार हे आमच्या पाठिंब्याशिवाय स्थापन होऊ शकणार नाही. जर विषय भाजपाचा असेल तर, मी जेव्हा शिवसेनेत होतो तेव्हापासून आणि माझा पक्ष काढल्यानंतरही माझे चांगले संबंध भाजपासोबत चांगले राहिले. प्रमोद महाजन, गोपीनाथराव, नितीनजी या सर्वच नेत्यांसोबत माझे सुरुवातीपासून संबंध आले. त्यामुळे, आपल्यासाठी एक कम्फर्ट झोन असतो, मला वाटते भाजपासोबत मी पहिल्यापासून कम्फर्टेबल आहे, ज्यांसोबत मी चर्चा करू शकतो.

# स्थिर पथकाला हेलिकॉप्टर-विमान तपासणीचा अधिकार

### आचारसंहिता नियमावली काय सांगते?

◆ **मुंबई, १३ नोव्हेंबर**

सध्या निवडणुकीतील प्रचाराच्या रणधुमाळीत नेत्यांच्या बॅगा तपासण्याचा मुद्दा जोर धरत आहे. विरोधी पक्षातील नेत्यांना आमच्याच बॅगा तपासल्या का जात आहेत, असा प्रश्न पडत असून दुसरीकडे सत्तापक्षातील नेत्यांच्याही बॅगा तपासल्या जात आहेत.

निवडणूक काळासाठी लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेमध्ये मतदारांना राजकीय पक्षांनी अथवा उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे प्रलोभन दाखवू नये, अशी तरतूद आहे. त्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या अंलबजावणी यंत्रणा आणि प्रत्येक विधानसभा मतदार संघामध्ये स्थिर सर्वेक्षण पथके (एसएसटी) व भरारी सर्वेक्षण



पथके (एफएसटी) यांची नेमणूक केलेली असते. दरम्यान, निवडणूक आयोगाने याबाबत पत्रक प्रसिद्धी करून माहिती दिली आहे.

### स्टार प्रचारकांच्या हेलिकॉप्टर्स व विमानाची तपासणी

महाराष्ट्रात निवडणुकीसाठी अशी एकूण सहा हजार पथके तैनात असून १९ अंमलबजावणी यंत्रणा कार्यरत आहेत. स्थिर सर्वेक्षण पथके व भरारी सर्वेक्षण पथकांना यांना प्रत्येकच वाहन तपासून संशयास्पद काही आढळले, तर पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना आहेत. निवडणूक काळात विविध पक्षांचे मान्यवर नेते व स्टार प्रचारक हवाई दौरे करतात. त्यांच्या हेलिकॉप्टर्स अथवा विमानाची देखील तपासणी केली जाते. अशा प्रकारे सर्वच नागरिकांच्या वाहनांची तपासणी केली जाते व त्यामध्ये राजकीय पक्ष किंवा इतर कोणत्याही प्रकारचा अपवाद केला जात नाही.

### स्थिर सर्वेक्षण पथकात कोण?

स्थिर सर्वेक्षण पथक ज्या ठिकाणी नेमलेले असते तेथून जाणाऱ्या प्रत्येक वाहनाची तपासणी होते. पथकामध्ये एका पोलिस कॉन्स्टेबलसह महसूल व अन्य विभागाच्या समावेश असतो. अशी तपासणी करताना संशयास्पद काही आढळले नाही, तर नागरिकांना त्रास होणार नाही, याची दक्षता घेतली जाते. संशयास्पदरीत्या आढळून आलेला पैसा, दारू, मौल्यवान धातू आणि इतर वस्तू जप्त करून नियमाप्रमाणे कारवाई केली जाते. सर्वच नागरिकांनी याबाबत सहकार्य करून निष्पक्ष व चांगल्या वातावरणात निवडणुका पार पाडण्यामध्ये सहभागी होणे आवश्यक असते. ◂(वृत्तसंस्था)



केरळातील वायनाड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीदरम्यान काँग्रेसच्या नेत्या प्रियांका वढेरा यांनी बुधवारी मतदान केंद्राला भेट दिली

## मतदान करताना...

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांची मतदान प्रक्रिया २० नोव्हेंबरला पार पडणार आहेत. या मतदानामध्ये सहभागी आपले लोकशाहीचे कर्तव्य पार पाडण्यासाठी आपण सारेच उत्सुक आहोत. मतदानात सहभागी होण्यासाठी मतदार ओळखपत्राशिवाय अजून १२ प्रकारची ओळखपत्रे ग्राह्य धरली जाणार आहेत असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. मतदार ओळखपत्र सादर करता येत नसेल तर आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागाद्वारे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅनकार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तवेज, केंद्र अथवा राज्यशासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधान परिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळख पत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे पुरावे मतदानासाठी स्वीकारले जाणारा आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक आहे. ओळखपत्र जवळ ठेवा. मतदान करा. लोकशाहीतला आपला हक्क बजावा. आपले सरकार निवडून द्या.

निवडणूक कुजबूज

■■■




# महाराष्ट्रामध्ये 'हरियाणा' पॅटर्न

**महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मराठा समाजाचे नेहमीच वर्चस्व राहिले आहे आणि सर्व राजकीय पक्ष या समाजाला आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत; मात्र या वेळी भाजपने संपूर्ण निवडणूक प्रचारामध्ये मराठ्यांबरोबरच ओबीसी समाजाला महत्त्व दिले आहे, असे दिसते**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या महाराष्ट्रातील निवडणूक प्रचारसभांमध्ये 'काँग्रेस विभाजनाचे राजकारण करत असून जातगणनेच्या माध्यमातून एका जातीला दुसऱ्या जातीविरुद्ध उभे करायचे आहे', असे म्हटले आहे. पंतप्रधान म्हणाले, की काँग्रेसला अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी समाजाची प्रगती नको आहे. मंडल राजकारणाच्या आगमनानंतर ओबीसी जाती एकवटल्या आणि काँग्रेस सतत खालावत चालली आहे आणि त्यामुळे काँग्रेसला ओबीसी समाजाची एकजूट कमकुवत करून तोडायची आहे, असेही पंतप्रधान म्हणाले. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी गेल्या काही वर्षांपासून राजकारणामध्ये ओबीसींच्या हक्क आणि सहभागासाठी सातत्याने आवाज उठवत आहेत. मोदी यांनी 'एक है तो सेफ है'चा नारा दिला, तर याआधी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी 'बाटेंगे ते काटेंगे' या घोषणेद्वारे हिंदू जातींच्या ऐक्याची भाषा केली. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रामध्ये मराठा आरक्षणाच्या मागणीचे आंदोलन तीव्र झाल्याने महाराष्ट्रातही ओबीसी विरुद्ध मराठा समाज असा संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. मंडल आयोगाच्या अहवालानंतर ओबीसी समाजाला आरक्षण मिळाले; मात्र मराठा समाज सातत्याने आरक्षणाची मागणी करत आहे. महाराष्ट्रातील ओबीसी समाजाची राजकीय ताकद पाहून अनेक राजकीय पक्षांनी मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी समर्थन दिले; परंतु ओबीसींचा मराठा समाजाला आरक्षण देण्यास विरोध आहे.



महाराष्ट्रामध्ये ओबीसी समाजाची लोकसंख्या ३८ टक्के तर मराठा समाजाची लोकसंख्या ३३ टक्के आहे. महाराष्ट्र लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती आघाडीला मराठा समाजाचे प्राबल्य असलेल्या जागांवर राजकीय फटका बसल्याचे सांगण्यात आले. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपला मोठा फटका बसला. महायुती सरकार विशेषतः एकनाथ शिंदे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि आंदोलन करणाऱ्या मराठा समाजाच्या बाजूने आहे, असे वाटल्याने लोकसभा निवडणुकीमध्ये ओबीसी मतदार भाजपवर नाराज होते. लोकसभा निवडणुकीमध्ये हा समाजही भाजपपासून दूर गेला; परंतु लोकसभेला बसलेल्या फटक्यानंतर महायुतीने जरांगे यांना अजिबात किंमत दिली नाही. आता जरांगे यांनी पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला आहे.

ओबीसी मतदार पाठीशी राहावेत, म्हणून भाजप सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. कारण लोकसभा निवडणुकीच्या निकालांवरून दिसून आले आहे, की महाविकास आघाडीसोबत मराठा समाज अधिक दिसत आहे. महाराष्ट्रातील २८८ जागांपैकी १७५ जागांवर ओबीसी मतदार आहेत, तर मराठा समाजाचा प्रभाव बहुतांशी मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये आहे. ११६ जागांवर मराठा समाजाचा प्रभाव आहे. महाराष्ट्रामध्ये ओबीसी मते मिळविण्यासाठी विदर्भामध्ये मोठी लढत सुरू आहे. कारण येथील ६२ पैकी ३६ जागांवर ओबीसी जातीच्या मतदारांचा चांगला प्रभाव आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मान्य केले, की महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये ओबीसी पहिल्यांदाच इतक्या प्रमाणात एकत्र आले आहेत. ओबीसी चेहऱ्याचा हरियाणामध्ये भाजपला फायदा झाला. भाजप नेत्यांचे म्हणणे आहे की, आपल्या रणनीतीचा एक भाग म्हणून पक्ष ओबीसींमधील अज्ञात आणि लहान जाती गटांपर्यंत पोहोचत आहे आणि त्याचा फायदा नुकत्याच झालेल्या हरियाणा निवडणुकीमध्ये झाला आहे.

हरियाणा विधानसभा निवडणुकीमध्ये ओबीसी चेहरा नायबसिंग सैनी यांना आघाडीवर ठेवण्याचा भाजपला फायदा झाला. हरियाणातील काँग्रेसच्या जाट चेहऱ्याच्या भूपेंद्रसिंग हुडा यांच्या विरोधात ओबीसी जाती एकत्र आल्या आणि भाजपने अत्यंत अवघड समजली जाणारी निवडणूक जिंकली. महाराष्ट्रामध्येही भाजपला हरियाणाची पुनरावृत्ती करायची आहे. विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील ओबीसींच्या छोट्या जाती समूहांवर लक्ष केंद्रित करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. महाराष्ट्राच्या निवडणुका जाहीर होण्यापूर्वी मोदी सरकारने केंद्रीय ओबीसी यादीमध्ये सात नवीन जाती गटांचा समावेश केला होता आणि महायुती सरकारने ओबीसींसाठी क्रिमी लेयरदेखील वाढवले होते. हे पाऊल ओबीसी समाजाला आपल्या बाजूने आणण्यासाठी मानले जात होते.

महाराष्ट्रामध्ये भाजप ओबीसी गटांवर लक्ष केंद्रित करत आहे. त्यात तेली, बंजारा, पवार, भोयर, कोमटी, सोनार, गोंड आणि इतर दोन डझन जातींचा समावेश आहे. यापूर्वी १९८० मध्ये भाजपने 'माधव फॉर्म्युला' वापरला होता. माळी, धनगर आणि वंजारी समाजाला एकत्र आणले होते. यामुळे पक्षाला ब्राह्मण–बनिया समाज आणि मराठा समाजाच्या पक्षापासून वेगळे होऊन महाराष्ट्रामध्ये जातीय आधार निर्माण करण्यास मदत झाली.

रण तापले

काँग्रेस उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये ओबीसी समाजामध्ये मोडणाऱ्या धनगर समूहाला आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहे. ओबीसी लोकसंख्येपैकी नऊ टक्के धनगर समूह आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) धनगर समाजाला भाजपच्या अपूर्ण आश्वासनाची आठवण करून देत आहेत. भाजपने धनगर समाजाला अनुसूचित जमातींमध्ये समावेशाचे आश्वासन दिले होते; परंतु ते प्रत्यक्षात आले नाही.

■■■

# मावळात शेळके विरोधी सर्व

महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आमदार सुनील शेळके आणि राष्ट्रवादीचे बंडखोर आणि संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अपक्ष उमेदवार बापू भेगडे यांच्यातच मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये थेट लढत होत आहे. शेळके यांच्या उमेदवारीला सुरुवातीपासूनच विरोध करणाऱ्या मावळातील भाजप नेत्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार पक्ष, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष, काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मनसे या पक्षांच्या स्थानिक नेत्यांनी बापू भेगडे यांना पाठिंबा दिला आहे.

**मावळमध्ये अजित पवार गटापुढे अपक्ष उमेदवाराचे मोठे आव्हान आहे. या उमेदवाराला सर्व पक्षांचा पाठिंबा मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार सुनील शेळके विरुद्ध राष्ट्रवादीचे बंडखोर अपक्ष उमेदवार बापू भेगडे यांच्यामध्ये मुख्य लढत होत आहे.**

मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये सहा जण आपले नशीब अजमावत आहेत. भेगडे यांना पिपाणी ही निशाणी मिळाली आहे. दरम्यान, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडून शेळके आणि भेगडे दोघेही इच्छुक होते; मात्र भेगडे यांना उमेदवारी पासून बाजूला करण्यासाठी राज्य कृषी शिक्षण आणि संशोधन महामंडळाचे उपाध्यक्षपद पक्षाने देऊ केले होते; मात्र ते पद नाकारून मला मावळची उमेदवारी द्या असा आग्रह पक्षाकडे धरला होता; मात्र पक्षाने शेळके यांना उमेदवारी दिल्याने नाराज झालेल्या भेगडे यांनी पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदाचाही राजीनामा देऊन पक्षाविरोधात बंड पुकारले होते. २०१९ मध्ये बापू भेगडे यांनीच पुढाकार घेऊन शेळके यांना भाजपमधून राष्ट्रवादीत प्रवेश करून अजित पवार यांना साकळ घालून सुनील शेळके यांना उमेदवारी देण्याचा आग्रह केला होता. भाजपचे बाळा भेगडे यांच्या विरोधात सर्व पक्ष एकत्रित येऊन शेळके यांना भरघोस मतांनी निवडून आणले होते; मात्र आता पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. त्या वेळी पाच वर्षासाठीच शेळके यांना आमदार करायचे आणि पुढल्या म्हणजेच २०२४ ला दुसऱ्या कोणाला तरी संधी द्यावी, असे ठरले होते असे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते बोलतात; मात्र शेळके यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे तिकीट जाहीर होताच भेगडे यांनी बंड करून सर्व मित्र पक्षांना सोबत घेऊन अपक्ष निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, मावळमध्ये शेळके यांच्या वर नाराज असलेले सर्व राजकीय पक्ष एकवटले आहेत. भेगडे यांना विजयी करण्यासाठी भाजप नेत्यांनी पदाचे राजीनामा दिले. त्याबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष, काँग्रेस, मनसे, यांच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनीही भेगडे यांना समर्थन दिले आहे. भेगडे यांच्यासोबत मावळातील सर्व नेते असले, तरी शेळके यांनी ४२ हजार कोटी रुपयांचा निधी आणल्याचा दावा केला जात आहे.

लक्षवेधी लढत

मावळातील कान्हा फाटा येथे जिल्हा रुग्णालय तयार केले. एकविरा देवी गडावर रोपवे चेही भूमिपूजन करण्यात आले. पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोणावळ्यात स्काय वॉकसारखा मोठा प्रकल्प आणला. वडगाव येथे तहसील कार्यालय, पोलिस ठाणे, वन विभाग यासाठी मोठी इमारत तयार केली आहे. हे होत असताना मावळात मोठ्या प्रमाणात विकासकामे करत सिमेंटचे रोड पाणी यासारखे अनेक उपक्रम राबवून मावळचा विकास केला. त्यामुळे सध्या स्थितीत जनता शेळकेंच्या पाठीमागे राहते, की भेगडे यांच्यासोबत मावळातील सर्व नेते असल्याने बाजी कोण मारणार हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे.





■■■

# या नेत्यांकडे सगळ्यांचे लक्ष

मुद्दे आणि गुद्दे

२०२४ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांची रंगत रोजच वाढते आहे. विविध पक्ष, त्यांचे जाहीरनामे आणि प्रचार यांची रणधुमाळी चालू आहे. अनेक मतदारसंघांमध्ये यंदा अनेक तरुण उमेदवार उभे आहेत. त्यामुळे त्या ठिकाणच्या निवडणुका प्रतिष्ठेच्या ठरल्या आहेत. बारामती मतदारसंघामध्ये युगेंद्र पवार उभे आहेत. ते यंदा प्रथमच रिंगणात उतरले आहेत आणि त्यांची लढत त्यांच्या काकांशीच म्हणजे अजितदादा पवार यांच्याबरोबर होणार आहे. अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण भोकर मतदारसंघातून उभ्या आहेत. राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे माहीम मतदारसंघामधून लढत आहेत. त्यांचीही ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. उद्धव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे पुन्हा एकदा वरळी मतदारसंघातून उभे राहिले आहेत. त्यांनी पर्यावरणमंत्री म्हणून काम केले आहे. रोहित पवार यांचीदेखील हे दुसरी विधानसभा निवडणूक आहे. ते पुन्हा एकदा कर्जत जमखेड येथूनच निवडणूक लढवणार आहेत. सुजय विखे पाटील प्रथमच लोकसभेसाठी उभे राहिले तेव्हा त्यांनी अहमदनगर मतदारसंघातून विजय मिळवला होता. पण यंदा लोकसभेला मात्र त्यांचा पराभव झाला. आता ते संगमनेरमधून निवडणूक लढवत आहेत. सुनील तटकरे यांच्या कन्या अदिती तटकरे बालकल्याण खाते सांभाळत होत्या. त्या यंदा श्रीवर्धन मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत.



या तरुण उमेदवारांच्या लढतीकडे साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

■■■

# अमित देशमुख यांच्यापुढे भाजपचे तगडे आव्हान

**लातूर शहर विधानसभा मतदारसंघामधून विलासराव देशमुख यांचे ज्येष्ठ पुत्र अमित देशमुख चौथ्यांदा निवडणूक लढवत आहेत. यापूर्वी देशमुख यांनी तीन वेळा विधानसभा निवडणूक जिंकली आहे. या वेळी मात्र प्रथमच त्यांना भाजपकडून तगडे आव्हान देण्यात आले आहे.**

लातूर शहर विधानसभा मतदारसंघामध्ये जातीय गणिते महत्त्वाची असतात. येथे लिंगायत आणि मराठा समाज प्रबळ आहे. या वेळी भाजपने माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांची सून डॉ. अर्चना पाटील यांना तिकीट दिलेले आहे. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर डॉ. पाटील यांनी भाजपत प्रवेश केलेला आहे. त्यातच वंचित बहुजन आघाडीने विनोद खटके यांना उमेदवारी दिलेली आहे. त्यामुळे कागदावर तरी ही निवडणूक तिरंगी असली, तरी मुख्य लढत देशमुख आणि चाकूरकर घराण्यात होणार असल्याने दोन्ही घराण्याची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. देशमुख यांच्या आधी त्यांचे वडील आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख या मतदार संघाचे १९८० पासून प्रतिनिधीत्व करीत आलेले आहेत. या ठिकाणी विलासरावांचा वारसा अमित देशमुख यांनी २००९ पासून चालविण्यास सुरुवात केली आहे. सलग तीन वेळा अमित येथून निवडून आलेले आहेत. भाजपकडून त्यांना फारसे तोडीचे उमेदवार दिले जात नाहीत अशी येथील मतदारांची धारणा होती. त्यामुळे अमित यांचा विजय एकहाती होत असे. त्यांना भाजपकडून फारसे तगडे आव्हान दिले जात नव्हते. यंदा माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या सुनेला भाजपने देशमुख यांच्या विरोधात उभे केले आहे.




डॉ. अर्चना पाटील सुशिक्षित असून आपल्या रुग्णालयाच्या माध्यमातून त्यांचा जनसंपर्क मोठा आहे. २०१९ पासून त्या निवडणुकीची तयारी करीत आहेत; परंतु कौटुंबिक कारणांनी त्यांनी तेव्हा निवडणूक लढविली नव्हती. दुसरीकडे त्यांचे सासरे शिवराज पाटील चाकूरकर यांनी आपली सून भाजपत गेली असली, तरी आपण भाजपत प्रवेश केलेला नाही असे म्हटले आहे. शिवराज पाटील गेली अनेक वर्षे सक्रिय नसल्याने त्यांचे कार्यकर्तेही देशमुख यांच्याकडे वळले असल्याचे म्हटले जात आहे. पाटील यांची भिस्त सासऱ्यांच्या पुण्याईवर अवलंबून आहे, तर अमित यांच्या पाठीशी वडीलांची पुण्याई आहे. त्यामुळे कोणाचा विजय होतो. याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी काँग्रेसला दलित आणि मुस्लिम मते मिळालेली होती; परंतु लातूर शहर विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची मते खाण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद खटके यांचा काय फायदा होतो, यावर देशमुख यांचे भवितव्य अवलंबून आहे. डॉ. पाटील या लिंगायत समाजाच्या असल्याने त्यांना लिंगायत समाजाचा पाठिंबा मिळणार असल्याचे सांगितले जात असले, तरी देशमुख यांना लिंगायत समाजाची मते मिळण्याची शक्यता अधिक आहे.

लढाई रंगली

■■■

# स्वप्ने खरी होतात का?

जनतेला दाखवली गेलेली ही स्वप्ने खरी होतात का? स्पष्ट सांगायचे तर उत्तर 'नाही' असेच आहे. कारण तिथे सत्ताधारी पक्षाची इच्छाशक्ती कमी पडते. त्याचबरोबर सत्तेवर येणाऱ्या पक्षाला काहीही काम करू न देण्याची शपथ घेणारा विरोधी पक्ष पुन्हा नव्या जोमाने आणि ताकदीने उभा राहतो आणि विरोधासाठी विरोध करत राहतो. पण खरेच लोकांना हे हवे आहे? आजवर झाले तेच आणि तसेच? खरेच का लोकांना या रेवडी योजना हव्या आहेत का? मुळात योजना अपेक्षित वर्गापर्यंत पोचतात का? बरेचदा तर त्यातील पळवाटा शोधून गरज नसलेल्या लोकांची घरे भरली जातात. हे सारे बंद व्हायला हवे. कारण लोकांना खरोखरच या फुकट योजना नको आहेत. त्यांना काही तरी ठोस हवे आहे. काही काळ चालू राहून नंतर बंद पडणारे कोणतेही फायदे मिळवण्यापेक्षा कायम उपयोगी ठरेल असे काही लोकांना हवे आहे. तसे पाहिले तर लोकांच्या अपेक्षा खूप कमी आहेत. त्यांना साधेसुधे आणि शांत जीवन हवे आहे. मोकळी आणि शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि सकस अन्न हवे आहे. चांगले शिक्षण हवे आहे. केवळ मुंबई किंवा पुण्यासारख्या कोंडलेल्या शहरात नव्हे तर जो जिथे राहतो तिथेच त्याला शिक्षणाच्या आणि नोकरीच्या संधी हव्या आहेत. प्रवासासाठी विनाखड्ड्यांचे रस्ते हवे आहेत. गरज पडेल तेव्हा उत्तम दर्जाच्या आरोग्य सेवा हव्या आहेत. शहरात जागोजागी भरपूर झाडे आणि बगीचे हवे आहेत.

थोडक्यात, जगण्यासाठी आवश्यक ते लोकांना हवे आहे. लहान मुले, तरुण, ज्येष्ठ आणि अतीज्येष्ठ या प्रत्येकालाच सहज आणि सुखद जगण्यासाठी या किमान गोष्टी हव्या आहेत आणि महत्वाचे म्हणजे यासाठी कष्ट करायला जनता तयार आहे. आयत्या मिळणाऱ्या पैशांपेक्षा त्यांना स्वत: मेहनत करून जगायला अधिक आवडणार आहे. त्यांना माणसासारखे जगायचे आहे. जगण्याचा आनंद घ्यायचा आहे. लोकांना सुरक्षा हवी आहे. लहान मुलांना आणि महिलांना मोकळेपणाने जगण्याची संधी हवी आहे. शाळांच्या जवळपास, त्यांना आवडणाऱ्या गोळ्या चॉकलेट्सच्या माध्यमातून लहान मुलांना ड्रग्सच्या नादी लावणाऱ्या समाजविघातकांपासून सुरक्षा हवी आहे. विनयभंग आणि बलात्कारासारख्या संकटांना सामोऱ्या जाणाऱ्या स्त्रियांना आणि मुलींना त्या क्रूर नराधमांपासून सुरक्षा हवी आहे. गैरव्यवहार करणारा, मग तो कुणीही असो, योग्य शिक्षा आणि तीही लवकरात लवकर झाली पाहिजे ही आज लोकांची अपेक्षा आहे. गुन्हे आणि अपराध करणाऱ्याला पाठीशी घालणारा कुणीही असो, शिक्षा झालीच पाहिजे अशी लोकांची अपेक्षा आहे. आपण निवडून देत असलेल्या उमेदवारांचे चारित्र्य स्वच्छ असावे, त्यांना खरोखरीच देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीची तळमळ असायला हवी, अशी लोकांची अपेक्षा आहे. खरा आणि कोणत्याही दबावाशिवाय मिळणारा न्याय लोकांना हवा आहे.



■■■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# दिवाळीनिमित्त गावी आलेल्या महिलेवर अन् तिच्या कुटुंबावर हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ नोव्हेंबर-**




दिवाळीनिमित्त पती मुलांसह गावी आलेल्या महिलेवर व त्यांचे दीर भावजयवर चार अनोळखी इसमांनी घरासमोर येऊन हल्ला चढवला असल्याची फिर्याद जखमी जयश्री विकास आरगडे (सध्या रा. इंदापूर) या महिलेने चार अनोळखी इसमाविरुद्ध तालुका पोलिसांत दिली आहे.

ही घटना तावडी गावात १० नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडली. फिर्यादीच्या जबाबानुसार, त्या व त्यांचे पती विकास आरगडे हे तावडी येथे दिवाळी सणानिमित्त आले होते. चार अनोळखी इसमांनी त्यांच्या घराबाहेर येऊन दरवाजा वाजवला, कोण आहे पाहण्यासाठी घराबाहेर आले असता सदर फिर्यादीस तुच का संजय आरगडेबरोबर भांडत असते, असे म्हणत संजय याने तुमचे बघायला पाठवले म्हणत महिलेस चापट मारली व ढकलून दिले. दरम्यान तिचे मंगळसूत्र तुटून गहाळ झाले. तिच्या पतीवर काठ्यांनी मारहाण करण्यात आली, झाले.घटनेत फिर्यादीचे दीर दशरथ आरगडे आणि जाऊ सुप्रिया आरगडे भांडण सोडवण्यास आले असता त्यांनाही मारहाण झाली. सुप्रिया यांचे मंगळसूत्र तुटले व गहाळ झाले. दशरथ यांना वीट मारुन जखमी करण्यात आले. तुम्ही संजय आरगडेचा नाद करायचा नाही, असे म्हणत तुम्हाला बघून घेतो, असे म्हणत निघून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे .

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दोन कर्मचाऱ्यांना मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ नोव्हेंबर-**



सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मार्केट यार्ड शाखेत दोन कर्मचाऱ्यांना म ारहाण केल्याची घटना घडली आहे. बँक इन्सपेक्टर भारत बिरु भोसले यांनी शहर पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरुन संशयित आरोपी अतुल सुर्यकांत चिकणे (वय २०, रा. गुळपोळी, ता. बार्शी) याचे विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

तक्रारीनुसार, दि. ११ नोव्हेंबर रोजी दुपारी साधारण ३.३० वाजता अतुल चिकणे बँकेत येऊन आईच्या नावे मागितलेल्या कर्जाचे काय झाले असे इन्सपेक्टर भोसले यांना विचारणा केली. त्यावेळी भोसले यांनी त्यास थांबा माहिती देतो, असे सांगितल्यावर, चिकणे अचानक रागात येऊन, तुम्ही बँकेत बसून कसली कामे करता, ते बघतोच असे धमकीपूर्ण वक्तव्य केले.

यानंतर त्याने भोसले यांना शिवीगाळ करत त्यांच्या चेहऱ्यावर हाताने मारहाण केली. भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या वरिष्ठ बॅंक इन्सेक्टर दत्तात्रय वांगदरे यांना देखील चिकणे याने तोंडावर हाताने मारहाण केल्याचा प्रकार घडला. म ारहाणीनंतर आरोपी तेथून निघून गेला. भोसले यांनी याप्रकरणाची फिर्याद दाखल केली असून चिकणे याच्यावर सरकारी काम ात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आहे.

# पाथरी येथुन १५ हजार रुपये किमतीच्या शेळ्या व बोकडांची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ नोव्हेंबर-**

तालुक्यातील पाथरी येथे एका शेतकऱ्याच्या गोठ्यातून दोन शेळ्या व तीन बोकड चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी रफिक अहमद शेख यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, १० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता ते व त्यांचे पुतणे हसन काशीम शेख यांनी गोठ्यातील सर्व जनावरे चारण्यासाठी नेली होती. दुपारी ३ वाजता जनावरे घरी आणल्यानंतर, त्यांनी गोठ्यात गाई-म्हशी बांधून घेतल्या. घरासमोर उभ्या असलेल्या दोन शेळ्या व तीन बोकड त्यावेळी दिसले नाहीत. कुटुंबीयांसह त्यांनी शेळ्या व बोकडांचा आसपासच्या परिसरात शोध घेतला, मात्र ते मिळाले नाहीत. त्यामुळे त्यांच्या मते, अनोळखी चोरट्यांनी या जनावरांची चोरी केल्याचा संशय व्यक्त केला आहे. चोरीस गेलेल्या जनावरांची एकूण किंमत अंदाजे १५ हजार रुपये आहे. दोन काळ्या रंगाच्या शेळ्या प्रत्येकी ३५०० रुपये, दोन काळ्या रंगाचे बोकड प्रत्येकी ३५०० रुपये, आणि एक लहान काळा बोकड किंमत १ हजार रुपये असे असल्याचे म्हटले आहे.

# भांडण सोडविण्यासाठी गेलेल्याच्या डोक्यात वीट मारुन केले जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ नोव्हेंबर-**



सुभाषनगर येथे एका घरासमोर झालेल्या भांडणातून हाणामारी होऊन युवक जखमी झाल्याची घटना दि ११ नोव्हेंबर रोजी घडली. गोविंद दाळ मिलशेजारी राहणाऱ्या शोभा सतीश शहाणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या मुलगा आशिष व अनिकेत चौधरी यांच्यात वाद झाला होता.

या वादाचा राग मनात ठेवून अनिकेतने सायंकाळी ६.३० च्या सुमारास आशिषला चापट मारली. भांडण सोडवण्यासाठी शोभा शहाणे बाहेर आल्या असता, अनिकेतने त्यांनाही शिवीगाळ केली. त्यावेळी अनिकेतची आई अंजली चौधरी व त्याची मावशी रोहिणी यांनीही शोभा शहाने यांना शिवीगाळ करुन मारण्यासाठी अंगावर धावून आले. त्यावेळी शेजारी राहणारे अमोल क्षीरसागर भांडण सोडवण्यासाठी पुढे आले असता, अनिकेतने त्यांनाही शिवीगाळ केली व खाली पडलेला विटेचा तुकडा उचलून अमोलच्या डोक्यात मारला, ज्यामुळे त्याला जखम झाली. यावेळी अनिकेत चौधरी, अंजली चौधरी आणि रोहिणी यांनी धमकी देत, तुम्हाला बघून घेतो असे म्हणाले. या घटनेनंतर शोभा शहाणे आणि अमोल क्षीरसागर यांनी बार्शी शहर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

# महिलांना ३ हजार, शेतकऱ्यांना कर्जमाफी : खर्गे

## ● अक्कलकोटमध्ये सभा; सिध्दाराम म्हेत्रेंना विजयी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१३ नोव्हेंबर-**



महाराष्ट्रात मविआचे सरकार सत्तेत आल्यास दर महिन्याला महिलांच्या बँक खात्यात ३ हजार रुपये जमा केले जातील. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाणार, तसेच शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कापूस, धानाला बाजारात योग्य भाव मिळावा यासाठी प्रयत्न करणार, २५ लाखांचा आरोग्य विमा, तरुणांना ४ हजारांचा भत्ता व २.५ लाख सरकारी नोकऱ्या देणार, असे आश्वासन काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी अक्कलकोट येथील जाहीर सभेत दिले. महाविकास आघाडीचे उमेदवार सिध्दाराम म्हेत्रे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असेही आवाहन खर्गे यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे, कर्नाटकचे काँग्रेसचे मंत्री एम. बी. पाटील, अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार सिध्दाराम म्हेत्रे, अक्कलकोट तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शंकर म्हेत्रे, सोलापूर शहर मध्यचे उमेदवार चेतन नरोटे, माजी जिल्हा परिषद सदस्य मल्लिकार्जुन पाटील, काँग्रेसच्या तालुका महिला आघाडी अध्यक्षा शीतल म्हेत्रे, माजी नगरसेवक अश्पाक बळोरगी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष बंदेनवाज कोरबू, युवा नेते बाबासाहेब पाटील, माजी उपसभापती सिद्धार्थ गायकवाड तसेच महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

> देश व राज्यातील महायुती सरकार हे जनतेची घोर फसवणूक करीत असून महायुतीचे सरकारला राज्यातून हद्दपार करा. काँग्रेस पक्षाकडे एक विचारधारा, विकासाचे धोरण आहे. त्यामुळे सिद्धाराम म्हेत्रे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करून विधानसभेत पाठवा,
>
> **- मल्लिकार्जुन खर्गे,**
> **काँग्रेस राष्ट्रीय अध्यक्ष**

मल्लिकार्जुन खर्गे पुढे म्हणाले, शेतकऱ्यांच्या हितासाठीच शेतकरी कायदे आणले होते, असा दावा पंतप्रधान मोदी करत असतात पण ते काळे कायदे शेतकऱ्यांच्या हिताचे होते म्हणूनच शेतकरी रस्त्यावर उतरले होते? भाजपचे सरकार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या धान, सोयाबीन, कापसाला भाव देत नाही. देशातील काही उद्योगपतींचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ करणाऱ्या पंतप्रधान मोदींनी ११ वर्षांत एकाही शेतकऱ्याची कर्जमाफी का केली नाही?, असा सवाल खर्गे यांनी उपस्थित केला. काँग्रेस पक्ष देशासाठी बलिदान देणारा, त्याग करणारा पक्ष म्हणून जनमानसात कार्यरत आहेत. मात्र, भाजपाकडे कोणतेही ध्येय धोरण नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फक्त दोनच मित्र असून त्यांच्या भल्यासाठीच ते जनतेस वेठीस धरत आहेत. विदेशातील काळा पैसा भारतामध्ये आणून प्रत्येक नागरिकांना १५ लाख रुपये देतो, दोन कोटी बेरोजगारांना रोजगार देतो म्हणून भाजपाने केवळ दिशाभूल केल्याचे खर्गे म्हणाले. काँग्रेसने उभ्या केलेल्या मोठ्या संस्था, मंडळे, कंपन्या विकण्याचे महापाप मोदी सरकार करीत आहे. काँग्रेसकडे विकासाचे मुद्दे आहेत. भाजपा विकास केवळ कागदोपत्री दाखवते. प्रत्यक्षात कोणतेही सकारात्मक पाऊल उचलत नाही. मोदी हे केवळ अंबानी आणि अदानी यांच्यासाठीच काम करत असल्याचा आरोप खर्गे यांनी केला.



# डॉ. राजेश फडकुले हे अष्टपैलू व्यक्तिमत्व : डॉ.व्यवहारे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

डॉ. राजेश फडकुले हे परिस्थितीची जाण ठेवून सर्वांना मदत करणारे, सर्वांना एकसंघ ठेवणारे तसेच आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, क्रीडा व वैद्यकीय क्षेत्रामध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणारे, अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे, असे प्रतिपादन आर्यनंदी संस्थेचे संचालक डॉ. सुरेश व्यवहारे यांनी केले.

पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश फडकुले यांचा वाढदिवसानिमित्त संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. व्यवहारे व त्यांच्या पत्नी नयना व्यवहारे यांनी विठ्ठल रखुमाईची मूर्ती देऊन सपत्निक सत्कार केला. संस्थेचे संचालक व बांधकाम व्यवसायिक मनोहर नारायणकर व सल्लागार प्रमोद तम्मनवर यांनीही सत्कार केला. संस्थेच्या तज्ञ संचालक महावीर गुंडाळे, संचालिका मंजिरी सवळे, सल्लागार शोभना सागर, शांता येळंबकर, मानसिंग गहेरवार, जितेंद्र बिडकर, अनंतकुमार रणदिवे, मोहनदास गुमते, मनोज साबळे, वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानचे शशिकांत बिराजदार व मित्र परिवार, अनिकेत गुंडाळे, अम ोल संगशेट्टी यांच्यावतीने शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी सल्लागार सदस्य अनंतकुमार रणदिवे, मनोज साबळे, शशिकांत बिराजदार यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. शिल्पा फडकुले, संस्थेचे उपाध्यक्ष बाहुबली दुरुगकर, संचालक निलेश एखंडे, डॉ. संजयकुमार मंठाले, प्रवीण बुर्से, अनुपमा रणदिवे, व्यवस्थापिका लक्ष्मी आरगी, राधिका बिल्लमपल्ली, बसवराज परचंडे, राहुल तवटी, लावण्या आडम, किरण येरगुंटला, चंद्रिका चौगुले, विलास कटके, शरद सरसमकर, प्रकाश माशाळकर, कविता माने, ओमकार पलसे उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार संस्थेचे वरिष्ठश्रेणी अधिकारी सतीश शिंदे यांनी केले.



# लोधी आणि मोची समाजातील नागरिकांनी केले देवेंद्र कोठे यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

चौका-चौकात रांगोळ्या काढून पुष्पवृष्टी करत लोधी आणि मोची समाजाच्या नागरिकांनी शहर मध्य विधानसभेचे भाजपा आणि महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे यांचे जोरदार स्वागत केले. विधानसभा निवडणुकीत देवेंद्र कोठे यांच्या पाठीशी ठाम पणे राहण्याचा निर्धार यावेळी नागरिकांनी बोलून दाखवला.

प्रभाग क्रमांक १७, १३ आणि १४ या प्रभागांची मिळून ही पदयात्रा काढण्यात आली. बेडर पुलावरून सुरू झालेली ही पदयात्रा नवी तालीम, लोधी गल्ली परिसर, तुळशीदास तालीम, बिरोबा देव मंदिर, कामाठीपुरा परिसर, दाळ गल्ली, जगदंबा चौक, नळ बझार चौक, मुर्गी नाला भाजी मंडई, महावीर चौक, सत्यनाम चौक, कुंभार गल्ली, श्रीराम बेकरी, मौलाली चौक, दत्त मंदिर, सरस्वती चौक, गुलजार तालीम, हेजनपूर परिसर, प्रकाश बापूजी सोसायटी, अलकुंटे चौक, वीर जवान मंडळ, अभयस्तंभ चौक, भगतसिंग चौक, श्रीराम मंदिर परिसर, सत्तर फूट रस्ता, अभयस्त चौक, बापूजी नगर स्लॉटर हाऊस, लोधी गल्ली परिसरमार्गे बापूजी नगर येथील मारुती मंदिरासमोर विसर्जित झाली.या पदयात्रेत भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय (ए) आणि महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे, माजी नगरसेवक देवेंद्र भंडारे, जेम्स जंगम, माजी नगरसेवक रवी कैय्यावाले, माजी नगरसेविका प्रतिभा मुदगल, सुनिता कामाठी, जुगनबाई आंबेवाले, लोधी समाज अध्यक्ष भगतसिंग कल्लावाले, मोची समाजाचे अध्यक्ष करेप्पा जंगम, सुमित पाटील, महेश अलकुंटे, बाबुराव संगेपाग, रवी बुऱ्हाणपुरे, शीतल हजारीवाले, रणजित हजारीवाले, सुरज चव्हाण, दत्तू म्हेत्रे, राजू जमादार, गुलजार शिवसिंगवाले, समशेर आंबेवाले, सज्जन बुऱ्हाणपुरे, रमेश बंबेवाले आदी सहभागी झाले होते.

# पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांची कात्राळ आंतरराज्य चेकपोस्टला सरप्राईज भेट

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१३ नोव्हेंबर-**

कात्राळ (ता.मंगळवेढा) येथील आंतरराज्य चेकपोस्टला विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी सरप्राईज भेट दिली.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक जाहीर झाली असून यासाठी दि.२० रोजी मतदान होत आहे. दरम्यान मंगळवेढा शहरापासून जवळपास २५ ते ३० कि.मी.अंतरावर कर्नाटक राज्य असल्याने येथील सीमेवर कडक नियंत्रण ठेवण्यासाठी कात्राळ येथे चेकपोस्ट उभा करण्यात आले आहे. येथे रात्रंदिवस येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची कडक तपासणी केली जात आहे. दि.१२ रोजी कार्तिक वारीच्या निमित्ताने कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी हे पंढरपूरला आले होते. तद्नंतर त्यांनी सायंकाळी ६ वाजता कात्राळ येथील चेकपोस्टला अचानक भेट देवून प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी कर्नाटक राज्यातून ये जा करणारे वाहनावरती बारकाईने तपासणी करा, कर्नाटक मधून अवैध दारु, पैसे याची वाहतूक होणार नाही याबाबत दक्ष रहावे अशा सुचना केल्या. तसेच येथे पुरेसा पोलीस फोर्स ठेवा, त्याच बरोबर कर्मचाऱ्यांच्या जेवण्याची व राहण्याची व्यवस्था आहे का? या बाबत त्यांनी आत्मियतेने चौकशी केली. जवळपास एक तासभर त्यांनी तेथे थांबून येथील कसून माहिती जाणून घेतली. यावेळी पोलीस निरीक्षक महेश ढवाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश वाघमोडे, सपोनि विनोद लातुरकर, पोलीस उपनिरीक्षक पुरुषोत्तम धापटे,पोलीस उपनिरीक्षक विजय पिसे आदी उपस्थित होते.



# मैंदर्गीत पंकजा मुंडे यांची आज तोफ धडाडणार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि १३ नोव्हेंबर-**

राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी अवघा एक आठवडा शिल्लक राहिला आहे. अक्कलकोट विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचत आहे. भाजपाचे आम दार पंकजा मुंढे यांची मैंदर्गी येथे गुरुवारी १४ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता शिवचलेश्वर मंदिराजवळील मैदान येथे सभेचे आयोजन केले आहे.

या सभेत भाजपाप्रेमी कार्यकर्ते, पदाधिकारी, नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन तालुका भाजपा अध्यक्ष मोतीराम राठोड, शिवशरण जोजन, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांनी केले आहे.

# एमआयएमचे प्रमुख ओवेसी यांना शहर पोलिसांकडून नोटीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**



एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी हे बुधवारी सोलापुरच्या दौऱ्यावर आल्यानंतर पानगल प्रशालेतील सभेच्या व्यासपीठावर सोलापूर शहर पोलिसांनी त्यांना नोटीस दिली.

भाषणा दरम्यान प्रक्षोभक वक्तव्य टाळण्याप्रकरणी ही नोटीस देण्यात आली. ओवेसी हे बुधवारी सोलापुर मध्य विधानसभा मतदार संघाचे एमआयएमचे उमेदवार फारूक शाब्दी यांच्या प्रचार सभेसाठी सोलापूर दौऱ्यावर आले होते. संध्याकाळी पानगल हायस्कूल येथे ओवीसी यांची सभा झाली. यावेळी व्यासपीठावर असलेल्या ओवीसी यांना शहर पोलिसांनी नोटीस बजावली. सभेच्या भाषणादरम्यान ही नोटीस दिली. प्रक्षोभक भाषण टाळण्यासाठी ही नोटीस दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

# दलित समाजासाठी सर्वाधिक निधी देशमुखांनी दिला

## संविधान मानणाऱ्या भाजपलाच मतदान करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**



आमदार विजयकुमार देशमुख हे पालकमंत्री असताना ८९ कोटी रुपये शहरातील दलित वस्तींला निधी दिला. सत्तेतल्या सात वर्षांच्या कार्यकाळात आमदार देशमुख यांनी सोलापूरकरांसाठी दुसरी पाईपलाईन मंजूर करून आणली. त्यामुळे शहराचा पाण्याचा प्रश्न हा कायमचा मिटेल. सध्या ते काम अंतिम टप्प्यात आले आहे. लाड कमिटीच्या शिफारसी आम्ही आणि आमदार देशमुख यांच्या समवेत बाहेर काढून दलित समाजाला खरा न्याय दिला.

आजपर्यंत कुणीही निधी दिला नाही तेवढा निधी आमदार देशमुख यांनी दलित समाजाच्या प्रत्येक वस्तीत दिला. आज प्रत्येक दलित वस्तीत येऊन मूलभूत सोयी सुविधा देणारे आणि बुद्ध वंदना म्हणणारे आमदार देमुख हे एकमेव आहेत, असा निर्वाळा राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी आज (दि. १३) मुकुंद नगर तालीम संघ दशरथ कसबे मित्र परिवाराच्या वतीने आयोजित संकल्प मेळाव्यात दिला. तर संविधानाला मानणाऱ्या भाजपलाच सर्वांनी मतदान करण्याचे आवाहन केले.

मंगळवारी सायंकाळी जम्मा चाळ येथे महायुतीचे उमेदवार आमदार देशमुख यांच्या प्रचारार्थ डिके मित्रपरिवार यांच्या विजयी संकल्प मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, शशिकांत कांबळे, माजी नगरसेवक शिवानंद पाटील, प्रा.नारायण बनसोडे, अनंत जाधव, अमर पुदाले, अजित गायकवाड, श्रीनिवास संगा, राजाभाऊ काकडे, ब्रह्मदेव गायकवाड, अजित गादेकर, सिद्धू शिवशरण, बाळासाहेब आळसंदे, लखन भंडारे, सुजित खुर्द, प्रवीण कांबळे, संदीप सांगा, संतोष कुम ार मठपती, डॉक्टर शैलेश उंबरे यांच्यासह आयोजक दशरथ कसबे आणि गौतम कसबे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रवीण कांबळे यांनी तर आभार गौतम कसबे यांनी मानले.

# जनसुराज्य पक्ष ॲड. सोमनाथ वैद्य यांच्या समवेत : रविंद्र कोरे

**तभा वृत्तसेवा**
**मंद्रुप दि. १३ नोव्हेंबर-**



दक्षिण सोलापूर तालुक्यामधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत असलेल्या सोमनाथ वैद्य यांच्यासमवेत जनसुराज्य शक्ती पक्ष असल्याचे संघटनेचे संपर्क प्रमुख रवींद्र कोरे यांनी जाहीर केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सामाजिक शैक्षणिक आर्थिक आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निवडणूक लढवीत असलेल्या वैद्य यांना यांची भूमिका रास्त असून आम्ही त्यांच्या मताशी सहमत असल्यामुळेच आम्ही वैद्य यांच्या समवेत काम करण्याची भूमिका घेतल्याचे जनस्वराज्य संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

यावेळी ॲड. वैद्य म्हणाले की, दक्षिण सोलापूर तालुक्यामधून निवडणुकीला उभा राहिल्यापासून मला अनेक संस्था संघटना पदाधिकारी कार्यकर्ते यांनी चांगली सहकार्य केले असून ते माझ्यासमवेत आज काम करत असल्यामुळे आता मला दक्षिणचे विकासासाठी चांगले बळ मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले.याप्रसंगी श्रीशैल कलशेट्टी, ॲड अनिल जाधव, शंभूराजे वानकर, सोमनाथ बिराजदार, राजू अंजनगावकर, नासिर चाचा, गणेश भोसले, प्रमोद कलशेट्टी, अनिल साखरे, स्वप्नील मंडलिक उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अक्कलकोट येथे आज प्रज्ञापुरी रत्न पुरस्कार वितरण सोहळा

### दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

अक्कलकोट येथील भोसले मंगल कार्यालय येथे दि. १४ व १५ नोव्हेंबर २०२४ रोजी पुरस्कार वितरण सोहळा आणि धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संयोजक वास्तुशास्त्रज्ञ प्रसाद पंडित यांनी पत्रकार परिषदेत दिली. गुरुवार दि. १४ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता उद्योगपती प्रभाकर साळुंखे (पुणे) यांना श्री दत्त स्वामी याग व प्रज्ञा पुरी रत्न पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आ. सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, हिंदुराष्ट्र सेना प्रमुख धनंजय देसाई, हिंदू जनजागृती समितीचे समन्वयक राजन बुणगे, सद्गुरु स्वाती खाड्ये, स्वराज्य संघटनेचे संस्थापक बाजीराव बांगर, हभप महेंद्र मस्के, पंचांगकर्ते मोहनराव दाते, बसवकल्याणचे मल्लिकार्जुन खुबा , हनुमंत मोतीबने यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. दि. १४ व १५ नोव्हेंबर रोजी हेमांद्री हेमाद्री संकल्प, श्री दत्त महामाला जप संकल्प, श्री दत्त अनुष्ठान व आरती , प्रवचन , दिंडी सोहळा, श्रीदत्त स्वामी याग पूर्ण आहुती आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. दोन दिवस महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे, असे प्रसाद पंडित यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस विनायक कोरे, किशोर धोत्रे आदी उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860

# हिंदु जागृत झाला तरच हिंदु राष्ट्र होणार : पंडीत धीरेंद्र शास्त्री

## ● महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूरच्या संत संमेलनाला मोठी गर्दी





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

सनातन हिंदु धर्मातील प्रत्येकजण जागृत झाला तरच हिंदु राष्ट्राची निर्मिती होणार आहे. असे प्रतिपादन बागेश्वर धामचे पीठाधीश पंडीत धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने होम मैदानावर आयोजित संत संमेलनामध्ये धीरेंद्र शास्त्री बोलत होते.

जागे व्हा जागे होण्याची वेळ आली आहे. आम्ही इस्लाम विरोधी नाही कोणत्याही धर्माच्या विरोधी नाही परंतु छेडेंगे तो छोडेंगे नही असेही त्यांनी सांगितले. हिंदु धर्मातील सर्वजण एकत्र झाले पाहिजे. भारतभूमी पवित्र आहे आणि या भूमीत हसिनाला आणि सीमालाही सुरक्षित वाटते. महाराष्ट्र ही संताची, महान राष्ट्र भक्तांची आणि छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी आहे. हिंदवी स्वराज्याची निर्मिती ज्यांनी केली ते छत्रपती शिवाजी महाराजही सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्र करून रयतेचे राज्य निर्माण केले. तरूणांनी नेहमी आनंदी राहिले पाहिजे घरातून बाहेर निघताना मनात हिंदु राष्ट्राची भावना असली पाहिजे. शरीराने संसारी आणि मनाने सन्याशी असले पाहिजे. प्रत्येक हिंदु जागृत झाला तरच जगामध्ये भारत सर्वश्रेष्ठ होणार आहे असेही आपल्या संतवाणीतून बागेश्वर धामचे पीठाधीश पंडीत धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला होम मैदानावर भाविक भक्तांनी मोठ्याप्रमाणात गर्दी केली होती. बागेश्वर बाबांच्या दर्शनासाठी आणि त्यांची एक झलक पाहण्यासाठी तरूणांनीही गर्दी केली होती. काही भाविकांच्या बागेश्वरबाबांनी समस्या जाणून घेतल्या आणि त्यावर उपाय सांगितले. प्रारंभी स्वरध्यास संगित विद्यालयाच्या वतीने रसिका आणि सानिका कुलकर्णी यांच्याकडून ईश स्तवन, अभंग, कृष्णांची गीते सादर करण्यात आले. नंतर बागेश्वर बाबांचे मंचावर आगमन होताच त्यांचे महिलांकडून औक्षण करण्यात आले. त्यानंतर शंखनाद करून त्यांची सोलापूरातील दाते पंचागकर्ते मोहन दाते यांच्यासह ५ गुरूजींच्या हस्ते पाद्यपुजा करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, मार्गदर्शक अविनाश महागांवकर, प्रमुख कार्यवाह जितेश कुलकर्णी,कोषाध्यक्ष अमोल धाबळे, प्रसिध्दीप्रमुख विनायक होटकर, नाट्य परिषदेचे जयप्रकाश कुलकर्णी, श्रीपाद येरमाळकर, सुशांत कुलकर्णी, सात्विक बडवे, समर्थ होटकर आदींनी परिश्रम घेतले.

### ▶▶ भाविकांची झुंबड

संत संमेलन संपल्यानंतर भाविक भक्तांनी मंचावर येवून बागेश्वर बाबा ज्या ठिकाणी बसून प्रवचन दिले त्या आसनाला भक्तीभावाने नतमस्तक होण्यासाठी झुंबड उडाली होती. भाविकांची अलोट गर्दी कार्यक्रमाला होती.

### ▶▶ पुन्हा सोलापूरला येण्याचे आश्वासन

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने आयोजित या संत संमेलनाचे नेटके भव्य दिव्य आयोजन आणि सोलापूरकरांची गर्दी प्रतिसाद पाहून बागेश्वर धामचे पंडीत धीरेंद्र कृष्ण शास्त्री भारावून गेले आणि पुन्हा सोलापूरला बोलवा मी येतो असे पुन्हा येण्याचे आश्वासन त्यांनी प्रशांत बडवे, अविनाश महागांवकर यांच्यासह महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरला दिले.

## ▶▶ क्राईम वृत्त...

### तांबोळी गावातील एकाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

शेतात अज्ञात कारणातून पिकावर फवारणीचे औषध प्राशन करून तांबोळी गावातील एकाने आत्महत्याचा प्रयत्न केला. हा प्रकार मंगळवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडला. बंडू धोंडीबा कांबळे (वय ४०) असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी रात्री बंडू यांनी अज्ञात कारणातून पिकावर फवारणीचे औषध प्राशन केले. हा प्रकार रात्री साडेआठच्या सुमारास उघडकीस आला. त्यात त्यांना त्रास होत असल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचाराकरिता पत्नी निशा कांबळे यांनी बुधवारी रात्री पावणे एकच्या सुमारास शासकीय रुग्णाल दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### पोटदुखीच्या त्रासातून अरळीतील विवाहितेचा मृत्यू


**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

पोटदुखी आणि अंगदुखी या त्रासातून मंगळवेढा तालुक्यातील अरळी गावातील विवाहितेचा मृत्यू झाला. सोनाली अंकुश पवार (वय ३०) असे मृत पावलेले विवाहितेचे नाव आहे. मंगळवारी रात्री सोनाली यांना पोट दुखीचा त्रास सुरू झाला. त्याचबरोबर त्यांना हात व पायदुखीही सुरू झाली. रात्री १२:३० वाजता जास्त त्रास होत असल्याने त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. पोटदुखीच्या वेदना कमी होत नसल्याने बुधवारी मध्यरात्री अडीचच्या सुमारास पती अंकुश पवार यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.परंतु उपचारापूर्वीच सोनाली वृत्तपौल्याचे डॉक्टरांनी तपासणीनंतर घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली.

### ओढणी दुचाकीच्या चाकात अडकून तरुणी जखमी

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

दुचाकीवर बसून जाताना ओढणी चाकात अडकून पडल्याने तरुणी जखमी झाली. हा प्रकार मळोली ते निंबोणी या दरम्यान मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास घडला. मायाक्का क्षीरसागर (वय



२८, रा. मळोली ता. मंगळवेढा) असे जखमी तरुणीचे नाव आहे. मंगळवारी दुपारी चाच्या सुमारास मायक्का दुचाकी वर बसून मळोली ते निंबोणी शच्या दिशेने जात होत्या. यादरम्यान त्यांची ओढणी दुचाकीच्या चाकात अडकली. यामुळे त्या दुचाकीवरून खाली पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला आहे. त्यांच्यावर मंगळवेढा येथे प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालयात रात्री ११ च्या सुमारास वडिलांनी दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### भांडणात मध्यस्थी करण्यास गेलेल्या महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

भांडणात मध्यस्थी करण्यास गेलेल्या महिलेस मारहाण करण्यात आली हा प्रकार राहुल गांधी झोपडपट्टी येथे मंगळवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडला. रिजवाना जुनेद पठाण (वय ३५) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. राहुल गांधी झोपडपट्टी येथील रिजवाना राहत असलेल्या भागात मंगळवारी रात्री भांडण सुरू होते. त्यावेळी रिजवाना मध्यस्थी करण्यासाठी तेथे गेल्या. या कारणातून चिडून शप्या व इतर तीन जणांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. यात सर्वांगास मुक्कामार लागल्याने त्या स्वतः रात्री पावणेआठच्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल झाल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# लाडकी बहीणसह सर्व कल्याणकारी योजना सुरू ठेवण्यासाठी पुन्हा महायुतीला साथ द्या

## ● डोणगाव येथील सभेत आमदार सुभाष देशमुख यांचे ग्रामस्थांना आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर,**



महाविकास आघाडी सरकारने भाजपाने शेतकऱ्यांसाठी सुरू केलेले जलयुक्त शिवारसह अनेक बंद पडल्या आहेत. आता त्यांची नजर लाडकी बहीण योजनेवर आहे ही योजना बंद पडावी म्हणून महाआघाडी सरकार कोर्टात गेले आहे. या लाडक्या बहिणीच्या सावत्र भावांना जनतेने आता धडा शिकवावा आणि लाडकी बहीणसह अनेक विकासात्मक योजना सुरू करण्यासाठी महायुतीला भरघोस मतांनी निवडून द्यावे असे आवाहन आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

बुधवारी आमदार देशमुख यांनी सकाळी डोणगाव, माळकवठे, कुरघोट, औज, मंद्रूप, कारकल, सादेपूर, बाळगी, निंबर्गी, लवंगी यासह विविध भागात जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. डोणगाव येथील सभेत बोलताना देशमुख पुढे म्हणाले की, उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री झाल्यानंतर जलयुक्त शिवार ही योजना बंद पडली. त्यामुळे शेतकऱ्यांचे मधल्या काळात अतोनात नुकसान झाले. मात्र पुन्हा महायुती सत्तेत आल्यानंतर उबाठा सरकारने बंद पाडलेल्या सर्व योजना पुन्हा सुरू केल्यास याशिवाय अनेक लोकहितकारी योजनाही अंमलात आणल्या आहेत. यामध्ये लाडके बहीण योजनेचा समावेश आहे.

दक्षिण तालुक्यातील ६० हजारांपेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ झाला आहे. याशिवाय शेतकऱ्यांसाठी आरोग्य विमा, पीक विमाही काढला आहे शेतकरी सन्मान योजनाही सुरू केली आहे. याशिवाय युवकांसाठी लाडका भाऊ योजना आणलेली आहे. विशेष म्हणजे या सर्व योजनेचे पैसे थेट खात्यात जमा होत आहेत. युवकांसाठी उद्योजक बनावे म्हणून अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळ सुरू केले आहे. यामध्ये युवकांना १ लाखांपासून ते १५ लाखांपर्यंत कर्ज मिळत आहे. महिला महिलांसाठी तीन सिलेंडर मोफत असणारी अन्नपूर्णा योजना ही सुरू केली आहे. यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे विरोधकांनी लाडकी बहीण यासारख्या योजनेला स्टे आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे लोकांनी आता जागृत होऊन महाआघाडी सरकारला धडा शिकवावा महाआघाडी सरकार चुकून सत्तेत आल्यास या सर्व कल्याणकारी योजना बंद पडणार आहे. या सर्व योजना पुन्हा चालू ठेवण्यासाठी महायुती सरकारला सर्वांनी निवडून द्यावे असे आवाहनही आमदार सुभाष देशमुख यांनी केले. महायुती सत्तेत आल्यापासून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दक्षिण तालुक्याला कोट्यवधी रुपयांचा निधी दिला आहे. दक्षिण तालुक्याला राज्यातील मॉडेल मतदारसंघ करण्याचा आपला मानस आहे. ;गेल्या दहा वर्षात तालुक्यात रस्त्याची कामे मोठ्या प्रमाणात आणि दर्जेदार झाली, हर घर नल, जलजीवन मशीन योजनेच्या माध्यमातून घराघरात पिण्याचे पाणी पोहोचवण्याचे काम महायुती सरकार ने केले आहे. दिवसा शेतकऱ्यांना वीज मिळावी म्हणून येणाऱ्या काळात सौरऊर्जा चा वापर महायुती सरकार अंमलात आणणार आहे. यासह अनेक लोककल्याणकारी हिताची कामे माहिती सरकार करणार आहे त्यामुळे मतदारांनी महायुतीला पुन्हा एकदा साथ द्यावी.

यावेळी तालुकाध्यक्ष संगप्पा केरके, हणमंत कुलकर्णी, चनगोंडा हाविनाळे, नामदेव पवार,मळसिद्ध मुगळे, अंबिका पाटील, अप्पासाहेब मोटे, सचिन पाटील, साहेबलाल हवालदार, प्रसाद कुलकर्णी आदी उपस्थित होते

# मुनीश्रींच्या मंगल आशीर्वचनासह रविवारी श्रीमान भाऊसाहेब गांधी पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

वालचंद शिक्षण समूहाला प्रगतीचा मार्ग दाखवणारे स्व. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या ९९व्या जयंतीनिमित्त श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठानच्यावतीने रविवार, १७ नोव्हेंबर रोजी दुपारी २.४५ वाजता वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या प्रशस्त सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



या कार्यक्रमात प.पू. मुनीश्री १०८ विभास्वरसागरजी महाराज, प.पू. मुनिश्री १०८ सौम्यसागरजी महाराज, प.पू. मुनीश्री १०८ सारस्वतसागरजी महाराज, प.पू. मुनीश्री १०८ शुद्धोपयोगसागरजी महाराज, प.पू. मुनिश्री १०८ जयंतसागरजी महाराज आणि प.पू. क्षुल्लक श्री १०५ श्रुतसागरजी महाराज यांचे आशीर्वाद लाभणार आहे. या सोहळ्यात, श्रीमान भाऊसाहेब गांधी सेवाभावी पुरस्कार वितरण समारोह वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांच्या हस्ते होणार आहे. 'सेवा-भाव' या विषयावर मुनीश्रींकडून प्रेरणादायी आशीर्वचन होईल, ज्याचा श्रावकांना अमुल्य लाभ मिळेल.

प्रतिवर्षा प्रमाणे, या समारंभात श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठानकडून गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक शिष्यवृत्तींचे वितरण करण्यात येणार आहे. या प्रसंगी वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त भूषण शहा, पृथ्वीराज गांधी, पराग शहा, वैभव गांधी, ब्रिजेश गांधी, गांधी कुटुंबीयांतील सदस्यांसह सर्व प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती असणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, कार्यक्रमाच्या निमित्ताने सहा मुनिश्रींच्या दर्शनाचा लाभ घेता येईल.

# उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनी टाकण्याचे १०३ किलोमीटरचे काम पूर्ण

- हायड्रोलिक टेस्टिंगचे ६० टक्के तर जॅकवेल कन्स्ट्रक्शनचे ८० टक्के काम पूर्ण
- महत्त्वकांक्षी प्रकल्पाचे डिसेंबर अखेर होणार सर्व काम पूर्ण

**तभा वृत्तसेवा। किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनीच्या एकूण ११० किलोमीटरपैकी जलवाहिनी टाकण्याचे १०३ किलोमीटरचे काम आतापर्यंत पूर्ण झाले आहे तर हायड्रोलिक टेस्टिंगचे काम सुमारे ६० टक्के झाले आहे. सर्व मुख्य अडथळे दूर झाले आहेत. साधारणतः येत्या दीड महिन्यात डिसेंबर अखेरपर्यंत या जलवाहिनीचे सर्व काम पूर्ण होणार आहे.

सोलापूरची जीवनदायी मानल्या जाणाऱ्या उजनी- सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम प्रगतीपथावर आहे. हैदराबाद येथील पोचमपाड कंपनीकडून हे काम करण्यात येत आहे. एकूण ८९२ कोटी रुपये खर्चाचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. दरम्यान, महापालिका आयुक्त शितल तेली- उगले यांच्या मार्गदर्शनाखाली या कामाचा नियमित आढावा घेण्यात येतो. एकूण ११० किलोमीटर पैकी १०३ किलोमीटर जलवाहिनी अंथरण्यात आली आहे. ७ किलोमीटरचे काम बाकी आहे. यावर्षी पाऊसकाळ कमी झाल्याने जॅकवेलचे ३५ बाय ४० बाय १८.५ मीटर खोदाईचे काम एका सिझनमध्ये झाले होते. अथक प्रयत्नांमुळे व निसर्गाच्या मदतीने हे काम एक सिझनमध्ये शक्य झाले. त्यावर एकूण १२ पंप बसवण्यात येणार आहेत. या जॅकवेल कन्स्ट्रक्शनचे एकूण ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. हायड्रोलिक टेस्टिंगचे सुमारे ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. कराराप्रमाणे नोव्हेंबर २०२४ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न राहणार आहे. मात्र विविध अडथळे आले. त्यातील मुख्य अडथळे आता दूर झाले आहेत यामुळे डिसेंबर अखेरपर्यंत दुहेरी जलवाहिनी टाकण्याचे संपूर्ण काम पूर्ण करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे स्मार्ट सिटी योजनेचे तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे यांनी सांगितले.







### जलशुद्धीकरण केंद्र कामासाठी वर्कऑर्डर

दरम्यान, या प्रकल्पाअंतर्गत पाकणी येथे जलशुद्धीकरण केंद्र (डब्ल्यू टी पी) उभारण्यात येणार आहे. या कामासाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे. यापूर्वी निविदा प्रसिद्ध केली होती. निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. दरम्यान, या कामासाठी संबंधित मक्तेदाराला वर्क ऑर्डर (कार्यादेश) देण्यात आला आहे. १८ कोटी रुपये खर्चाचे हे काम आहे. दीड वर्षात हे काम पूर्ण करण्यात येणार आहे, अशी माहिती स्मार्ट सिटी योजनेचे तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे यांनी दिली.

### विहिरींचे पैसे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण देणार

टेंभुर्णी येथील जलवाहिनी टाकण्याचे काम सध्या नियमित चालू आहे. टेंभुर्णी ते मोहोळ दरम्यान सुमारे दोन ते तीन विहिरी आहेत, त्याचे पैसे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण देणार आहे. वनविभागाच्या जागेचा प्रश्नही आता सुटला आहे. त्यासाठी वन अधिकारी कर्नल पाठक यांचे सहकार्य लाभले. तेही लवकरच पूर्ण होईल,असे व्यंकटेश चौबे यांनी सांगितले.




### छातीत दुखून चक्कर आल्याने महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

छातीत दुखून चक्कर येत असल्याने उपचारास दाखल केलेल्या महिलेचा मृत्यू झाला. हा प्रकार मंगळवारी रात्री नऊच्या सुमारास घडला. भागीरथी दीपक कोथीमीरे (वय ४८, रा. संतोष नगर बाळे) असे मृत पावलेल्या महिलेचे नाव आहे.

मंगळवारी सायंकाळी सातच्या सुमारास भागीरथी यांच्या छातीत दुखून त्यांना चक्कर येण्याचा त्रास होऊ लागला. यातूनच त्यांची शुद्ध हरपली. रात्री नऊ वाजता भाचा मधुकर यांनी त्यांना शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्या मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९४३

**मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें ।**
**अलौकिक नोहावें । लोकांप्रति ।।**

श्रेष्ठ, ज्ञानी किंवा ज्यांना समाज आदर्श समजतो किंवा जे समाजाचे, लोकांचे नेतृत्व करतात, जे समाजाचे आश्रयस्थान, स्फुर्तीस्थान आहेत त्यांनी नितीमत्तेला, सत्याला धरुनच वागले पाहिजे. म्हणजेच स्वधर्माचरणच केले पाहिजे. कारण त्यांच्याकडे बघून अनेकजण त्यांच्या आचरणाचा कित्ता गिरवित असतात. अत्यंत जबाबदारीने व काळजीपुर्वक अशा लोकांनी वागले पाहिजे. हे लोक जर चुकले, तर यांच्याकडे पाहून अनेकजण चुकतील. अशा अनेक लोकांच्या चुकण्याला हेच लोक कारणीभूत होतील. म्हणून जनकल्याण करु इच्छिणा-या नेत्यांनी, साधु-संतांनी विशेष प्रयत्न करुन धर्माचरण करायला पाहिजे. धर्माचा अर्थ चुकीचा काढून लोकांना चुकीच्या मार्गावर नेऊ नये. श्रीकृष्ण परमात्मा अर्जुनाला धर्माचरण करण्यास सांगतात. प्रथम श्रीकृष्ण स्वत: धर्माचे आचरण करीत आहेत, त्यानंतर ते अर्जुनाला धर्माचरण करण्यास सोगत आहेत. अर्थात आपण प्रथम वागलो पाहिजे आणि मगच इतरांना सांगीतले पाहिजे. बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले, हे जगाला वेगळे सांगावे लागत नाही. आमच्याकडे समाज आदर्शवादी म्हणून पाहतो आहे आणि आम्ही जर कर्मच कराचये नाही म्हणून विरक्त होऊन आत्मस्थितीत अकर्तेपणाणे स्वस्थ बसलो तर, आमच्या पावलावर पाय देऊन चालू इच्छिणा-यांचे काय होईल? आदर्शवादी पण स्वस्थ बसणा-यांनी सामान्य लोकासाठी जगण्याची रीतच बंद पाडायची का? असे होऊ नये म्हणून सामर्थ्यवान आणि ज्ञानाने संपन्न असणा-यांनी कर्माचा त्याग करुच नये. फळाच्या लोभाने फलासक्त पुरुष जसे कर्म करतो, अगदी तेवढयाच गतीने अनासक्त ज्ञानीपुरुषाने लोकसंग्रहासाठी कर्म करावे.



लोकाचरण, धर्माचरण व्यवस्था सर्व प्रकारे वारंवार जतन करण्याची जबाबादारी ज्ञानी लोकांची आहे. अशा आदर्शवादी लोकांनी म्हणजे संतांनी, महात्म्यांनी शास्त्रसंमत, विहीत पध्दतीचा अवलंब करुन धर्ममार्गाने वागावे व लोकांस आदर्श मार्गास लावावे. असे सांगतांना माऊली, मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें । अलौकिक नोहावें । लोकांप्रति ।। कोणत्याही परिस्थितीत लोकबाहय वर्तन करुन आपण अलौकिक आहोत हे भासवू नये. आपण लोकबाहय वर्तन करुन अलौकिक आहोत असे भासवू लागतो तर त्याचा सदुपयोग तर होणारच नाही, पण त्याचा दुरुपयोग व विपरीत परिणाम मात्र निश्चित होईल. जे लोक विहीत मार्गाने, सत्याच्या मार्गाने वागत नाहीत, म्हणजेच अधर्माने वागतात, त्यांना सत्यता पटवून दयावी. हित, अहित, सत्य, असत्य, चांगले, वाईट यातील फरक समजून दयावा. त्यांचे व्यक्तिगत व समाजाचे अहित होणार नाही असे सत्कर्म करण्यास प्रवृत्त करावे. ही सर्व जबाबदारी नितीनियमाने, सत्याने वागणा-या ज्ञानी लोकांवर आहे. संतांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव होती म्हणूनच त्यांनी समाजाकडून अनेक प्रकारचे आघात झाल्यानंतरही, त्या समाजाला चांगली दिशा दाखविली. सर्वस्व अर्पण करण्याची वेळ आली तरी सामाजीक हित, ऋण लक्षात घेऊन संतांनी सर्वस्व अर्पण केल्याचे आपण पाहतो. संतांप्रमाणे आपण ईतरांसाठी सर्वस्व अर्पण करावे असे अपेक्षीत नसले तरी आपण समाजाला जेवढे देऊ शकतो, तेवढे तरी मन:पुर्वक द्यावे. केवळ दिखावा म्हणून काही करु नये. एवढी अपेक्षा करणे रास्त होईल, असे आम्हास वाटते. यावरुन असे दिसते की आपल्या जीवनातील आनंदलहरी वाढवणे हे आपल्याच हाती असते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १४ नोव्हेंबर २०२४ | बालदिन, वैकुंठ चतुर्दशी |
| विक्रम संवत् २०८०-८१ | पौर्णिमा |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. त्रयोदशी (०९.४३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - अश्विनी (२४.३३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्दि (११.२९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (२०.०२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : नवीन योजना कार्यान्वित होऊन त्या यशस्वी होतील. कायदेशीर वाद विवादातून योग्य मार्ग निघेल. कार्यक्षेत्रात प्रगती.

**वृषभ** : आगोदर केलेल्या काम ाचा आज आपल्याला निश्चितच फायदा होणार असून आर्थिक आवक वाढणार आहे.

**मिथुन** : विचार पूर्वक कामे केली तर आजच दिवस चांगला जाईल. आपल्या कामाची स्तुती होईल. कौटुंबिक संबध सुधारतील.

**कर्क** : कौटुंबिक समस्या आणि स्थावर मालमत्ता या संबंधीतील समस्या दूर होतील. समाजात प्रतिष्ठा मिळाल्याने आनंदी रहाल.

**सिंह** : व्यवसायामध्ये अनकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल.

**कन्या** : देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधपणा ठेवा. मुलांच्या बाबतीत काळजी वाटेल. देवाधर्मावरील विश्वास वाढेल.

**तुळ** : व्यापार, व्यवसाय चांगला राहील. महत्वाचे काम हाती घेतले असेल तर ते पूर्ण होण्याचे योग आहेत. वाईट सवयींपासून दूर रहा. प्रवास यशस्वी होऊन आनंददायी राहील.

**वृश्चिक** : नवीन योजना आखल्यामुळे निश्चितच फायदा होणार आहे. मानसिक शांती मिळेल. सहचरणीची साथ लाभेल. मुलांच्या नौकरीची चिंता राहणार आहे. आर्थिक स्थिती मध्यम राहील.

**धनु** : आत्मविश्वासामध्ये वाढ झाल्याने कोणतेही काम सहजतेने करू शकाल. घराम ध्ये लक्ष दिले असता घरातील समस्या सहजासहजी दूर होतील. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

**मकर** : भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील. पारिवारीक सहकार्याने कामात यश मिळेल.


**कुंभ** : मुलांच्या प्रगतीमुळे मन प्रसन्न राहील.

**मीन** : कामकाजामध्ये वाढ होईल अनकुल स्थिती राहणार आहे. वेळेचा चांगला उपयोग करून आपल्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने काम काजाला सुरूवात करा.

# पंतप्रधान मोदींचा चालू वर्षात सोलापूरचा तिसरा दौरा

## पोलिसांच्या योग्य नियोजनामुळे प्रत्येक दौरा यशस्वी

### अप्पर पोलिस महासंचालकांकडून कौतुक



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि १३ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने भाजप महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज (मंगळवारी) सोलापुरात आले होते. त्यांच्या दौऱ्यात कोणताही गैरप्रकार किंवा चूक होणार नाही, यादृष्टीने पोलिसांचा बंदोबस्त नेमला होता. रंगभवन चौक, पंचकट्टा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, मंगळवेढेकर इन्स्टिट्युटसमोर बॅरिकेटिंग लावून त्याठिकाणी स्वतंत्र अंमलदार नेमले होते. सकाळी १० पासून रस्त्यांवर व ११ नंतर सभेच्या ठिकाणी खडा पहारा देणाऱ्या पोलिसांनी पंतप्रधानांचा दौरा यशस्वी केला.

सोलापूरचे पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांच्या कार्यकाळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा तिसरा दौरा होता. रे नगर प्रकल्पाच्या लोकापर्णानंतर पंतप्रधान मोदी हे २०२४च्या लोकसभा निवडणुकीतही सोलापूरला आले होते. त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी तिसऱ्यांदा सोलापुरात आले होते. तिन्हीवेळा पोलिसांनी त्यांचे दौरे कोणत्याही गैरप्रकाराशिवाय पार पाडले आहेत. पंतप्रधान सोलापूरला येणार असल्याने विमानतळ ते होम मैदान या रोडवर सकाळी दहापासूनच पोलिस अंमलदार नेमले होते. सभेच्या ठिकाणी ११ पासून अंमलदार होते. नेमलेल्या ठिकाणी प्रत्येकजण तैनात आहे की नाही, याची पाहणी उपायुक्त विजय कबाडे, अजित बोऱ्हाडे, डॉ. दिपाली काळे यांनी केली. त्यानंतर पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांनीही सर्व बंदोबस्ताची पाहणी केली. सभा संपल्यावर पंतप्रधानांना विमानतळापर्यंत पोच करण्यात आले.

#### दोन चपाती, शिरा जागेवरच खावून बंदोबस्त

छत्रपती संभाजी नगर विभागासह अन्य ठिकाणाहूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यासाठी बंदोबस्त मागविण्यात आला होता. जवळपास अडीचशे अधिकारी व कर्मचारी बाहेरील होते. याशिवाय सोलापूर शहरातील सातशे ते आठशे अंमलदार देखील बंदोबस्तासाठी नेमले होते. पंतप्रधान दौऱ्यानिमित्त बंदोबस्तासाठी एकूण १५० अधिकारी व ८०० अंमलदार होते. बाहेरून बंदोबस्तासाठी आलेल्या पोलि अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सभेच्या ठिकाणीच जागा मिळेल तेथे दोन चपात्या, भाजी व शिरा खावून बंदोबस्ताची ड्युटी पार पाडली



# कामगारांसाठी आमदार बनायचे आहे : आडम मास्तर

### दत्तनगर येथून काढण्यात आली पदयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ नोव्हेंबर -**

विधानसभा निवडणूक आता शिगेला पोहोचली आहे. मतदानाचा दिवस जसजसा जवळ येत आहे, तसतसा प्रचाराची धामधूम वाढत आहे. शहर मध्य विधानसभा मतदारसंघात भाजप, काँग्रेस, माकप, आणि एम आय एम यांच्या चौरंगी लढत असून, माजी आमदार नरसैया आडम मास्तर यांनी निवडणुकीच्या प्रचारात विरोधकांवर जोरदार हल्ला करत पदयात्रेतून मतदारांशी संवाद साधला आहे. यावेळी मतदारांनी देखील माजी आमदार आडम मास्तर यांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत, आम्ही तुमच्या सबत आहोत असे सांगितले.

दरम्यान आडम मास्तर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना कामगारांसाठी ही निवडणूक लढवायची आहे आणि काम गारांसाठीच आमदार बनायचे आहे, असे सांगत माझ्या आम दारकीची सुरुवात दत्तनगर येथूनच झाली आणि शेवट देखील इथेच होणार आहे. अशी भावनिक साद घातली. तत्पूर्वी बुधवारी सकाळी ११ वाजता दत्तनगर येथील माकप कार्यालयातून पदयात्रा सुरू झाली. यापदयात्रेत माकपचे अनेक ज्येष्ठ पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते. पूर्वभागातून सदरची पदयात्रा काढण्यात आली.

# सिंहगड इन्स्टिट्यूटचे पाच विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी परदेशी रवाना



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

येथील एन.बी. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्प्युनिकेशन, कॉम्प्युटर सायन्स विभागातील पाच विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशी रवाना झाले.

स्वप्नील शरद मेरगू, श्रुतिका विशाल महिंद्रकर, अराफत मोहम्मद नदाफ, सानिया हकीम, आरती संतोषकुमार ओमणे हे पाच विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांना पालकांसह संस्था सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांनी या उच्च पदव्युत्तर शिक्षणासाठी निवड होण्यासाठीचे श्रेय एनबीएन सिंहगड इन्स्टिट्यूटला दिले. स्वप्निल हा कॉम्प्युटर सायन्सचे पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी युनिव्हर्सिटी ऑफ सेंट्रल मिसूरी येथे, श्रुतिका ही आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे पदव्युत्तर शिक्षणासाठी युनिव्हर्सिटी ऑफ ईस्ट लंडन येथे गेले आहेत. अराफत हा मास्टर ऑफ सायन्स सायबर सिक्युरिटीज प्रोग्राम च्या शिक्षणासाठी बोस्टन कॅम्पस, खौरी कॉलेजमध्ये प्रवेश, सानिया ही मास्टर ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स इन बिझनेस कोर्ससाठी दुबई स्थित एसपीजी ग्लोबल कॉलेजमध्ये दाखल झाली आहे. आरती ही आर्टिफिशियल इंटेलिजन्स वेस्ट लंडन स्थित युनिव्हर्सिटी ऑफ ग्रीनवीच येथे प्रवेश घेतला आहे. या विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. शेखर जगदे, डॉ. आर. टी. व्यवहारे, प्रा. एच.टी. गुरमे, प्रा. एस. एस. शिरगण यांचे मार्गदर्शन लाभले.

# विकासकामांच्या जोरावरच विजयाची हॅटट्रिक साधणार

- आमदार सुभाष देशमुख यांचा विश्वास
- शहरासह ग्रामीण भागात विविध ठिकाणी कॉर्नर बैठका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून म ागील १० वर्षात केलेल्या विकासकामाच्या माध्यमातून दक्षिण सोलापूरच्या झालेल्या विकासाच्या जोरावर आपण या विधानसभा निवडणुकीत नक्कीच हॅटट्रिक करू, असा विश्वास आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार देशमुख यांनी सोमवारी संध्याकाळी आणि मंगळवारी सकाळच्या सुमारास शहर आणि आणि ग्रामीण भागातील विविध ठिकाणी भेटी दिल्या. यामध्ये अमृत नगर, गंगाधर नगर, ग्रामीण भागातील वांगी, वडकबाळ सह अनेक ठिकाणी कॉर्नर बैठका घेतल्या. यावेळी आमदार देशमुख यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांशीही संवाद साधला. कार्यकर्त्यांनी मला केवळ आता आठ दिवस द्यावे त्यानंतर मी कार्यकर्त्यांसाठी पूर्ण पाच वर्ष सेवा करणार आहे असे सांगत आमदार देशमुख यांनी कार्यकर्त्यांना प्रचार यंत्रणा कशी राबवावी, त्यासाठी नियोजन कसे करावे आणि प्रत्येक बुथवर जास्तीत जास्त मतदान कसे करून घ्यावे याबद्दल मार्गदर्शन केले.



अमृत नगर येथे नंदू पाटील, किशोर पवार, नरसिंह गुमटे, रवी सरमाळकर, शांताबाई शिंदे,प्रणव कुलकर्णी, उज्वला पाटील,छाया जाधव आदी उपस्थित होते. गंगाधर नगर येथे याप्रसंगी ॲड हेमंत माळी, ॲड मचाले, ॲड कोणापुरे,ॲड लोंढे,ॲड मंजुनाथ कक्कलमेळी,ॲड टाकळीकर, ॲड स्नेहा सरभी, तसेच सोसायटीचे सर्व सभासद, महिला, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

शिवयोगी नगर सोसायटी येथील सोसायटीतून मोठ्या मताधिक्याने सुभाष देशमुख यांना निवडून आणण्याचा निर्धार केला. याप्रसंगी देवानंद चिलवंत, विशाल गायकवाड, संगीता जाधव, सोसायटीचे अध्यक्ष पाटीलताई, डॉ. सोळसे, हचडे , वळसंग तसेच सोसायटीचे सर्व सभासद, महिला, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. वांगी येथील कॉर्नर बैठकीप्रसंगी आनंद तालुकाध्यक्ष संगप्पा केरके, शामराव हांडे,राहुल पुजारी, सुनील व्हनमाणे व ग्रामस्थ उपस्थित होते. शेवटी आमदार देशमुख यांनी वडकबाळ या गावी भेट देऊन नागरिकांना विकासासाठी महायुतीला साथ देण्याचे आवाहन केले. यावेळी होगेप्पा पुजारी, सिद्धप्पा बिराजदार, परसप्पा गडदे, सुनील व्हनमाने, विलास राठोड व ग्रामस्थ उपस्थित होते.

# महाविकास आघाडीचे महेश कोठे यांच्या प्रचारात सुरेश पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

माझ्यावर विषप्रयोग केलेल्या भाजपच्या लोकांना तुम्ही निवडून देणार का असे म्हणत सुरेश पाटील यांनी भाजपला घरचा आहेर दिला आणि महेश कोठे यांना जाहीर पाठींबा देत निवडून देण्याचे आवाहन केले

विधानसभा निवडणुका जसजशा जवळ येत आहेत तसा या निवडणुकीचा ज्वर वाढत असून, एकमेकांवर आरोप प्रत्यारोप सुरू आहेत. मागील काही वर्षांपासून भवानी पेठ परिसर हा भाजपचा बाले किल्ला मानला जातो. या भागात नगरसेवक देखील भाजपचे निवडून येतात. रविवारी सायंकाळी दाळगे प्लॉट येथे महाविकास आघाडीचे उमेदवार महेश कोठे यांची कॉर्नर बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी पाटील यांनी भाजपावरच तोफ डागली. या कॉर्नर सभेला नागरिकांची मोठी गर्दी होती. यावेळी भाजपचे माजी नगरसेवक सुरेश पाटील हे देखील उपस्थित होते. यावेळी पाटील पुढे म्हणाले, ज्या भाजप मधील लोकांनी मला त्रास दिला, माझ्यावर विष प्रयोग केला अशा लोकांना निवडून देऊ नका, म्हणत शहरातील स्थानिक भाजप नेत्यांवर हल्लाबोल करत घरचा आहेर दिला आहे. त्याच बरोबर महेश कोठे यांना सहकार्य करण्याचे आवाहन देखील केले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार महेश कोठे, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिकांची उपस्थिती होती.





## बैलाने मारल्याने वृद्ध महिला जखमी

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

राहत्या घराजवळ पायी जात असताना बैलाने मारल्याने मोहोळ तालुक्यातील वाळूज गावातील वृद्ध महिला वृदध जखमी झाली. हा प्रकार मंगळवारी दुपारी साडेबारा वाजता घडला. पद्मिनी अंबऋषी माने (वय ७३) असे जखमी महिलेचे नाव आहे. पद्मिनी या मंगळवारी दुपारी राहत्या घरापासून पायी जात होत्या. त्यावेळी तेथे असलेल्या बैलाने त्यांना मारले. यात त्यांच्या पायाला जखम झाली. तसेच मुक्कामार लागल्याने मुलगा मोहन माने यांनी दुपारी पावणेपाचच्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

# दक्षिणमधील सिंचनाचा प्रश्न सोडवून हरितक्रांती करु : काडादी

## बसवनगर, मंद्रूप, येळेगाव, अंत्रोळी, वडापूर येथे गावभेट दौऱ्यास मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. १३ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यात अद्यापही सिंचनाचा प्रश्न सुटलेला नाही.त्यामुळे बहुतांश शेती कोरडवाहू आहे. तालुक्यातील सिंचनाचे क्षेत्र वाढविणे ही काळाची गरज आहे. त्याशिवाय तालुका समृद्ध आणि वैभवशाली होणार नाही. तालुक्यात हरितक्रांती होण्यासाठी आपण वडापूर येथे बॅरेजेस करण्याबरोबरच सीना आणि भीमा या दोन्ही नदीवरील बंधाऱ्याची उंची वाढवू तसेच तालुक्यात उजनी धरणाचे कालवे शेत शिवारात पोहोचवू अशी ग्वाही अशी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांनी दिली.

मंगळवारी काडादी यांचा दक्षिण सोलापूर तालुक्यातील तेरामैल, मंद्रूप, येळेगाव, अंत्रोळी वडापूर येथे गाव भेट दौरा झाला या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा दूध संघाचे संचालक सुरेश हसापुरे सोलापूर बाजार समितीचे संचालक बाळासाहेब शेळके, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष हरीश पाटील, शेतकरी संघटनेचे शिवानंद दरेकर,युवक काँग्रेसचे अध्यक्ष महेश जोकारे,मोतीलाल राठोड,



श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याचे संचालक विद्यासागर मुलगे, महादेव जम्मा, सिद्धाराम व्हनमाने, अरुण लातूरे, बाळासाहेब बिराजदार, शिवानंद कलशेट्टी, लक्ष्मण झळकी, अनंत म्हेत्रे, अख्तरताज पाटील, सिद्राम हेळकर आदी उपस्थित होते.

काडादी म्हणाले, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याने नेहमीच जिल्ह्यात ऊसाला उच्चांकी दर दिला आहे.नेमकी हीच बाब आमदार सुभाष देशमुख यांना खटकली आहे. सहकारमंत्री असूनही सहकार चळवळीस आणि सहकारी संस्थांना प्रोत्साहन देण्याऐवजी सहकार चळवळ मोडीत काढण्याचे काम त्यांनी केले आहे. सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना बंद पडला तर येथील ऊस आपल्या खासगी कारखान्यास मिळेल ही भावना ठेवून त्यांनी सिद्धेश्वर कारखान्याची चिमणी पाडली आहे. गेल्या दहा वर्षात त्यांनी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा काहीच विकास कामे केली नाहीत, असा आरोप केला.

कामे पूर्ण करणे अपेक्षित असताना आम दार देशमुख हे केवळ सूडाचे आणि व्देषाचे राजकारण करून गावागावात भांडण लावत आहेत.

सोलापूर दक्षिण विधानसभेचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आपल्याला मतदारराजांनी भरघोस मतांनी विजयी करावेत असे आवाहन त्यांनी शेवटी बोलताना केले. यावेळी बाळासाहेब शेळके व सुरेश हसापुरे यांचीही भाषणे झाली.

# मतदारांना मतदानाच्या दिवशी सुट्टी द्यावी

### सहाय्यक कामगार आयुक्तांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

जिल्हयातील ११ विधानसभा मतदार संघ क्षेत्रात मतदानाचा हक्क बजावण्यासाठी योग्य संधी प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने या क्षेत्रात असलेल्या मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय मुंबई यांचे परीपत्रकानुसार मतदानाच्या दिवशी सुट्टी अथवा दोन तासाची सवलत ही उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने दुकाने इत्यादीना लागू राहणार असल्याचे सहाय्यक कामगार आयुक्त सु.म.गायकवाड यांनी केले आहे.

जिल्हयातील खाजगी कंपन्या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे नाटय गृहे व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इत्यादींना सुचना देण्यात येत आहे कि, २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाच्या दिवशी कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सार्वजनिक सुट्टी देण्यात यावी.

जर अपवादात्मक परिस्थितीत उत्पादन प्रक्रीयेतील कारखाना सुरु ठेवून मतदानासाठी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देण्याबाबत जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असून, त्यांच्या परवानगीनेच दोन तासांची सवलत देता येईल. याची दक्षता संबधित अस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील. कामगारांच्या मतदाना विषयक काही तक्रारी असल्यास कार्यालयाच्या ०२१७-२७२८४०१ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

## संक्षिप्त वृत्त



### वटवृक्ष मंदिरातील प्रसन्नता अत्यंत मौलिक : टी. विक्रम

**अक्कलकोट, दि.१३ नोव्हेंबर-**

वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज मंदिरातील प्रसन्नता अत्यंत मौलिक असून मनाला समाधान देणारे असल्याचे मनोगत वरिष्ठ भारतीय पोलीस सेवा (IPS) अधिकारी तथा मुंबईचे पोलीस महानिरीक्षक (IGP) टी.विक्रम यांनी व्यक्त केले. येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज संस्थानचे कामकाज व दिनचर्या हे अत्यंत सेवाभावी वृत्तीने चालत असून मंदिरातील सर्व व्यवस्था देखील अत्यंत उत्तम आहे, त्यामुळे येथे येणाऱ्या प्रत्येक भाविकाप्रमाणे आपणासही स्वामींचे आशिर्वाद व मानसिक समाधान लाभले आहे. ते नुकतेच सहकुटुंब स्वामींच्या दर्शनाकरिता येथे आले असता बोलत होते. या प्रसंगी मंदिर समितीच्या वतीने टी.विक्रम यांचा व याप्रसंगी उपस्थित पुण्यातील डीवायएसपी विनीत गुप्ता, सचिन काशीद, इन्स्पेक्टर नीरज, एपीआय बागव इत्यादींचा समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी श्रींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. याप्रसंगी टी.विक्रम बोलत होते. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा.शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, सागर गोंडाळ, चित्तरंजन अगरथडे, प्रसाद सोनार, गिरीश पवार, नागनाथ गुंजले, सचिन हन्नूरे, मनोज जाधव उपस्थित होते.



### तुळशी, बावी गावांना पाणी आणल्याशिवाय फेटा बांधणार नाही : आ. बबनदादा शिंदे

**मोडनिंब, दि. १३ नोव्हेंबर-**

सीना-माढा सिंचन योजनेचे पाणी माढा तालुक्यातील तुळशी आणि बावी गावांना आणून दिल्याशिवाय मी फेटा बांधणार नाही, असे प्रतिपादन आमदार बबनराव शिंदे यांनी तुळशी (ता. माढा) येथे जाहीर प्रचार सभेत केले आहे. माढा विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार रणजीत बबनराव शिंदे यांच्या प्रचारार्थ आ. बबनराव शिंदे यांचे गावभेट दौरे सुरू आहेत. जाधववाडी येथे पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रेचे ठिकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत करुन मतदारांनी रणजीत शिंदे यांना विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला. सहभागी युवकांनी जाहीरनाम्यातील ठळक मुद्यांवर घोषणा दिल्या. केवड, जामगाव, अंजनगाव (उ), जाधववाडी (मो), बैरागवाडी, तुळशी, उपळाई येथे दौऱ्याप्रसंगी पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी सहभाग नोंदवला. आमदार शिंदे म्हणाले की, सीना-माढाच्या पाण्यापासून तुळशी, बावी, अंजनगाव खे. व परितवाडी ही चार गावे भौगोलिक कारणामुळे वंचित राहिली आहेत. या गावांना सिंचन योजनेचे पाणी मिळावे म्हणून शासनाकडे प्रयत्न केले असून आता हे यश अखेरच्या टप्प्यात आलेले आहे. आपण सर्वांनी रणजित बबनराव शिंदे यांना आमदार म्हणून काम करण्याची संधी द्यावी, असे आवाहन आ. शिंदे यांनी केले. तुळशीत सरपंच डॉ. शरद मोरे यांनी प्रास्ताविक केले. उपसरपंच दिगंबर माळी यांनी स्वागत केले. यावेळी संजय पाटील-भिमानगरकर, शिवाजी कांबळे, शंभुराजे मोरे, प्रा. सुहास पाटील, दीपक कुलकर्णी, कैलास तोडकरी,नितीन बागल, किशोर व्यवहारे, पांडुरंग गव्हाणे, गोपाळ दगडे गायकवाड उपस्थित होते

### आटयापाट्या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील तीन खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड

**बार्शी, दि. १३ नोव्हेंबर-**

दि. ८ ते १० नोव्हेंबर रोजी तामिळनाडू येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धे साठी तीन खेळाडूची निवड झाली होती. शेगाव येथे झालेल्या राज्यस्तरीय ज्युनिअर स्पर्धेत सोलापूरच्या मुलीच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला तर मुलांच्या संघाने नेत्रदीपक कामगिरी केली होती परंतु त्यांना अंतिम फेरी गाठता आली नाही. या स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड करण्यात आली यामध्ये सोलापूर च्या मुलांच्या संघातून एक व मुलींच्या संघातून दोन अशा तीन खेळाडूंची निवड करण्यात आली . मुलांच्या संघात रत्नदीप अनुसे तर मुलींमध्ये सलोनी आसबे, राजनंदिनी घोलप या खेळाडूंची निवड झाली होती. हे खेळाडू दि. ७ तारखेला राष्ट्रीय स्पर्धेसाठी रवाना झाले होते, महाराष्ट्रच्या मुलांच्या व मुलींच्या संघाला या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला. त्यांना जिल्हा संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब कापसे उपाध्यक्ष राजकुमार मुंबरे, जिजाऊ गुरुकुल संस्थेचे संस्थापक संभाजीराव घाडगे तसेच सोलापूर जिल्हा कोच दत्ता झांबरे, मल्हारी भुसणर यानी सर्वांनी खेळाडूंचे राष्ट्रीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

### आर्या कृषी महाविद्यालयात वेबिनारचे आयोजन

**माढा, दि. १३ नोव्हेंबर-**

विठ्ठल प्रतिष्ठान निमगाव (टे.) संचलित आर्या कृषी महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार यांच्या 'आस्क आवर एक्सपर्ट' या विशेष वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या वेबिनारचा उद्देश' ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटस्' आणि 'नॅशनल ॲकॅडेमिक डिपॉझिटरी' या संकल्पनांची माहिती देणे आणि नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत विद्यार्थ्यांना त्यांचा लाभ कसा मिळवता येईल, हे स्पष्ट करणे हा होता. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. नितीन उबाळे आणि प्रा. के. पी. वाघे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. वेबिनारमध्ये एबीसी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या क्रेडिटस् संचयित आणि हस्तांतरित करण्यास मिळणाऱ्या सुविधांची माहिती देण्यात आली. तसेच एनडी प्रणालीच्या माध्यमातून शैक्षणिक प्रमाणपत्रांचे सुरक्षित संचयन आणि सहज उपलब्धता कशी साधता येईल, यावरही सखोल मार्गदर्शन करण्यात आले. नव्या शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला असून विद्यार्थ्यांना या वेविनारमधून शैक्षणिक लाभ मिळवण्यासाठी आवश्यक माहिती प्राप्त झाली. या वेबिनारला प्रा. तुषार नामदे, प्रा. संदीप मुरूमकर, डॉ. तृप्ती राठोड, प्रा. ज्ञानेश्वरी झोळ, रोहित घळके आणि कुमार शिंदे यांची विशेष उपस्थिती लाभली.

# पंढरपुरात कचरा उचलण्याचे काम युद्ध पातळीवर

## कार्तिकी यात्रा; धूर, जंतुनाशक फवारणी देखील केली चालू

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ नोव्हेंबर -**

कार्तिकी यात्रे नंतर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व पंढरपूर नगर परिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी पंढरपूर शहर लवकरात लवकर स्वच्छ होण्याच्या दृष्टीने विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात यावी अश्या सूचना दिल्या आहेत. त्या नुसार युद्ध पातळीवर विशेष स्वच्छता मोहीम हाती घेतली असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांनी दिली.



कार्तिकी यात्रा कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपूर शहरामध्ये दाखल झाले आहेत. यामध्ये प्रामुख्याने ६५ एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर व शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे. यात्रे नंतर बहुतेक द्वादशी दिवशी शहरातील कचरा उचलण्याचे काम हाती घेण्यात येते परंतु यावर्षी भाविकांची संख्या कमी असल्याने वाहने प्रदक्षिणा मार्ग व इतर ठिकाणी जात असल्याने मठामध्ये व परिसरात साठलेला कचरा गोळा करण्याचे काम त्वरित हाती घेण्यात आले आहे.

दरम्यान एकादशीच्या रात्री पासुनच २४ तास स्वच्छता व कचरा गोळा करण्याचे काम चालू केले आहे येत्या दोन दिवसात शहरातील सर्व कचरा उचलण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. याकामी शहरासह ६५ एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर, शहर उपनगर आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी १ हजार १०० स्वच्छता कर्मचारी काम करत आहेत. मात्र बऱ्याच ठिकाणी भाविकांनी उघड्यावर खरकटे अन्न व इतर घाण केल्याने दुर्गंधी पसरल्याचे तक्रारी नगर परिषदेकडे प्राप्त झाले आहेत. यावर्षी सारखा पाऊस पडत असल्याने पावसाची पाणी साठल्याने डासाचे ही प्रमाण वाढले आहे त्यामुळे कचरा उचलण्याचे कामा बरोबरच नगरपरिषदेच्या आरोग्य विभागामार्फत जंतुनाशक पावडर फवारणी व ६ ब्लोअर मशीन ने बायो कल्चर फवारणी हाती घेतली आहे. त्यामुळे झालेल्या घाणीचे डीकंपोस्टिंग होऊन दुर्गंधी नष्ट होणार आहे. तसेच मलेरिया विभागाकडून ५० कर्मचारी ५ हातपंप द्वारे डासअळी नाशक फवारणी व ४ फॉगींग मशीन द्वारे धूर फवारणी करण्यात येते आहे. स्थानिक नागरिकांनी व भाविकांनी आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी नगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहनही मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांनी केले असून मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी ॲड. सुनील वाळुजकर, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, आरोग्य निरीक्षक नानासाहेब गोरे, नागरी हिवताप प्रमुख शुभांगी अधटराव व सर्व विभाग प्रमुख यात्रा स्वच्छ व सुरळीत पार पडण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहेत.

> शहरातील भाग व रुळाच्या वरील भाग किंवा उपनगर असे दोन भाग करण्यात आलेले आहेत. जंतुनाशक फवारणीसह, अबेट, मॅलेथॉन पावडर, सर्वत्र टाकण्यात येत आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत ४१ घंटागाडी, आरोग्य विभागाकडील ६ टिपर, ३ कॉम्पॅक्टर, ६ डंपिंग ट्रॉलिने व जेसीबीच्या सहाय्याने १ हजार १०० कर्मचाऱ्यांमार्फत स्वच्छता करण्यात येत आहे.

# कारखानदार विरुद्ध नोकरदार अशी ही निवडणूक

## महादेव कोगनुरे; मनसेच्या पदयात्रेला नीलम नगरात प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १३ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर मतदारसंघातील सामान्य मतदारांना हे माहिती आहे की महादेव कोगनुरे हा जनसेवक प्रामाणिक आहे. धनाढ्य कारखानदार नाही. त्यामुळे सामान्य जनता माझ्या पाठीशी आहे. त्यामुळे माझा विजय निश्चित आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार महादेव कोगनुरे यांनी केले. सोलापूरात ठिकठिकाणी निघालेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदयात्रेला पदाधिकारी कार्यकर्ते आणि सामान्य मतदारांनी जोरदार प्रतिसाद दिला.



सकाळी आठ ते दुपारी एकपर्यंत आकाशवाणी केंद्र, जगदंबा देवी मंदिर, भावताऋषी नगर, ज्योती नगर, जाधव पिठाची गिरणी, शरणबसवेश्वर नगर, भाग्यश्री नगर, गवळी वस्ती, बनशंकरी बोळ, गंगा चौक, नवदुर्गा मंदिर, नीलम नगर, गणेश मंदिर, करली चौक, थोबडे बस स्टॉप, महांतेश्वर मंदिर, मार्कंडेय चौक, शिवशरण मठ, मोनेश्वर शाळेकडून डावीकडे जमादार वस्ती, तक्का वस्ती, विजयनगर आदी भागात पदयात्रा निघाली.

हातात मनसेचे झेंडे, गळ्यात पटके घालून ज्येष्ठ नागरिक, तरुण, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. 'आवाज कुणाचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा', 'महादेव कोगनुरे यांचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सामान्य मतदारांनीही आतषबाजी करून पुष्पगुच्छ देऊन व पुष्पहार घालून कोगनुरे यांचे स्वागत केले.

> **पदयात्रेला प्रतिसाद**
>
> नीलम नगर, गणेश मंदिर परिसर भारतीय जनता पक्षाचा गड मानला जातो. त्या भागातही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महादेव कोगनुरे यांना जोरदार प्रतिसाद मिळाला. ढोल ताशे व पारंपारीक वाद्यांच्या पदयात्रेला ठिकठिकाणी अनेक महिलांनी औक्षण करून आशीर्वाद दिले. पदयात्रेत माता-भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# निवडणूक कामात टाळाटाळ करणाऱ्यांवर होणार फौजदारी कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ नोव्हेंबर-**

सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पंढरपूर विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे तसेच २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणूक कामकाजाकरिता विविध आस्थापनांच्या मनुष्यबळाची नियुक्ती केली आहे. निवडणूक नियुक्त जे अधिकारी, कर्मचारी निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहतील अथवा निवडणुकीच्या कामात हयगय करतील अशांवर लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ अंतर्गत फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले आहे.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने मतदारसंघात आवश्यक अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती केली आहे. निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून अशा प्रकारे जे कर्मचारी निवडणुकीसाठी त्यांना प्राप्त झालेले आदेश नाकारतील, निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहतील अथवा निवडणुकीच्या कामात हयगय करतील त्यांच्यावर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ अंतर्गत थेट फौजदारी कारवाई करावी, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी यांना जिल्हा निवडणूक कार्यालयाकडून देण्यात आले आहेत.

पंढरपूर विधासभा मतदार संघात मतदान प्रक्रिया व्यवस्थित आणि सुलभपणे व्हावी यासाठी मतदान यंत्राची हाताळणी, मतदान प्रक्रिया यासंबंधीचे सखोल ज्ञान तसेच मतदारांची गैरसोय होवू नये यासाठी घ्यावयाची काळजी आणि सर्व बाबींचे प्रशिक्षण संबंधित अधिकारी-कर्मचारी यांना देण्यात येत आहे. या प्रशिक्षणास गैरहजर राहिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ अंतर्गत फौजदारी कारवाई करण्यात येईल. तसेच संबधितांवर गुन्हा दाखल करुन खाते अंतर्गत चौकशी लावण्यात येईल. त्यामुळे अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी याबाबत नोंद घेऊन तत्काळ निवडणूक कर्तव्यावर हजर व्हावे, असे आवाहनही निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.



# गरिबांच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या उमेदवाराला निवडून द्या : दिलीप धोत्रे

## पंढरपुरात मनसेकडून प्रचाराचा धडाका

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ नोव्हेंबर -**

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी जोरदार सुरू झाली आहे. निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्याकडे जात असताना उमेदवारांकडून होम टू होम प्रचारवर भर दिला जात आहे.

प्रचार फेरी, कॉर्नर सभा, जाहीर सभेच्या माध्यमातून शेवटच्या मतदारापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार दिलीप धोत्रे यांनी मंगळवेढा शहर आणि तालुक्यात प्रचाराचा धुराळा उडून ते पंढरपूर शहरात जोरदार प्रचार करताना दिसत आहेत. मनसे उमेदवार दिलीप धोत्रे यांच्या प्रचारार्थ पंढरपूर शहरातील विविध ठिकाणी मंगळवारी सभेचे आयोजन करण्यात येत आहे. प्रत्येक सभेच्या ठिकाणी पंढरपूर शहरात त्यांचे नागरिकांकडून जोरदार स्वागत करण्यात येत आहे. दरम्यान कुंभार गल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेत नागरिकांनी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याची समस्या सोडवण्याची विनंती केल्यानंतर दिलीप धोत्रे यांनी तात्काळ रस्ता पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यावेळी दिलीप धोत्रे यांच्या उपस्थितीत पंढरपूर येथील शेकडो कार्यकर्त्यांनी त्यांना पाठिंबा देत प्रवेश केला.

# पंढरपूरमध्ये महाविकास आघाडीकडून अजून एक धक्का

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ नोव्हेंबर -**

पंढरपूर-मंगळवेढा या मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व कॉंग्रेस यांच्यामध्ये जोरदार रस्सीखेच होताना दिसून येत आहे यामध्येच काल राष्ट्रवादीचे डॉ अमोल कोल्हे यांनी पंढरपूर येथे उमेदवार अनिल सावंत यांच्या निवासस्थानी एक पत्रकार परिषद घेऊन सविस्तर माहिती देऊन सर्व गोष्टींचा खुलासा केला. आपला विरोधक फक्त आणि फक्त भाजप पक्ष आहे आणि विद्यमान आमदार आहेत.



दरम्यान बुधवारी अनिल सावंत यांनी पंढरपूर तालुक्यातील मधील गावांचा झंझावाती दौरा सुरु केला त्यातच लक्ष्मी टाकळी येथे अनेक नेत्यांनी आपल्या भाषणात गतवेळी दोन वर्ष दोन्ही मतदारसंघांमध्ये पंढरपूर असेल मंगळवेढा असेल या मतदारसंघांमध्ये गाव बैठक घेऊन प्रचार केला आणि निवडणुकी पुरती आश्वासने दिल्याने त्यांच्यावरती विश्वास ठेवून त्यांना मतदान केले अशा भावना व्यक्त केल्या. पण त्यांनी काय केले? असा सवाल हि मतदारांना संबोधित करताना नेत्यांनी केला. आधीच्या नेत्यांनी सगळ्यांचा विश्वास तोडला असे नमूद केले , विद्यमान आमदारांना की ज्या माणसांच्या,मतदारांच्या पाठीमागे लागून आपण खुर्चीवर बसला त्याच माणसांना आपण वाऱ्यावरती सोडले ही परिस्थिती जर त्यांच्या जवळच्या व्यक्तींची असेल तर आपल्या सामान्य जनतेचा आणि कार्यकर्त्यांचे काय होणार?

या भागामध्ये विकास करत असताना एवढ्या कोटीचा निधी आणला तेवढ्या एवढ्या कोटीचा विकास निधी आणला अशा वलग्ना करणारे विद्यमान आमदार. खरंच या भागात विकास झाला का..? जेवढा निधी आणला त्याच पद्धतीचा विकास झालाय? का नाही? हे माझ्यापेक्षा आपल्या लोकांना आणि अधिक तरुण पिढीला तुमच्यासारख्या समोर बसलेल्या मातांना, भगिनींना चांगलं माहिती असल्याचे प्रतिपादन उमेदवार अनिल सावंत यांनी केले.

दरम्यान लक्ष्मी टाकळी येथे बुधवारी परमेश्वर लक्ष्मण देठे, माजी संचालक विठ्ठल सहकारी साखर कारखाना. मा.संचालक पंढरपूर मार्केट कमिटी. महादेव मारुती देठे माझी संचालक सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना. मच्छिंद्र अर्जुन देठे प्रगतशील बागायतदार. रघुनाथ विठ्ठल देठे. हनुमंत शिवाजी देठे. मारुती सुखदेव रवळू. नाथा रमेश देठे. राजेंद्र रंगनाथ बागडे. बजरंग महादेव देठे. धर्मा गोवर्धन लवंड. विशाल बंडू देठे अधिक कार्यकर्त्यांनी अनिल दादा सावंत गटात जाहीर प्रवेश केला.

यावेळी लक्ष्मी टाकळी गावातील तसेच महाविकास आघाडीतील पदाधिकारी कार्यकर्ते तसेच गावातील ग्रामस्थ महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी आपला ऊस दामाजी कारखान्यास गळीतास द्यावा

## चेअरमन शिवानंद पाटील; दामाजी कारखान्याचा गळीत हंगामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.१३ नोव्हेंबर-**

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचा ३२ वा गळीत हंगाम शुभारंभ मागील गळीत हंगामात जास्तीत जास्त ऊस पुरवठा केलेले पहिले एक ते दहा शेतकरी यांचे हस्ते पार पडला.



सन २०२३-२४ चे गळीत हंगामात जास्तीत जास्त ऊस पुरवठा केलेले सभासद शेतकरी रोहित गावडे, सिध्दाराम चौगुले, अनिल चौगुले, सावित्री शेट्टी, सुरेश कलुबर्मे, सिध्दराया चौगुले, प्रताप रोकडे, प्रविण जाधव, नितीन भोसले, बाळासाहेब चव्हाण या शेतक-यांचे हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे माजी चेअरमन ॲड. नंदकुमार पवार होते. गळीत हंगाम शुभारंभानिमित्त सुरुवातीला कारखान्याचे संचालक भिवा दाजी दोलतडे व त्यांच्या पत्नी इंदुबाई दोलतडे यांच्या हस्ते श्री सत्यनारायण महापूजा करण्यात आली. कारखान्याचे कार्यकारी संचालक रमेश जायभाय यांनी स्वागत केले.

तसेच कारखाना गळीतासाठी तयार असुन संचालक मंडळाने ठरविलेल्या उध्दीष्टाप्रमाणे गळीत करणेस कामगार कमी पडणार नसलेचे आश्वासन दिले. याप्रसंगी बोलताना चेअरमन शिवानंद यशवंत पाटील म्हणाले, गेल्या गळीत हंगामात जास्तीत जास्त ऊस पुरवठा करणाऱ्या शेतक-यांच्या हस्ते गळीत हंगामाचा शुभारंभ करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला. आपल्या श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्यासाठी स्व. किसनलाल मर्दा, स्व. रतनचंद शहा, स्व. चरणुकाका पाटील यांचे मोठे योगदान आहे. या संचालक मंडळाने मागील हंगामातील सर्व देणी देवून एफ.आर.पी.पेक्षा जादा ऊस दर दिला आहे. गाळप हंगामासाठी पूर्ण क्षमतेने तोडणी वाहतूक यंत्रणा भरती केली असुन आसपासच्या इतर कारखान्याच्या बरोबरीने ऊसदर देण्यास संचालक मंडळ कमी पडणार नाही. या गळीत हंगामात संचालक मंडळाने ५ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे. तरी मंगळवेढा तालुक्यातील उत्पादक सभासद शेतक-यांनी आपला ऊस दामाजी कारखान्यास गळीतास पाठवुन कारखान्याचे प्रगतीसाठी सहकार्य करावे असे आवाहन केले. याप्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन तानाजी खरात, संचालक सर्वश्री मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणुकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द् लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, माजी संचालक मारुती वाकडे, भारत पाटील, जालिंदर व्हनुटगी, महादेव फराटे, काशिनाथ पाटील, किसन सावंजी, कल्याण डोके, बबन सरवळे, संतोष सोनगे, मुरलीधर सरकळे, महादेव भोजने, दत्तात्रय खडतरे, राहूल कसबे, हणमंत रोकडे, सुनिल डोके, गुंडोपंत देवकते, पंडीत कांबळे, गडदे गुरुजी, हेमंत निकम, राजेंद्र डोके, आबासो पाटील, दामोदर हेंबाडे, हणमंत रोकडे, पंडीत कांबळे, सिदराया चौगुले, परमेश्वर पवार, जोतीराम चव्हाण उपस्थित होते.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# सासुरे येथे उद्यापासून श्री महांकाळेश्वर यात्रा


**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १३ नोव्हेंबर-**

दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणार्या बार्शी तालुक्यातील तीर्थक्षेत्र सासुरे येथे श्री म हांकाळेश्वर यात्रेस शुक्रवार, १५ नोव्हेंबरपासून प्रारंभ होत असून ही यात्रा १९ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. यात्रेनिमीत्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असणारे श्री म हांकाळेश्वर हे मूळ उज्जैन येथील देवस्थान आहे. परंतु, दयाळ राजे या अवतारी पुरूषाच्या भक्तीस पावन होऊन देव सासुरे येथे प्रकटले तेव्हापासून हा यात्रा उत्सव दरवर्षी कार्तिक पौर्णिमेस साजरा करण्यात येतो. १५ नोव्हेंबर रोजी यात्रेचे मुख्य आकर्षण असणारा टोपाचा छबिना सकाळी ६ वाजता निघणार आहे. त्यानंतर दिवसभर शेरण्या, नैवेद्य, महाप्रसाद व विविध मंडळांच्या लेझीम खेळाचे प्रात्यक्षिक होणार आहे. तसेच १६ नोव्हेंबर रोजी दुपारी जंगी कुस्तीच्या फडाचे व महांकाळेश्वर केसरी चषक कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले आहे. सकाळी ९ वाजता हभप शशिकांत जाधवमहाराज यांची कीर्तन सेवा होणार आहे. रात्री छबीना निघणार आहे. १७ रोजी सकाळी हभप रामायनाचार्य राजन काशीद महाराज यांची कीर्तन सेवा होणार आहे. रात्री छबीना निघणार आहे. १८ रोजी सकाळी हभप काका काकडेमहाराज यांची किर्तन सेवा होणार आहे. रात्री छबीना निघणार आहे. १९ रोजी लळीत साजरी होणार असून रात्री अडीच वाजता टोपाच्या छबीन्याने यात्रा महोत्सवाची सांगता होणार आहे. या उत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष भाऊसाहेब आवारे, मार्गदर्शक विश्वस्त महादेव करंडे यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### अमर पाटील यांच्या पदयात्रेला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मंद्रुप, दि. १३ नोव्हेंबर-**
सोलापूर दक्षिण विधानसभा शिवसेना उबाठाचे उमेदवार अमर पाटील यांनी होटगी, फताटेवाडी, यत्नाळ, आदि गावात पदयात्रा काढून मशाल चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन केले. या पदयात्रेला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी ग्रामस्थांनी दहा वर्षात विकास खुंटला असून आमदार सुभाष देशमुख यांनी एखदाही गावाला भेट दिली नसल्याचे सांगितले. यावेळी अमर पाटील यांनी विकासाची संधी देण्याचे आवाहन केले. यावेळी गोपाल राठोड, राजेंद्र जाधव, राजेंद्र राठोड , प्रेम राठोड , राजू गंगदे, सिद्धराम बोळीगार, लिंगराज तोरणगी, राजकुमार हिरापुरे, आकाश गंगदे, संगमेश्वर कोणदी, राजकुमार मंदिले उपस्थित होते. माजी आमदार शिवशरण पाटील यांनी भाजपा सोडून शिवसेना पक्षात प्रवेश केल्याने अमर पाटील यांची ताकद वाढली आहे. अमर पाटील यांच्या विजयासाठी प्रयत्न करणार असल्याचे शिवशरण पाटील म्हणाले.






### 'जनशक्तीचा पाठिंबा असणाऱ्या ॲड साठेंना विधानसभेत पाठवा'

**माढा, दि. १३ नोहेंबर-**
सोलापूर जिल्ह्यात एकमेव महिला माढा विधानसभा म तदारसंघाच्या राष्ट्रवादी काँग्रेस व माहितीच्या अधिकृत उमेदवार असून पंढरीच्या विठुरायाची रुक्मिणी मीनल साठे हे जनतेचे जनसेवक म्हणून या निवडणुकीत उभी आहे. या मतदारसंघातील जवळपास ९३ हजार महिलांना लाडक्या बहीण योजनेचा लाभ मिळालेला आहे. जनशक्तीचा पाठिंबा असणाऱ्या मिनल साठेंना विधानसभेत पाठवा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी केले. ॲड. मीनल साठे यांच्या प्रचारार्थ आज टेंभुर्णी येथे रूपाली चाकणकर यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी माढा तालुक्याचे माजी आमदार धनाजीराव साठे उपस्थित होते. यावेळी रूपाली चाकणकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मीनल ताई मला समाधान वाटते की, तुम्हाला आदरणीय अजितदादांनी संधी देऊन मातृशक्तीला नेतृत्व करण्याची संधी आपल्या उमेदवारीच्या माध्यमातून दिली. पुढे बोलताना त्या म्हणाल्या, विधानसभेतील विरोधी उमेदवार अभिजीत पाटील यांनी केलेल्या आरोपाचे खंडन करत त्यांनी सांगितले की या मतदारसंघात ही निवडणूक मी जनतेच्या न्यायासाठी हक्कासाठी लढते या निवडणुकीतून मी माघार घेण्यासाठी लढत नाही मी विरोधकांना सांगू इच्छितो की आपण पैसे देऊन उमेदवारी घेतलेली आहे. आणि मला माझ्या कार्याची दखल घेऊन उमेदवारी मिळालेले आहे. यामुळे आपण असल्या थापा मारू नये. मी मतदारांना आवाहन करू इच्छिते की अशा अनेक भूलथापा हे विरोधक करत आहेत. कारण यांच्या पायाखालची वाळू घसरलेले आहे. तरी या आपण यावर कुणीही विश्वास ठेवू नये. आपला विजय निश्चित असून सर्वांनी येणाऱ्या दिवसात रात्रीचा दिवस करून मतदान करावे असे आवाहन करण्यात आले. सभेचे प्रास्ताविक दादासाहेब साठे यांनी करताना सांगितले की, माढा तालुक्याच्या राजकारणात सोलापूर जिल्ह्याचे सहकार महर्षी गणपतराव साठे यांच्या प्रेरणेने आम्ही माढा तालुक्यामध्ये आजपर्यंत विकासाचे राजकारण केले आहे. या सभेसाठी दादासाहेब साठे, दिपाली पांढरे, वर्षा शिंदे, सायारा शेख, प्रियंका परांडे, महेश साठे, योगेश पाटील, शिवसेनेचे पंढरपूर तालुका अध्यक्ष महादेव भोसले, भारत आठवले, मारुतीराया वाघमारे, बिभीषण कांबळे,पोपट लोंढे, माया माने, संगीता जोगधनकर, सुनंदा भगत, राहुल केदार, दत्ता जाधव, नंदकुमार मोरे, श्रीशैल मोरे, विष्णू बिचकुले, मदन मुंगळे, जयसिंग ढवळे, माढा नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष कल्पना जगदाळे उपस्थित होते.

### कार्तिकी पौर्णिमेनिमित्त संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराजांची यात्रा

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**



बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र कपिलधार हे एक निसर्गरम्य स्थळ, कपिलमुनींच्या पदस्पर्शाने पावन झालेली पुण्यभूमी वीरशैवांचे शक्तीपीठ व श्रद्धास्थान असून येथे श्री शिवयोगी संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांची संजीवन समाधी आहे. कार्तिक पौर्णिमा समाधी दर्शन, दीपोत्सव सोहळा साजरा केला जातो. दरवर्षी मन्मथ माऊलींच्या दर्शनासाठी मराठवाडयासह महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र तसेच परराज्यातून लाखो शिवभक्तांची गर्दी होते. यात सोलापूरातील मन्मथ स्वामी देवस्थान, भाविक भक्त जन उपस्थित राहतात. तसेच सर्व भजन, कीर्तन मंडळीचे दिंडीचे आगमन होऊन शासकीय महापूजा, शिवा संघटनेचा मेळावा असा कार्यक्रम पार पाडला जातो.

# जातो माघारी पंढरीनाथा । तुझे दर्शन झाले आता ।।

## जड अंत:करणाने परतीच्या प्रवासासाठी वारकरी रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ नोव्हेंबर -**
कार्तिकी यात्रे निमित्त विठ्ठलाच्या दर्शनासाठी येथे आलेल्या लाखो वैष्णवांनी एकादशीचा अनुपम्य सोहळा डोळेभरुन अनुभवत परंपरंने घराण्यातून चालत आलेली वारी पोहच केली. विठुरायाच्या भेटीला पुढच्या वर्षी येण्याची मनोमन इच्छा व्यक्त करुन मोठ्या जड अंतकरणाने वारकरी पंढरीचा बुधवारी (ता.१३) व्दादशी दिवशी निरोप घेत होते. येथील बस तसेच रेल्वे स्थानकावर पहाटे पासूनच भाविकांची परतीच्या प्रवासासाठी मोठी गर्दी झालेली होती.

बोला पुंडलिक वरदे हरि विठ्ठल । ज्ञानदेव तुकाराम।। असा जयघोष करीत येथील विठ्ठल मंदिराच्या पश्चिमव्दारात तसेच महाव्दारात उभे राहून दोन्ही हातने स्वत:चे कान पकडून वारकरी विठ्ठल विठ्ठल म्हणून उड्या मारीत सावळ्या परब्रम्हाकडे क्षमा याचना करुन काही चुकले असेल तर माफी कर, पुढच्या वर्षी तुझ्या भेटीला येण्यासाठी बळ दे असे म्हणत त्याचा निरोप घेत होते. या वेळी एकीकडे वारी पोहचल्याचा आनंद तर दुसरीकडे निरोप घेताना झालेली त्यांची अवस्था त्यांच्या डोळ्या खालील पापण्याच्या ओलाव्या वरुन स्पष्ट जाणवत होती. दरम्यान पहाटे पासूनच भाविकांची परतीच्या प्रवासासाठी लगबग दिसत होती. येथील चंद्रभागा वाळवंटा मध्ये भाविकांची मध्यरात्री पासूनच स्नानासाठी गर्दी झालेली होती. चंद्रभागेचे पवित्र स्नान आणि नगरप्रदक्षिणा करुन व्दादशीच्या न्हाहरीची वारकऱ्यांची लगबग सुरु होती. अनेक मठ, धर्मशाळांमधून वारकऱ्यांच्या जेवणाच्या पंक्ती बसत असल्याचे दृश्य पहावयास मिळत होते. वारकरी व्दादशी सोडून सामानाची बांधाबांध करुन मुक्कामाच्या ठिकाणाहून बाहेर पडत थेट विठ्ठल मंदिराचे कळस दर्शन घेवुन रेल्वे,एस.टी तसेच खासगी वाहनांमधून बसुन जातो माघारी पंढरीनाथा । तुझे दर्शन झाले आता ।। या भावनेने मोठ्या जड अंत:करणाने परतीच्या प्रवासासाठी रवाना होत होते.



**पंढरपूर : कार्तिकी यात्रा पोहच करुन वारकरी भाविकांनी येथील रेल्वे स्टेशनवर बुधवारी पहाटे पासून आपल्या गावाकडे परत जाण्यासाठी मोठी गर्दी केलेली होती.**

# पंढरपूर विधानसभा मतदारसंघात १४ नोव्हेंबरपासून गृह मतदान

**पंढरपूर, दि.१३ नोव्हेंबर -**
पंढरपूर विधानसभा मतदारसंघात दि. १४ नोव्हेंबरपासून गृह मतदानाला (होम वोटिंग) सुरुवात होणार आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पंच्याऐंशी (८५) वर्ष वयापेक्षा जास्त वय असलेल्या तसेच दिव्यांग मतदाराला त्यांची इच्छा असल्यास गृह मतदान करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली असून दिनांक १४,१५, व १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत गृह मतदान घेण्यात येणार असल्याची माहिती पंढरपूर विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

पंढरपूर विधानसभा मतदार संघातील अशा मतदारांना टपाली मतदानाचे नमुना १२ ड अर्ज उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यापैकी प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेण्यात आला असून , पंढरपूर विधानसभा मतदार संघात ८५ वर्ष वयापेक्षा जास्त वय असलेल्या तसेच दिव्यांग मतदारांची संख्या ४७२ इतकी आहे. या म तदानाकरीता मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी यांची २० पथके नेमण्यात आली आहेत. प्रत्यक्ष मतदानाच्या ठिकाणी उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहू शकतात. या सर्व मतदान प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रीकरण केले जाणार आहे. गृह मतदानास संबधित मतदारांनी सहकार्य करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी इथापे यांनी केले आहे.

# अभिजीत पाटलांचा होम टू होम अन् शेताच्या बांधावर जाऊन प्रचार

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १३ नोव्हेंबर-**
माढा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत पाटील यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतली असून गावभेट दौरे, राज्यस्तरीय नेत्यांच्या जाहीर सभा आणि होम टू होम प्रचाराबरोरच त्यांचे कार्यकर्ते आता थेट शेताच्या बांधापर्यंत जावून शेतकऱ्यांना विकासाचे व्हिजन सांगत आहेत. त्यामुळे 'आपला माणूस' म्हणून मतदारांची त्यांना पसंती मिळत आहे.



अभिजीत पाटील यांनी विठ्ठल सहकारी साखर कारखाना लोकशाही मार्गाने ताब्यात घेतला त्याच वेळी विधानसभा लढविण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मागील तीन महिन्यात माढा मतदारसंघात खेळ पैठणीचा, होम मिनिस्टर, माढा कुस्ती केसरी, दहीहंडी, रक्तदान शिबिर, बैलगाडा शर्यत, आदी कार्यक्रम घेऊन आपले नाव घराघरात पोहचवले व कसल्याही परिस्थितीत माढ्याच्या रिंगणात उतरायचेच असे ठरवले. त्यातूनच जनमताचा कौल असणाऱ्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी मिळविण्यात यश मिळवत अर्धी लढाई जिंकली. साहजिकच प्रतिस्पर्धी शिंदे गटाचे कट्टर विरोधक मोहिते-पाटील यांनी आपली पूर्ण ताकद पाटील यांच्या पाठीशी उभी करत प्रचारात उडी घेतली आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयदादा यांच्यासह खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील प्रचारात दररोज सक्रिय आहेत. याशिवाय राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष्याचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या अनुक्रमे उपळाई (ता.माढा) व करकंब येथे जाहीर सभा झाल्या. कार्यकर्त्यांनीही श्री.पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला. याशिवाय दररोजच्या गाव भेटी दरम्यानही अनेक कार्यकर्ते पाठिंबा देत आहेत. माढा तालुक्यातून माजी जिल्हा परिषद सदस्य भारत शिंदे, संजय कोकाटे, संजय पाटील-घाणेकर, नितीन कापसे यांच्यासह टेंभुर्णी येथील कुटे आणि बोबडे परिवाराने पाटील यांच्या पाठीशी उभी केलेली ताकद निर्णायक ठरत आहे. दुसरीकडे रणजितसिंह शिंदे यांना शिवसेनेच्या शिवाजी सावंत आणि पंढरपूर तालुक्यातुन परिचारक गटाचा पाठिंबा जाहीर झाला असला तरी हे दोन्ही गट महायुतीचे घटक असल्याने शिंदे यांची उमेदवारी म्हणजे महायुतीचीच उमेदवारी असा समज पसरू लागला आहे. त्याचाही त्यांना फटका बसण्याची शक्यता आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे अभिजित पाटील यांच्यासाठी रोहित पवार आणि शरद पवार यांच्या जाहीर सभा होणार आहेत. अशा वरिष्ठ नेत्यांच्या प्रचार सभांचा पाटील यांना फायदा होत असताना श्री.शिंदे अपक्ष निवडणूक लढवत असल्याने त्यांना स्वतःलाच सर्व प्रचार यंत्रणा संभाळावी लागत आहे.

# लोकसेवक म्हणून सेवा करण्याची संधी द्या : सावंत

## कोर्टी येथे प्रचार सभा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ नोव्हेंबर-**
येणाऱ्या काळात मतदारसंघांमध्ये चांगले हॉस्पिटल्स, शाळा कॉलेजेस,बेरोजगारांना रोजगार मिळण्यासाठी कंपन्या रस्ते,शेतकऱ्यांसाठी पाणी, शहरांमध्ये असलेल्या गटारांची असुविधा या सर्व समस्यांवरती काम करण्याची एक संधी मला द्या त्या संधीचे सोने करून मी दाखवीन. त्यामुळे येणाऱ्या २० तारखेला मला भरघोस मतांनी निवडून द्या व तुमच्या लोकसेवक म्हणून सेवा करण्याची संधी द्या, असे आवाहन पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघाचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत मतदारांना केले.

अनिल सावंत यांची कोर्टी या गावांमध्ये प्रचार सभा संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. गतवेळी दोन वर्ष पंढरपूर, मंगळवेढा या मतदारसंघांमध्ये गाव बैठक घेऊन प्रचार केला आणि निवडणुकी पुरती आश्वासने दिल्याने त्यांच्यावरती विश्वास ठेवून त्यांना मतदान केले. पण त्यांनी काय केले. जेवढा निधी आणला त्याच पद्धतीचा विकास झालाय का नाही हे माझ्यापेक्षा आपल्या लोकांना अधिक तरुण पिढीला तुमच्यासारख्या समोर बसलेल्या मातांना भगिनींना चांगलं माहिती असल्याचे प्रतिपादन उमेदवार अनिल सावंत यांनी केले.



सावंत म्हणाले की, ज्याप्रम णे त्यांनी पक्षातील लोकांना, कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना जसे वऱ्यावरती सोडले तसे एवढेच सांगतो की, विशेष तुम्हाला वाऱ्यावरती कधीही सोडणार नाही. आपले सहकारी मत मागतायत फक्त आणि फक्त वडिलांचे कृपा आशीर्वादामुळे जनता तुम्हाला फिरकू देत आहे जो व्यक्ती दोन दोन तीन वर्ष दोन दोन महिने तीन-चार महिन्यात या मतदार संघामध्ये ज्यांचे काम नाही अशा व्यक्ती वरती कोण विश्वास ठेवणार पण आपण एक सहकारी पक्षाचे लोक आहोत येणाऱ्या काळामध्ये त्याची मदत आपल्यालाच होणार आहे त्याच्यामुळे तुम्ही काळजी करायची काय काम नाही. या सर्वांचा विचार करता नेते मंडळींनी साहेबांकडे माझी उमेदवारी मागितली असता त्यांनी माझ्यावरती विश्वास ठेवून मला उमेदवारी दिली असून शेवटी या जनतेचे व भागातील लोकांचे प्रेम बघता हा विजय फक्त आणि फक्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आदरणीय शरद पवारांचा आहे. या भागात गेली पंधरा वर्षे झालं साखर कारखाना चालवतो आपले प्रश्न सोडवण्यासाठी माझे घर पंढरपूर तसेच मंगळवेढा तालुक्यात साखर कारखाना असल्याने सर्वांना कधीही मी उपलब्ध होणार आहे.

# मंगळवेढयाचे बबनराव अवताडे भगीरथ भालकेंच्या सोबत



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१३ नोव्हेंबर -**
मंगळवेढा तालुक्यातील बडे राजकीय प्रस्थ आणि आ. समाधान आवताडे यांचे चुलते बबनराव अवताडे यांनी काँग्रेसचे उमेदवार भगीरथ भालके यांना पाठिंबा जाहीर केला आहे. या पाठिंब्यामुळे मंगळवेढा तालुक्यामध्ये भगीरथ भालके यांच्या विजयाची समीकरणे आणखी मजबूत होत असल्याचे दिसून येत आहे. तर भाजपाचे समाधान आवताडे हे डेंजर झोनमध्ये गेल्याची मतदार संघात चर्चा सुरू झाली आहे.

मंगळवेढा तालुक्यात बबनराव आवताडे यांचे मोठे राजकीय प्रस्थ आहे. त्यांच्या गटाची बुधवारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सिद्धेशर आवताडे यांच्या नेतृत्वाखाली बैठक संपन्न झाली. यावेळी सिद्धेश्वर आवताडे यांनी काँग्रेस उमेदवार भगीरथ भालके यांना पाठिंबा दिल्याचे जाहीर केले.

यावेळी जेष्ठ नेते बबनराव अवताडे, काँग्रेस उमेदवार भगीरथ भालके यांच्यासह व्यंकट भालके आणि आवताडे समर्थक जमीर सुतार, चंद्रकांत काकडे, धनंजय पाटील, दिलीप सावंत, संजय पवार, दया सोनगे, विजय जाधव, मनोज खांडेकर, प्रकाश जुंदळे, सतोष सोनगे, सचिन नकाते, शंभू नागणे, काका डोंगरे, दौलत माने, गुलाब थोरबोले, यांच्यासह अवताडे समर्थक उपस्थित होते.

यावेळी बोलताना भगीरथ भालके यांनी, चुकीचा माणूस बदलण्यासाठी सुरू असलेल्या लढाईला बबनराव अवताडे व त्यांच्या समर्थकांनी दिलेले पाठबळ निश्चित महत्त्वाचे आहे. भविष्यात नगरपालिका व इतर सर्व निवडणुका त्यांना सोबत घेऊन लढल्या जातील असे सांगितले.

लोकसभा निवडणुकीमध्ये बबनराव अवताडे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांना पाठिंबा दिला होता, त्यामुळे तालुक्यामध्ये या मतदारसंघात ४५ हजार ५२३ या म ताधिक्यात अवताडे यांची मते देखील निर्णायक ठरली होते. अशा परिस्थितीत त्यांनी भालके यांना दिलेला पाठिंबा म हत्वपूर्ण ठरला आहे. लोकसभा निवडणुकीम ध्ये बबनराव अवताडे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांना पाठिंबा दिला होता, त्यामुळे तालुक्यामध्ये या मतदारसंघात ४५ हजार ५२३ या मताधिक्यात अवताडे यांची मते देखील निर्णायक ठरली होते. अशा परिस्थितीत त्यांनी भालके यांना दिलेला पाठिंबा महत्वपूर्ण ठरला आहे.

> बबनराव आवताडे यांच्याकडे खरेदी विक्री संघ, कृषी उद्योग संघ, कृषी उत्पन्न बाजार समिती तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सोसायटी, दामाजी नगर या मोठ्या ग्रामपंचायतीसह लगतच्या काही ग्रामपंचायतीवर त्यांचे वर्चस्व आहे. पोटनिवडणुकीत भगीरथ भालके यांचा निसटत्या मतांनी पराभव झाला. त्यामध्ये सिद्धेश्वर अवताडे यांना पडलेली मते देखील त्या दृष्टीने निर्णायक ठरली होती.



# संतोष पवारांनी घेतली मतदारसंघात प्रचाराची आघाडी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १३ नोव्हेंबर-**
सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघातून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संतोष सेवू पवार यांना शहरी आणि ग्रामीण भागात पाठिंबा मिळत आहे. संतोष पवार हे सर्व समाजाला सोबत घेऊन जाणारे एक युवा नेतृत्व असून, मतदारसंघात त्यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून येते. दक्षिणमध्ये सुभाष देशमुख, अमर पाटील, धर्मराज काडादी , संतोष पवार व महादेव कोगनूरे यांच्यात लढत होत आहे. ग्रामीण भागात संतोष पवार यांचे ३ वर्षातील सामाजिक कार्य पाहता त्यांना जास्तीत जास्त लोकांचा पाठिंबा मिळत आहे. शहरी भागातही त्यांची असलेली दमदार छबी, युवा, निर्व्यसनी आणि वक्तृत्वात, नेतृत्वात कार्यकुशल असलेला नवोन्मुख चेहरा म्हणून मतदारांमध्ये त्यांची ओळख असून विजयाबद्दल आत्मविश्वास वाढत आहे. संतोष पवार यांच्या प्रामाणिक आणि संघर्षशील प्रवृत्तीमुळे विविध समाजघटक त्यांच्याकडे एकत्र येत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात विकासाला दिशा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर मतदारसंघात संतोष पवार यांच्या विजयाबाबत चर्चा सुरू आहे.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारासाठी युवकांची प्रचारफेरी

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१३ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील भाजपचे उमदवार आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारासाठी युवक प्रचार फेरी काढून प्रचार करीत आहेत. या प्रचार फेरीत मोठ्या संख्येने युवक सहभागी होत आहेत.





## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### पंढरपूरला प्रबोधिनी एकादशी निमित्ताने पालखीची नगर प्रदिक्षणा

**तेर, दि.१३ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री संत गोरोबा काका यांच्या पालखीची पंढरपूर येथे प्रबोधिनी एकादशी निमित्ताने नगर प्रदिक्षणा १२ नोव्हेंबरला झाली. धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री संत गोरोबा काका यांची पालखी कार्तिक सोहळ्यानिमित्त तेरहून पंढरपूरला गेलेली आहे. १२ नोव्हेंबरला प्रबोधिनी एकादशी निमित्ताने पंढरपूरला पालखीची नगर प्रदक्षणा झाली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.



### कळंबमध्ये पोलिसांचे पथसंचलन

**कळंब, दि.१३ नोव्हेंबर -**
उस्मानाबाद विधानसभा निवडणूक च्या पार्श्वभूमीवर आज मंगळवार (ता.१२) शहरातील मुख्य रस्त्यावरून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथसंचलन करण्यात आले. येत्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधान सभा निवडणुकीच्या अनुषंगाने शहरासह अंदोरा, कान्हेरवाडी, आणि मस्सा (खं) या ग्रामीण भागात शांतता राहण्यासाठी पोलिसांचे पथसंचलन काढण्यात आले. कळंब शहरातील अहिल्याबाई होळकर चौकापासून सुरू करण्यात आले. हे पथसंचलन शहराच्या मुख्य रस्त्यावरून सावरकर चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक असे करण्यात आले. यांनतर पथसंचलन ची सांगता झाली. या पथसंचलन मध्ये अधिकारी पोलिस निरीक्षक रवी सानप, सहाय्यक पोलीस अधिकारी प्रभा पुंडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पंढरीनाथ मगर, गुप्तहेर विभागाचे श्रीराम मायंदे यांच्यासह केरळ राज्यातील पोलीस उपनिरीक्षक संतोष राज यांच्यासह केरळ राज्यातील चार सेक्शनसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



### जयप्रकाश विद्यालयात प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांचा सत्कार

**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रूईभर येथे प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांचा बीड येथे बालाघाट हिल हाफ मॅरेथॉन स्पर्धेत चौथा क्रमांक आल्याबद्दल हार, शाल व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दि.१० नोव्हेंबर रोजी योगा प्रतिष्ठान, बीड आयोजित बालाघाट हिल हाफ मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत जवळपास पाच ते सहा हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. अशा प्रकारचे यश संपादन करण्यासाठी परिश्रम महत्त्वाचे असतात. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा तिन्ही ऋतूत निरंतर सराव सुरू असतो. त्याचेच फलित म्हणून अशा प्रकारचे यश संपादन करू शकतो. याप्रसंगी इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक डोंगरे के.ए., विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रशांत कोळगे यांनी मानले.

## गुटखा तस्करी प्रकरणात धक्कादायक कारनामा उघड

### मुरुम पोलिसांची बनावट कारवाई... पोलिस अधिक्षकांडून शाब्बासकी मिळवण्याचा खटाटोप उघड...





**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१३ नोव्हेंबर -**
उमरगा तालुक्यातील मुरुम पोलिसांनी गुटखा तस्करी प्रकरणात बनावट कारवाई केल्याचे उघड झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत विशेष म्हणजे पोलिस अधिक्षकाकडून शाब्बासकी मिळवण्याच्या नादात येथील पोलिस अधिकाऱ्याने अशी करारनामा अत्यंत धाडसाने केल्याचे पोलिस वर्तुळातच चर्चा आहे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी लोकांतून होत आहे

याबाबत अधिक माहिती अशी की मुरुम-आष्टाकासार रोडवरील आचार्य तांड्याजवळ एका सिफ्ट कारचा अपघात झाला होता, ज्यामध्ये तब्बल ७ लाख रुपयांचा 'हिरा पान मसाला' नावाचा गुटखा सापडला होता. मात्र, अपघात स्थळी जप्तीची कारवाई न करता, पोलिसांनी हा गुटखा कर्नाटक सीमेवरील कोथळी चेक पोस्टवर पकडल्याचे दाखवून रेकॉर्ड बनवली आहेत विशेष म्हणजे ठराविक पत्रकारांना ही खोटी माहिती देऊन प्रसिद्धी देखील मिळवले आहे. मात्र या बातमीची सत्यता वेगळीच उघड झाली असून एकच खळबळ माजली आहे.

एमएच १ बीटी ६१४४ क्रमांकाची ही कार अपघातग्रस्त झाल्यानंतर त्यामधील गुटखा तातडीने जप्त करणे अपेक्षित होते. पण विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोथळी येथील चेक पोस्टचा वापर करून, गुटखा तिथे पकडल्याचे खोटे दाखवण्यात आले. सपोनि. संदीप दहिफळे यांनी ज्या ज्या पोलिस कर्मचाऱ्याकरवी असे प्रकार केले आहेत अश्यांची नावे चर्चेत आहेत या प्रकरणात बनावट कारवाई केल्याने याबद्दल उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी असून निलंबित करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. दरम्यान धाराशिव आणि बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर कर्नाटक राज्यातून गुटखा तस्करी होत याच मार्गाने होत असते. या तस्करीच्या नेटवर्कसाठी मुरुम पोलिसांना प्रति गाडी २२ हजार रुपयांचा हप्ता मिळत असल्याची चर्चा देखील आहे. अपघात झालेल्या या गाडीमुळे गुटखा उघडकीस आला. त्यामुळे पोलिसांना नाईलाजास्तव कारवाई करावी लागली.

या बनावट कारवाईमुळे मुरुम पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. दरम्यान मुरूम पोलिस ठाणे हद्दीत गुटखा व मटका व्यवसाय जोरात सुरू असल्याचे वृत्त तरुण भारताने यापूर्वीच सुप्रसिध्द केलेली आहे. आता पोलिस अधीक्षक याबाबत काय कारवाई हे पाहणे आहे.

## आ. पाटील यांच्या प्रचारार्थ मल्हार पाटलांच्या कॉर्नर बैठका



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**
महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारासाठी मल्हार पाटील यांनी धाराशिव तालुक्यातील आरणी, टाकळी (ढोकी), भंडारवाडी, दाऊतपूर येथे कॉर्नर बैठका घेतल्या.

तसेच महायुतीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या भेटी घेऊन निवडणुकीसंदर्भात चर्चा केली.

गेल्या पाच वर्षात आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी गावांच्या विकासासाठी भरपूर निधी उपलब्ध करून दिला आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून त्यांनी जिल्ह्यातील महत्वाचे विषय मार्गी लावले आहेत.

तसेच केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री रोजगार हमी कार्यक्रम व मुख्यमंत्री रोजगार हमी कार्यक्रम या योजनेच्या माध्यमातून अनेक तरुणांना व्यवसाय उभारणीसाठी मदत केली असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी आमदार पाटील यांच्या विकासाच्या मुद्यावर प्रभावित होऊन भंडारवाडी येथील काँग्रेसचे ऋषी माळी यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

## जळकोट येथे घरोघरी महायुतीचा प्रचार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१३ नोव्हेंबर -**
तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी, शिवसेना, मित्रपक्ष व भाजपा महायुतीचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ जळकोट (ता. तुळजापूर) येथे गावात घरोघरी जाऊन प्रचार करण्यात आला.

विधानसभेच्या निवडणुकीला काही दिवसांचा कालावधी उरला आहे. सर्वच राजकीय पक्षाकडून प्रचाराला वेग आला आहे. तुळजापूर मतदारसंघात महाविकास आघाडी व महायुतीमध्ये सरळ लढत होत आहे. दिवाळी संपली असली तरीही आश्वासनांचे फराळ वाटप करण्यात येत असून महायुतीकडून जळकोट गावात घरोघरी जाऊन प्रचार करण्यात येत आहे. यात वचननामाचे पत्रक वाटण्यात येत आहेत.

## मतदारसंघाचा विकास हाच ध्यास घेऊन पुढे जाणार : ज्ञानराज चौगुले

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ नोव्हेंबर -**
गेले १५ वर्षे आमदार म्हणून काम करताना मी मतदार संघाचा विकास करण्यावरच भर दिला. मतदार संघ शांतता कसा राहील हे पाहिले. महायुती सरकारच्या मुलींना मोफत उच्च शिक्षण, मागेल त्याला सौरपंप, शेतीपंपाची वीजबिल माफी आणि शेतकऱ्यांना एक रुपयात विमा, माझी लाडकी बहीण योजना आणि शेतकरी सन्मान योजना हे महायुती सरकारचे काम शेतकरी हिताचे आहे.

शिवसेना व महायुतीच्या अधिकृत उमेदवार ज्ञानराज चौगुले यांच्या प्रचारानिमित्त कंटेकुर (ता. उमरगा) येथे आयोजित सभेत बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार रवींद्र गायकवाड, माजी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती जितेंद्र शिंदे, जिल्हा परिषद समाज कल्याण माजी सभापती हरीश डावरे, माजी सभापती दिलीपसिंह गौतम, शेखर मुद्कना, सरपंच विजयाबाई जमादार, उपसरपंच कमलाबाई धुमाळ, उपजिल्हाप्रमुख भगत माळी, माजी सरपंच विलास व्हटकर तालुकाप्रमुख शेखर पाटील, विभाग प्रमुख जागृत शिंदे, पांडुरंग धुमाळ, महादेवी कुंभार आदी उपस्थित होते. महाराष्ट्राची प्रगती ही अशाच वेगवान पद्धतीने होत रहावी यासाठी महायुती सरकार असणं गरजेचं आहे. त्यामुळे





आगामी विधानसभा निवडणुकीत शिवसेना महायुतीचा अधिकृत उमेदवार ज्ञानराज चौगुले यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे ही विनंती केली. याप्रसंगी माजी सभापती यांनी लातूर पॅटर्न संदर्भात जोरदार प्रहार केला. उपेक्षितांचे जीवन जगणाऱ्या लोकांनीच उमरगा विधानसभा लढवावी. माजी सभापती जितेंद्र शिंदे यांनी विरोधी उमेदवार जोरदार टीका केली. काल नोकरीचा राजीनामा देऊन आज विधानसभा निवडणुकीत उतरलेल्या उमेदवारांचे राजकीय काम शून्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचा अनुभव नसलेल्या व्यक्तींनी जनतेचा प्रश्न कसा कळणार. सर्वाधिक निधी आल्यामुळे आमदार ज्ञानराज चौगुले या काम करणाऱ्या माणसाला निवडून द्या, असे आवाहन केले.

यावेळी शिवाजी जमादार, पांडुरंग धुमाळ, धनराज स्वामी, वैभव बिराजदार, रवींद्र विभुते, संतोष जमादार, महादेव गायकवाड, बालाजी दासे, बालाजी ठेके, सचिन पाटील, रावण मुडगे, गोविंद धुमाळ, शिवा कांबळे, अनंतराव बिराजदार, नामदेव गायकवाड आदींसह महायुतीचे कार्यकर्ते व पदाधिकारी आणि गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मतदारसंघात सखीताई सावंत ठरताहेत शिवसेनेच्या 'स्टार प्रचारक'

### आजोबाच्या प्रचारार्थ नात सखीताई सावंत यांचा गावागावांत झंजावात... लाडक्या बहिणींचा मिळतोय प्रचंड प्रतिसाद...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ नोव्हेंबर -**
भूम-परांडा-वाशी विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी मतदारसंघात प्रचारात आघाडी घेतली असून, झालेली विकासकामे व विकासाचा त्यांनी मांडलेला रोडमॅप ही त्यांच्यासाठी जमेची बाजू ठरली आहे. त्यामुळेच जनमत त्यांच्या बाजूने निर्माण झालेले आहे. प्रा.डॉ. सावंत यांनी गावभेट दौरे, सभा, घोंगडी बैठका यातून जनतेशी संपर्क साधून आपली भूमिका समजावून सांगण्यात यश मिळवलेले असतानाच जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत आणि कार्यसिद्धी प्रतिष्ठाणचे संस्थापक, युवा नेते गिरीराज सावंत यांनीदेखील प्रचाराची धुरा आपल्या खंद्यावर घेऊन प्रचारात आघाडी घेतली आहे.



त्यातच आजोबा तानाजीराव सावंत यांच्या प्रचारासाठी त्यांच्या नात सखीताई धनंजय सावंत यांनीही प्रचारात उतरत गावभेट दौरे, सभांचा धडाका लावला आहे.

सद्या तरी त्या या निवडणुकीतील शिवसेनेच्या स्टार प्रचारक ठरल्या असून, त्यांच्या जनसंवाद दौऱ्याला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. मतदारसंघात झालेली विकासकामे, आणि विकासाचा अनुशेष कायमचा संपविण्यासाठी पुन्हा एकदा प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांना विजयी करण्याचे आवाहन त्या मतदारांना करत आहे. विशेष करून, महिलावर्गात सखीताईंची चांगलीच भुरळ पडल्याचे दिसून येत असून, त्यांच्या प्रचारसभा व गावभेट दौऱ्यांना महिलांसह युवती मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. जसजशी मतदानाची तारीख जवळ येऊ लागली आहे, तसतसे मतदारसंघातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. सगळीकडे प्रचाराचा धुराळा उडालेला असताना, प्रचारात प्रा.डॉ. सावंत यांनी आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या विरोधात तीन प्रमुख राजकीय पक्ष उभे ठाकले असतानाही झालेली विकासकामे, भविष्यातील विकासकामांचा मांडलेला रोडमॅप, आणि मतदारसंघाला पुन्हा मिळणारे मंत्रीपद या मुद्द्यांवर प्रा.डॉ. सावंत यांच्या बाजूने जनमत वळलेले आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, युवा नेते गिरीराज सावंत यांच्या गावभेट दौरे, घोंगडी बैठकांना जोरदार प्रतिसाद लाभत असतानाच, आजोबाच्या प्रचारासाठी नात सखीताई सावंत यांनीदेखील प्रचारात उतरत आघाडी घेतली आहे. सखीताईंच्या गावागावांत सुरू असलेल्या जनसंवाद दौर्यादरम्यान महिलावर्ग, युवती या त्यांच्याभोवती गर्दी करत असून, त्यांची भूमिका समजून घेत आहेत.

लाडक्या बहिणीसाठी महायुती सरकार देत असलेली आर्थिक मदत, मतदारसंघातील सुटलेला पाण्याचा प्रश्न, महिलांच्या डोक्यावरील हंडे उतरविण्यात आलेले यश, मतदारसंघाचा झालेला विकास, आणि पुढील काळात करायची विकासकामे याबाबत त्या मतदारांत जनजागृती करून, आजोबा तानाजीराव सावंत यांच्यासाठी मते मागत आहेत. त्यांच्या या जनसंपर्क दौरे व सभांना लाडक्या बहिणींसह भावांचादेखील उदंड प्रतिसाद लाभत असल्याचे दिसून येत आहे.

## व्यवस्थापन समितीच्या सदस्यपदी सचिन पाटील

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१३ नोव्हेंबर -**
विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ लातूर यांच्या कार्यकारणी समितीवर अशासकीय सदस्याचे नामनिर्देशन करण्यात आले. हे नामनिर्देशन लातूर विभागीय मंडळाच्या कार्यकारी समितीच्या रिक्त पदावर मंत्री, शालेय शिक्षण यांनी केलेल्या शिफारशीने नामनिर्देशनाने अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली.

यामध्ये व्यवस्थापन समिती सदस्यपदी (कनिष्ठ महाविद्यालय) येरमाळ्याचे सचिन दत्तात्रय पाटील संस्थापक विद्यानिकेतन माध्यमिक व जुनियर कॉलेज यांची व्यवस्थापन समिती कनिष्ठ महाविद्यालय सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. शैक्षणिक क्षेत्रात सचिन पाटील यांचे योगदान चांगले आहे.

## महायुती सरकारने महापुरुषांच्या प्रतिमेआडून भ्रष्टाचार केला : आ. कैलास पाटील



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१३ नोव्हेंबर -**
आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धाराशिव-कळंब मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार कैलास पाटील यांनी कळंब तालुक्यातील अनेक गावांत सभा घेतल्या. यावेळी त्यांनी महायुती सरकारवर भ्रष्टाचार, विकासकामांतील स्थगिती, शेतकऱ्यांवरील अन्याय आणि केंद्राच्या धोरणांवर कठोर टीका केली.

आ. पाटील यांनी महायुती सरकारवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या आडून भ्रष्टाचार केल्याचे गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, सात महिन्यात कोकणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला, याचे कारण भ्रष्टाचार आहे.

मांजरा नदीवरील बॅरेजेस काम, येडशी-कळंब रोड यासारख्या महत्वाच्या विकासकामांना स्थगिती देण्यात आली. आम्ही महायुतीसोबत सामील न झाल्याने या कामांना स्थगिती देण्यात आली आहे. पाटील यांनी शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना फक्त नावापुरत्या असल्याचे सांगत, पिक विमा योजनेवर टीका केली.

ते म्हणाले की, पिक विमा योजना ही शेतकऱ्यांच्या हिताची नसून, ती केवळ कंपन्यांच्या नफ्यासाठी राबवली जात आहे. पंतप्रधानांनी ही योजना स्वत:च्या राज्यात का लागू केली नाही, याचा विचार शेतकऱ्यांनी केला पाहिजे.

यावेळी आ. पाटील यांनी महाविकास आघाडी सरकारने केलेल्या कर्जमाफीच्या वचनाची आठवण करून दिली. त्यांनी दावा केला की, महाविकास आघाडीच्या काळात कोणत्याही अटीशिवाय शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली होती. सत्ताधाऱ्यांनी दहा वर्षांत कर्जमाफी केली नाही, आता निवडणुकीपूर्वी कर्जमाफीच्या घोषणा करून शेतकऱ्यांना फसवण्याचा प्रयत्न करत आहेत.

पाटील यांनी आपल्या कार्यकर्त्यांना आणि मतदारांना धोका न देण्याचे वचन देताना सांगितले की, मोदी-शहांच्या राजकीय प्रयोगानंतर पक्ष फोडला, चिन्ह चोरले तरी मी आपल्या मतदारांचा विश्वास न तोडता एकनिष्ठ राहिलो. माझा वारसा जपण्यासाठी मी कधीच गद्दारी करणार नाही.

आगामी निवडणुकीत मतदारांनी विचारपूर्वक मतदान करावे, असे आवाहनही आमदार कैलास पाटील यांनी याप्रसंगी केले.

## लोहगावच्या सरपंच, सदस्यांसह अनेकांचा भाजपात प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील लोहगाव ग्रामपंचायतचे सरपंच, सदस्य व तंटामुक्त गाव समितीच्या पदाधिकारी, सदस्यांनी आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपात प्रवेश केला आहे. अनेक वर्षांपासून असलेले काँग्रेस नेतृत्व त्यांनी आता अमान्य केले आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आ. पाटील यांचे नेतृत्व मान्य करीत लोहगावचे सरपंच प्रवीण बसवराज पाटील, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष विनायक काटकर, ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत माने, मारुती बनसोडे, सचिन काटकर, माळाप्पा बनसोडे, अविनाश मेंडके, वीरभद्र मेंडके, सोपान मारेकर, लक्ष्मण शेंडगे, पोपट शेंडगे, नवनाथ मेंडके, शिवानंद कलशेट्टी, संतोष जगताप, अतुल पाटील, अशोक बिराजदार, अक्षय पाटील, तात्या काटकर, संजय स्वामी, नागनाथ कोकरे, शंकर बनसोडे, नितीन स्वामी, अभिषेक बनसोडे, सूर्यकांत फडताळे, सातलिंग पाटील, अर्जून माशाळकर यांचा समावेश आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या सर्वांची भूमिका महत्त्वाची ठरणार असून महायुतीच्या विजयासाठी सर्वांनी निर्धार केला आहे.

# महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांच्या पक्षबदलुपणामुळे उमेदवारी धोक्यात!

## शिंदे सेना प्रचारापासुन दुर निष्ठावंत कैलास पाटील यांना वाढता पाठिंबा....

**तभा वृत्तसेवा / अनिल गाडे**
**कळंब, दि.१३ नोव्हेंबर -**





धाराशिव-कळंब विधानसभा मतदारसंघात प्रचाराचा जोर वाढत चालला असतानाच भाजपाचे तालुकाध्यक्ष अजित पिंगळे यांना शिवसेनेच्या शिंदे गटाकडुन उमेदवारी दिल्याने शिवसेनेच्या शिंदे गटातील इच्छुक उमेदवारावर अन्याय झाल्याची 'सल' काही कार्यकर्त्यामधुन निघायला तयार नाही. शिंदे गटाचे कार्यकर्ते अजीत पिंगळे या उमेदवाराच्या प्रचारापासुन दुर असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

धाराशिव-कळंब विधानसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडुन विद्यमान आ. कैलास पाटील यांना उमेदवारी मिळाली आहे. मतदारसंघाचा एक निष्ठावंत पाईक म्हणुन केलास पाटील यांची जनसामान्य मतदारात इमेज आहे. तर दुसरीकडे महायुतीचे उमेदवार अजीत पिंगळे यांचा राजकीय प्रवास पाहता शिवसेना पुन्हा भाजपाचे तालुकाध्यक्ष ते पुन्हा ऐनवेळी शिंदे गटात प्रवेश घेत शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार असा पक्षबदलुपणा करत उमेदवारी मिळवलेले अजीत पिंगळे यांच्यावर आज पसबदलु पणाचा आरोप त्यांना तोंड काढु देत नाही. यामुळे त्यांची प्रचारात दमछाक होताना पहायला मिळतेय. शिवसेना शिंदे गटाकडुन आपली उमेदवारी पिंगळे यांच्यामुळेच कटली हे उपरे येवुन आम्हाला आदेश देणार का? अशी भावना शिंदे गटातील कार्यकर्त्यामध्ये निर्माण झाल्याने शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते पिंगळे यांच्या प्रचारापासुन दुर असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

### निष्ठावंत कैलास पाटील यांची विकास कामाच्या मुद्यावर प्रचारात आघाडी...

महाविकास आघाडीचे उमेदवार आ कैलास पाटील यांनी रस्त्याच्या कामाला विरोधी आमदार असल्याने कामाला दिलेली स्थगिती उच्च न्यायालयात जावुन उठवलेली स्थगिती तसेचे तेरणा व मांजरा नदिवरील कोल्हापुरी बंधाऱ्याचे रूपांत बैरेजेसमध्ये करण्यात येणार तसेच शेतकऱ्यांना पीक वीमा मिळावा यासाठी ऐन दिवाळीत केलेले उपोषण अशा विकास कामांना टच देत ते जनतेसमोर जात आहेत. त्यांना जनतेतुन एक निष्ठावंत आमदार म्हणुन पाहिले जाते. यामुळे जनतेतुन त्यांना वाढता पाठींबा मिळत आहे. त्यांच्या गावागातील प्रचार बैठका कॉर्नर सभा रॅली यांना खुप मोठा प्रतिसाद मिळत असल्याने महायुतीचे उमेदवार अजीत पिंगळे यांचे धाबे दणाणले आहेत. शिवसेना शिंदे गटातील रुसवे फुगवे काडण्यात त्यांचा वेळ जातोय. यामुळे सध्यातरी महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास पाटील यांनी विजयाकडे घोडदौड चालु केली असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

# केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या सभेची जय्यत तयारी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१३ नोव्हेंबर -**

तुळजापुर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारासाठी केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची नळदुर्ग येथे दि.१४ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता जाहीर सभा होणार आहे. या सभेची जय्यत तयारी सुरु असुन हेलीपॅड व सभास्थळाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

तुळजापुर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारासाठी दि.१४ नोव्हेंबर रोजी नळदुर्ग येथे मरीआई मैदानावर सकाळी दहा वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भव्य जाहीर सभा होणार आहे. या सभेची भाजपाकडुन जोरदार तयारी सुरु असुन ही सभा मोठी व्हावी यासाठी महायुतीचे सर्वच घटकपक्ष जोरदार तयारी करीत आहेत. सभेच्या ठिकाणी मरीआई मैदानावर भव्य व्यासपीठ व मंडप उभारण्यात येणार असुन त्याची तयारी जोरात सुरु आहे. ना. नितीन गडकरी हेलिकॉप्टरने सभेसाठी येणार आहेत त्यामुळे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रांगणात हेलिकॉप्टर उतरण्यासाठी हेलीपॅड तयार करण्यात आले आहे. ना. नितीन गडकरी उद्या काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



सभास्थळी भाजपचे सुशांत भुमकर, उदय जगदाळे, संजय बताले, नय्यर जहागिरदार, धीमाजी घुगे, श्रमिक पोतदार गणेश मोरडे, शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे अजित जुनैदी, रीपाईचे शहर अध्यक्ष मारुती खारवे यांनी सभास्थळी जाऊन कामाची पाहणी केली आहे.

या सभेला महायुतीच्या सर्व घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# आ. अभिमन्यू पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत 'रुपामाता'चे दिपावली स्नेहमिलन उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**

रूपामाता नॅचरल शुगरच्या प्रांगणात औसा विधानसभा व लातूर विधानसभा मतदारसंघातील रूपामाता मिल्क व रूपामाता नॅचरल शुगरच्या दूध व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उपस्थितीत दिपावली मिलन व स्नेहभोजन कार्यक्रम औसा विधानसभा मतदार संघाचे उमेदवार अभिमन्यू पवार व आयोजक रूपामाता उद्योग समूहाचे संस्थापक अँड. व्यंकटराव गुंड यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

यावेळी अभिमन्यू पवार यांनी औसा मतदारसंघात रुपामाता उद्योगसमूहाचा विस्तार असून औसा मतदारसंघातील ११० गावात दूध उत्पादक शेतकरी व ऊस उत्पादक मोठ्या प्रमाणात असून आमच्या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात शेतकऱ्यांचा ऊस 'रुपामाता' गाळप करत असुन त्या बद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. अँड. गुंड यांनी रूपामाताचा विस्तार हा धाराशिव जिल्ह्यासह बीड व लातूर जिल्ह्यात असून या भागातील शेतकऱ्यांचा ऊस गाळप करण्यास मी कटिबद्ध असल्याचे सांगून, अभिमन्यू पवार औसा विधानसभा व लातूर ग्रामीणचे उमेदवार रमेश अप्पा कराड यांना मतदारांनी पाठबळ देण्याचे आवाहन केले.

व्यासपीठावर जि,प. चे माजी उपाध्यक्ष सुधाकर गुंड (गुरुजी), सूर्यकांत पिसाळ, एकंबी तांडाचे उपसरपंच बाळासाहेब जाधव, हभप. बालाजी महाराज सूर्यवंशी, बेलकुंडचे सरपंच विष्णू महाराज कोळी, रूपामाता उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक अँड. अजित गुंड, सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. राणादादांच्या प्रचारार्थ अर्चनाताईंकडून नागरिकांशी संवाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**

तुळजापुर विधानसभा मतदार संघातील विकासाचा हा ओघ कायम ठेवण्यासाठी येत्या २० तारखेला महायुतीच्या उमेदवाराला आपल्या गावातुन मोठे मताधिक्य द्यावे असे आवाहन धाराशिव जि.प.च्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी चिकुंद्रा, मानेवाडी व तुळजापुर येथे बैठका घेऊन नागरीकांशी संवाद साधताना केले.

तुळजापुर विधानसभा मतदार संघात विधानसभा निवडणुकीचा प्रचार सध्या शिगेला पोहचला आहे. विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला आहे. त्यामुळे या मतदार संघात महायुती, महाविकास आघाडी, समाजवादी पक्ष, वंचित बहुजन आघाडी तसेच अपक्ष म्हणुन निवडणुक लढविणाऱ्या सर्वच उमेदवारांनी सध्या आपल्या प्रचाराची गती वाढविली आहे. त्यामुळे या मतदार संघातील राजकीय वातावरण सध्या ढवळुन निघाले आहे. या मतदार संघातील महयुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी अतिशय नियोजनबद्ध प्रचार यंत्रणा राबवुन प्रचारात आघाडी घेतली आहे. महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ धाराशिव जि.प.च्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी चिकुंद्रा, मानेवाडी व तुळजापुर येथे बैठका घेऊन नागरीकांशी संवाद साधला आहे.

यावेळी बोलतांना त्यांनी म्हटले की लाडक्या बहिणींसाठी मोठी खुशखबर असुन राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आल्यानंतर लाडक्या बहिणींना महिन्याला २१०० रुपये म्हणजे वर्षाला २५००० रुपये मिळणार आहेत. त्याचबरोबर तुळजापुर विधानसभा मतदार संघासह संपुर्ण धाराशिव जिल्ह्याचा कायापालट करण्याची क्षमता राणा जगजितसिंह पाटील यांच्यामध्ये आहे असे अर्चनाताई पाटील यांनी म्हटले आहे.



तुळजापुर विधानसभा मतदार संघातील विकासाचा हा ओघ कायम ठेवण्यासाठी येत्या २० तारखेला मतदारांनी महायुतीला आपापल्या गावांमधुन मोठे मताधिक्य द्यावे असे आवाहन अर्चनाताई पाटील यांनी केले आहे. अर्चनाताई पाटील यांच्या बैठकांना प्रत्येक गांवातुन उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

## भारताचे विद्यापीठ रमाई या महाकाव्याग्रंथाचे प्रकाशन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**

धाराशिव येथे संपादक प्रा. डॉ. अशोक दवणे यांनी संपादित केलेल्या ३६९ कवीच्या रमाईवरील कवितांचं संपादन भारताचे विद्यापीठ रमाई या महाकाव्य ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी झुंज वादळाशी या स्वकथनाच्या लेखिका आशादेवी लष्करे या होत्या त्यांच्या हस्ते या संपादनाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून गोवा इथून आलेल्या सुप्रसिद्ध साहित्यिक मंदाताई सुगीरे व वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्या विद्याताई वाघमारे या उपस्थित होत्या.

त्यांनी या काव्यसंग्रहावर महत्त्वपूर्ण विचार मांडले. खूप मोठ्या परिश्रमाने प्राध्यापक डॉ. अशोक दवणे यांनी रमाईवरील कवितांचे संपादन करून खूप मोठा दस्तावेज वाचकास उपलब्ध करून दिल्याबद्दल अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी त्यांचे त्यांच्या भाषणात कौतुक केले.

या कार्यक्रमांमध्ये स्वरांजली इंगळे, विराज चंदनशिवे, आदर्श चंदनशिवे, नीलम ठोंबरे हे बालकांनी व प्राध्यापक महेंद्र चंदनशिवे, विजय गायकवाड, धनराज सुगिरे यांनी आपले विचार व्यक्त केले.

# दहा वर्षांपासुन रखडला सोलापूर-हैद्राबाद महामार्ग : काम पुर्ण करण्याची गडकरी यांच्याकडून अपेक्षा

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१३ नोव्हेंबर -**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सध्या केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे धाराशिव जिल्हा दौऱ्यावर आहेत, दि. १४ नोव्हेंबर रोजी ना. नितीन गडकरी यांची नळदुर्ग येथे जाहीर सभा आहे. यनिमित्त गेल्या दहा वर्षांपासुन रखडत पडलेल्या सोलापुर-हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाकडे लक्ष देवून ते काम पूर्ण करण्याचे आदेश केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री यांनी द्यावेत अशी अपेक्षा नळदुर्गकरांसह परिसरातून व्यक्त होत आहे.



राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ सोलापुर-हैद्राबाद या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या दहा वर्षांपासुन रखडत पडले आहे. वास्तविकपाहता या कामात कुणाचीही अडकाठी नाही असे असताना केवळ राष्ट्रीय महामार्ग विभाग आणि ठेकेदार यांच्या गलथान तसेच निष्क्रिय कारभारामुळे महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या दहा वर्षांपासुन रखडत पडले आहे. आजही हे काम पुर्ण झाले नाही त्यामुळे याचा फटका नागरीक व वाहनचालकांना मोठ्या प्रमाणात बसत आहे.

हे काम पुर्ण व्हावे यासाठी अनेक गावांतील नागरीकांनी व राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलने केले आहेत तरीही निगरगठ्ठ झालेल्या राष्ट्रीय महामार्ग विभाग व संबंधित ठेकेदार यांनी हे काम पुर्ण केले नाही.याबाबत केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी चौकशी करुन यामध्ये जे दोषी आहेत त्याच्यावर कारवाई करुन हे काम लवकर पुर्ण करण्याचे आदेश देणे गरजेचे आहे.

या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम पुर्ण झाले नाही म्हणुन गेल्या दहा वर्षात खानापुर ते तलमोडपर्यंत झालेल्या ३९० अपघातामध्ये ४२० पेक्षा जास्त नागरीकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तसेच या अपघामध्ये जे जखमी झाले आहेत त्यातील अनेक जणांना कायम स्वरूपाचे अपंगत्व आले आहे. अशी गंभीर परीस्थिती असतांना राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याने राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ सोलापुर-हैद्राबाद हा महामार्ग सध्या वाहन चालकांसाठी मृत्युचा सापळा बनला आहे. सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाची मंजुरी २०१२ मध्ये मिळाली आहे मात्र २०१४ साली प्रत्येक्ष कामास सुरुवात झाली. आज २०२४ हे वर्ष संपत आले आहे तरी या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम पुर्ण झाले नाही. सोलापुर ते तलमोड पर्यंतच्या १०० किलोमीटर कामासाठी ७८० कोटी रुपयाचे बजेट मंजुर झाले होते. दि.३ जुन २०१४ रोजी या कामास सुरुवात करण्यात आली होती. अडीच वर्षात हे काम पुर्ण करणे गरजेचे होते मात्र आज दहा वर्षे झाले तरी हे काम रखडतच पडले आहे. या १०० किलोमीटरच्या महामार्गावरील अनेक कामे आजही अर्धवट अवस्थेत आहेत याला जबाबदार राष्ट्रीय महामार्ग विभाग आणि संबंधित ठेकेदार आहेत. सध्या जे काम सुरु आहे तेही अतिशय संथगतीने सुरु आहे.हे काम पुर्ण झाले नसल्याने आज दररोज अणदुर, नळदुर्ग आणि जळकोट याठिकाणी महामार्गावर मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक जाम होऊन अनेक तास वाहने अडकुण पडत आहेत. त्यामुळे गेल्या दहा वर्षांपासुन रखडत पडलेल्या सोलापुर-हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम तात्काळ पुर्ण करुन घेण्याचे आदेश ना. नितीन गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाला कडक शब्दात देणे गरजेचे आहे. राष्ट्रीय मगामार्गाचे काम कुठलाही अडथळा नसताना दहा वर्षे रखडत पडण्याची देशातील ही पहिलीच घटना असेल. नळदुर्ग शहराच्या बाहेरून बायपास मार्गे हा राष्ट्रीय महामार्ग जात आहे. या महामार्गालगत अतिशय प्राचिन असे श्री खंडोबा देवाचे मंदिर आहे हे ठिकाण श्रीक्षेत्र मैलारपुर या नावाने ओळखले जाते. जानेवारी महिन्यात याठिकाणी मोठी खंडोबाची यात्रा भरते यावेळी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक व तेलंगना या राज्यातील जवळपास ५ ते ६ लाख भाविक याठिकाणी उपस्थित असतात. खंडोबा मंदिराकडे जाण्यासाठी महामार्ग ओलांडुन जावे लागते. मात्र या चौपदरीकरणाच्या कामात भाविक महामार्ग ओलांडुन खंडोबा मंदिराकडे कसे जाणार याची दक्षात राष्ट्रीय मगामार्ग विभागाने घेतली नाही त्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे ना. नितीन गडकरी यांनी याबाबतही राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून याठिकाणी भाविक व नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी कांही उपाययोजना करण्यासाठी आदेश द्यावेत अशी मागणी होत आहे.

# आजपासून बाल कामगार प्रथा विरोधी सप्ताह; विविध कार्यक्रमांचे आयोजन

**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**

१४ नोव्हेंबर बालदिन या दिवसाचे औचित्य साधून १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर दरम्यान बाल कामगार प्रथेविरोधी सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.

यानिमित्ताने जिल्ह्यात जिल्हा कार्यक्षेत्रातील बाल कामगार बहूलक्षेत्र निश्चित करणे, विटभट्टी येथे भेटी देवून तपासणी करणे आणि मालकांकडून/चालकाकडून बालकामगार न ठेवणेबाबतचे हमीपत्र लिहून घेणे, हॉटेल असोसिएशन यांच्या बैठका घेऊन त्यांना सुधारीत बाल कामगार अधिनियमाबाबत माहिती देणे, सर्व व्यवसायातील व्यापारी संघटनाचे एकत्रित चर्चा सत्र घेणे, बाल कामगार प्रथेविरुद्ध बाजारपेठ क्षेत्रात रॅली घेणे, सार्वजनिक ठिकाणी बाल कामगार अधिनियमाबाबत जनजागृती करणे, दुकाने व आस्थापना येथे बाल कामगार कामावर न ठेवण्याबाबत स्टीकर/पॉम्प्लेट तयार करुन प्रदर्शित करणे, मालक संघटनांची बैठक घेऊन तेथे बाल कामगार प्रथेविरुद्ध चर्चा करुन जनजागृती करणे आदि कार्यक्रम या सप्ताहादरम्यान घेण्यात येणार आहे.


**जाहिर प्रगटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणिय/कावि-** **दिनांक १५/१०/२०२४**

समस्त गावकरी मौजे मुरुम ता. उमरगा जिल्हा धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री/श्रीमती शरद सिताराम घोडके रा. मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव राघवेंद्र शरद घोडके सदरील व्यक्तीचा मौजे मुरुम ता. उमरगा या ठिकाणी दि. १६/०२/१९८६ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक १४/०६/२०२४ या रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म - मृत्यू बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित /-**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उमरगा**



**जाहिर प्रगटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणिय/कावि-** **दिनांक १५/१०/२०२४**

समस्त गावकरी मौजे मुरुम ता. उमरगा जिल्हा धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री/श्रीमती शरद सिताराम घोडके रा. मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव प्राजक्ता शरद घोडके सदरील व्यक्तीचा मौजे मुरुम ता. उमरगा या ठिकाणी दि. ०१/०५/१९९३ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक १४/०६/२०२४ या रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म - मृत्यू बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुद्दतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित /-**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उमरगा**



**जाहिर प्रगटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणिय/कावि-** **दिनांक १५/१०/२०२४**

समस्त गावकरी मौजे मुरुम ता. उमरगा जिल्हा धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री/श्रीमती शरद सिताराम घोडके रा. मुरुम ता. उमरगा जि.धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव गायत्री शरद घोडके सदरील व्यक्तीचा मौजे मुरुम ता. उमरगा या ठिकाणी दि. २१/०९/१९९८ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक १४/०६/२०२४ या रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म - मृत्यू बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित /-**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उमरगा**

# महाविकास आघाडीच्या भ्रष्टाचाराचा मटका फोडण्याचा निर्धार करा : ज्योतीरादित्य शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ नोव्हेंबर**

जाती- पाती-धर्माच्या नावाखाली इतिहासाला कलंक लावण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी कडून होत आहे. त्यामुळे या महाविकास आघाडीचा विनाश करण्याची गरज असून जातीपातीचे राजकारण व भ्रष्टाचार करणाऱ्या महाविकास आघाडीच्या या भ्रष्टाचाराचा येत्या २० रोजी मटका फोडण्याचे आवाहन केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी केले. लोकसभा पोट निवडणुकीतील उमेदवार डॉ. संतुक हंबर्डे व भोकर विधानसभेच्या उमेदवार डॉ. श्रीजया चव्हाण यांच्या प्रचारार्थ मालेगाव येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.

या सभेत भाजपाचे प्रभारी विक्रांत सिंग, खासदार अशोक चव्हाण, माजी आमदार अमिता चव्हाण जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, संतोष पांडागळे, उमेदवार श्रीजीया चव्हाण, लोकसभा उमेदवार प्रतिनिधी शिवानी हंबर्डे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले की ,महाराष्ट्रात राहून जनतेच्या आरक्षण, संरक्षणाची भाषा करणारे महाविकास आघाडीतील नेते विदेशात जाऊन मात्र संविधान संपवण्याची भाषा करतात. महाविकास आघाडीतील नेत्यांना गरिबांची शेतकऱ्यांची रोजगारांची



काळजी नाही तर केवळ खुर्चीची काळजी आहे. तर दुसरीकडे महायुती सरकारने माझी लाडकी बहीण योजना, उज्वला योजना, शेतकऱ्यांची कर्जमाफी यासह अनेक लोकाभिमुख योजना राबवल्या आहेत. शेतकऱ्यांच्या खात्यात दरवर्षी १२ हजार रुपये जमा होत आहेत. लाडक्या बहिणीला दीड हजार रुपये मिळत आहेत. नांदेड जिल्ह्यातील आठ लाख २३ हजार महिलांना याचा लाभ होत आहे. तिजोरीची चिंता न करता महायुती सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध योजना राबवत आहे. या योजना कायम चालू ठेवण्यासाठी महायुतीच्या सरकारची आवश्यकता आहे. त्यातच खासदार अशोक चव्हाण यांचा परिवार हा समाजसेवी परिवार आहे. खासदार अशोक चव्हाण यांची तिसरी पिढी समाजसेवेसाठी उतरली असून या तिसऱ्या पिढीचा वटवृक्ष करण्यासाठी नांदेडच्या जनतेने साथ देण्याची गरज आहे. सन १७७१ मध्ये पानिपतच्या लढाईनंतर दिल्लीवर भगवा फडकला होता. तोच इतिहास पुन्हा घडविण्यासाठी शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी महायुतीला साथ द्यावी असे आवाहन केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी यावेळी केले.

**सत्ताधारी पक्षातला खासदार हवा : खा. अशोक चव्हाण**

सध्याची निवडणुकी आगळीवेगळी निवडणूक आहे. लोकसभा पोटनिवडणूक आणि विधानसभेसाठी मतदान होत आहे. केंद्रात महायुतीचे सरकार आहे त्यामुळे विकास कामे करण्यासाठी शिव्या देणारा खासदार नव्हे तर सत्ताधारी पक्षाचा खासदार असला पाहिजे असे मत खासदार अशोक चव्हाण यांनी व्यक्त केले. महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून करोडो महिलांना लाभ मिळवून दिला. या योजनेत कुठलाही भेदभाव केला नाही. यासारख्या असंख्य योजना सरकार राबवत आहे. त्यामुळे जनतेने गप्पा मारणारे सरकार पाहिजे की योजना देणारे सरकार पाहिजे हे ठरविण्याची गरज आहे. महत्वाचे म्हणजे मराठाचा आरक्षणाचा पुरस्कर्ता हा अशोक चव्हाणच आहे. यापुढेही आरक्षणात काही कमतरता राहिली असल्यास ती पूर्ण करून आरक्षण मिळवून घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन यावेळ खासदार अशोक चव्हाण यांनी दिले.

## संक्षिप्त वृत्त



### अनिल कांबळे राज्यस्तरीय दर्पण पुरस्काराने सन्मानित

**मुखेड-** तालुक्यातील खैरका (गोकुळवाडी) येथे विठू माऊली बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या वतीने दि. ७ नोव्हेंबर रोजी अनिल कांबळे सलगरकर यांना राज्यस्तरीय दर्पण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विठू माऊली बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे विठ्ठल बारसमवाड यांच्या वतिने दरवर्षी निर्भीड, निपक्ष सामाजिक काम करणाऱ्या पत्रकारांना राज्यस्तरीय दर्पण पुरस्काराने सन्मानित केले जातो यावर्षी पत्रकार अनिल कांबळे यांना हा पुरस्काराचा बहुमान मिळाला आहे या सन्मानामुळे सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करणारे व मित्र मंडळाच्या वतिने त्यांचे अभिनंद होत आहे. तर यावेळी लघु आळंदी समजली जाणारी येवती येथील मठाधिपती श्री.प.पु. सद्गुरु नराशाम महाराज, ग्रामीण महाविद्यालय वसंत नगर येथील प्रा. डॉ. रामकृष्ण बदने,प्राचार्य धोंडीराम वाडकर, विठू माऊली बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे संस्थापक प्रा. विठ्ठल बरसमवाड, सचिव लेखिका सौ. कल्याणी बरसमवाड, पत्रकार विजय बनसोडे, सुरेश जमदाडे सरपंच विजय मोरे, आदर्श शिक्षक बालाजी जुरावाड,डॉ. दत्तात्रय नकुलवाड,कृषिरत्न सायबु संभाजी शिरबरतळ, बिरादार, गंगाराम अंकमवार, बालाजी आललवाड, नागनाथ नरलावाड,पंढरीनाथ कोंडेवाड, चिमणाजी वलेपवाड,आदर्श माता लक्ष्मीबाई बरसमवाड, शंकुतला वाडकर,सुमनताई मोते, ह.भ.प.दत्तात्रय निमलवाड, हणमंत आटाळकर, दशरथ आयतलवाड व पंचक्रोशीतील भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गुरुद्वारा बोर्ड प्रशासक डॉ.विजय सतबीरसिंघ यांना पदावरून हटविण्याची मागणी

**नांदेड-**येथील सचखंड गुरुद्वारा बोर्डातील भ्रष्ट कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असलेले गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ.विजय सतबीरसिंघ यांना पदावरून हटण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मनबिरसिंघ ग्रंथी यांच्यासह



सहकाऱ्यांनी केली आहे अन्यथा एक डिसेंबर पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. सचखंड गुरुद्वारा बोर्डाच्या प्रशासकपदी दि.११ऑगस्ट २०२३ रोजी डॉ. विजय सतबीरसिंघ यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशासकाच्या नियुक्तीनंतर गुरुद्वारा बोर्डाच्या हिताचे निर्णय घेऊन भाविकांना त्याचा लाभ होईल अशी अपेक्षा होती. परंतु त्यांनी अशा प्रकारचे कोणतेही ठोस निर्णय घेतले नाहीत. याऊलट गुरुद्वारा बोर्डाच्या कर्मचाऱ्यांनी अखंडपाठ सह इतर भ्रष्टाचारांमध्ये सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांना अभय दिले जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या निवेदनामध्ये गुरुद्वारा बोर्डातील अखंड पाठ विभागातील भ्रष्टाचारासह गुरुद्वारा बोर्डाचा इंजिनिअरिंग विभाग असताना महाराजा रणजीतसिंघ यात्री निवासच्या नवीन इमारतीचे काम विना करारनामा व विना ठराव गुरुद्वारा लंगर साहेब निधानसिंघ ट्रस्ट यांना देखील दिले आहे. तसेच गुरुद्वारा बोर्डाचा डोनेशन विभाग असताना देखील ही सेवा देण्याचे काम सदर ट्रस्टला दिले, गुरुद्वारा बोर्डाची जमीन खाजगी एजन्सीला पेट्रोल पंपासाठी देण्याचा निर्णय तसेच सचखंड पब्लिक इंग्लिश स्कूल मधील भ्रष्ट प्राचार्य अनिलकौर खालसा यांच्यावर कारवाई केली नसल्याने डॉ. विजय सतबीरसिंघ यांना पदावरून हटविण्याची मागणी केली आहे. त्याकरिता दि.०१ डिसेंबर २०२४ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. राज्याचे महसूल व वन विभाग अप्पर मुख्य सचिव यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ.अभिजित राऊत यांना दिलेल्या निवेदनावर मनबिरसिंघ ग्रंथी, जगदीपसिंघ नंबरदार, दीपकसिंघ गल्लीवाले, बिरेंद्रसिंघ बेदी, बक्षीसिंघ पुजारी, जगजितसिंघ खालसा, जसपालसिंघ लांगरी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### विनापरवानगी बल्क व्हाईस मेसेज टाकणाऱ्या तीन उमेदवारांना नोटीस

**नांदेड-**निवडणूक काळामध्ये उमेदवारांनी प्रचार साहित्याची पुर्वपरवानगी घेणे निवडणूक आयोगाने बंधनकारक केले आहे. व्हिडीओ, ऑडिओ, बल्क मेसेज, ऑडिओ मेसेज, प्रचाराची रिल, छोटे व्हिडीओ याची परवानगी माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती (एमसीएमसी) कक्षाकडून घ्यावी लागते. मात्र अशा पध्दतीची परवानगी न घेणाऱ्या तीन उमेदवारांना नांदेड उत्तरचे निवडणूक निर्णय अधिकारी ललीतकुमार वऱ्हाडे यांनी नोटीस बजावली आहे. माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती जिल्ह्यामध्ये स्थापन झाली आहे. प्रसारमाध्यमाचा वापर करताना उमेदवारांनी निवडणूक आयोगाचे निर्देश पाळणे आवश्यक आहे. यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार एमसीएमसीची परवानगी आवश्यक आहे. मात्र बल्क व्हाईस मेसेज पाठविणारे निवडणुकीतील उमेदवार संगीता विठ्ठल पाटील, देशमुख मिलींद उत्तमराव, बालाजी देविदास कल्याणकर यांनी परवानगी न घेताच बल्क मेसेज प्रसारित केल्याचे निर्देशास आले आहे. यासंदर्भात जिल्हा माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती, नांदेड यांनी याबाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी ८६-नांदेड उत्तर यांनी अवगत केले. त्यामुळे दि. १२ नोव्हेंबर रोजी या संदर्भातील नोटीस बजावण्यात आली आहे. एमसीएमसी कक्षाची परवानगी न घेता प्रसारित केलेल्या बल्क एसएमएस संदेशासाठी २४ तासाच्या आत खुलासा करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत यांनी उमेदवारांनी मुक्त वातावरणात प्रचार प्रसार करावा, मात्र नियमाचा भंग होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. ईलेक्ट्रानिक्स फॉरमॅटमधील सर्व ऑडिओ, व्हिडीओ साहित्याला परवानगी आवश्यक आहे.

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची माळाकोळी येथे जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १३ नोव्हेंबर**

लोहा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी खासदार प्रतापराव पाटील



चिखलीकर यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्राचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची माळाकोळी येथे जाहीर सभा संपन्न होणार आहे.

लोहा मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ माळकोळी येथील श्री बारा ज्योतिर्लिंग मंगल कार्यालय माळाकोळी येथे दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली आहे. त्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महायुतीच्या कार्यकर्त्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्याच्या मदतीला टपाली मतदान सुविधा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ नोव्हेंबर**

भारत निवडणूक आयोगाने अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी व निवडणूक कामात असलेले कर्मचारी मतदानाच्या दिवशी कर्तव्यावर कार्यरत असल्यामुळे मतदान करु शकत नाहीत. त्यामुळे त्यांना टपाली मतदान करण्याची सुविधा सुलभता केंद्रावर उपलबध करुन देण्यात आली आहे.

या प्रक्रियेतील अंतिम टप्पा सध्या सुरू असून यासाठी सर्व विधानसभा क्षेत्रामध्ये टपाल मतदानाची जबाबदारी असणाऱ्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची लगबग सुरू आहे. वेळेत आणि दिलेल्या तिथीवर ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्यामुळे आता ऑफलाईन आणि ऑनलाईन दोन्ही पद्धतीचा वापर केला जात आहे.

टपाली मतदान करण्यासाठी अधिकारी- कर्मचाऱ्यांना फार्म नं. १२ भरुन यापूर्वीच दिला आहे. यासोबत मतदान कार्ड, झेरॉक्स जोडून फॉर्म भरावा लागतो. तो फार्म महाइलेक्शनवर अपलोड करुन त्यानंतर विवरणपत्र ४ तयार होते. त्यानंतर ते पोस्टल बॅलेट टपाली कक्षात जमा करण्यात येते. नांदेड जिल्हयातील लोकसभा पोटनिवडणूक व नऊ विधानसभा मतदार संघातील अत्यावश्यक सेवेतील अधिकारी, कर्मचाऱ्याचा फार्म नं. १२ पहिल्या ट्रेनिंग मध्ये भरुन घेण्यात आला आहे.

## दुसऱ्याच्या प्रचाराचे गाणे वापरणाऱ्या उमेदवारावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १३ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीमध्ये लोहा मतदारसंघात एका उमेदवाराने दुसऱ्या उमेदवाराचे गाणे वापरल्यासंदर्भात लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रचार साहित्यासाठी माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीची (एमसीएमसी) परवानगी आवश्यक आहे. मात्र ही परवानगी तर घेतलीच नाही उलट नामसाधर्म्य असलेल्या उमेदवारांचे गाणे वापरले तसेच प्रचारात लोकांची दिशाभूल केली. त्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आशाबाई श्यामसुंदर शिंदे यांचे उमेदवार प्रतिनिधी प्रमोद एकनाथ शिंदे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी ८८-लोहा यांना यासंदर्भात तक्रार दिली आहे. लोहा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाच्या आशाबाई श्यामसुंदर शिंदे निवडणूक रिंगणात आहेत. त्यांच्याच नावाशी साधर्म्य असणाऱ्या अन्य अपक्ष महिला उमेदवार आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी शेकापच्या आशाबाई यांच्या प्रचार गीताची कॉपी केली असल्याची तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीमध्ये श्यामसुंदर शिंदे यांनी अपक्ष महिला उमेदवार आशाताई श्यामसुंदर शिंदे हे प्रचार गीत आणि आमचे नेते कै. भाई केशवराव धोंडगे, गुरुनाथ कुरुडे यांचे छायाचित्र प्रचारात वापरत असून गाडी क्र. एमएच २६ एडी ९२८६ महिंद्रा बोलेरो व अन्य गाड्यांद्वारे अपप्रचार करीत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

यासंदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी लोहा यांनी माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडून अहवाल घेतला होता. अपक्ष उमेदवार आशाताई श्यामसुंदर शिंदे निशाणी ट्रक यांनी कक्षाकडून जाहिराती ईलेक्ट्रॉनिक माध्यमाकडून प्रसारित करण्यास परवानगी घेतली नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे प्रचार गाणे विनापरवानगी वापरणे, नेत्यांचे चेहरे व व्हिडीओ प्रचारासाठी वापरणे व त्याद्वारे मतदारांची दिशाभूल करणे यासंदर्भात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १७१, कलम १७४ व कलम २२३ अंतर्गत अज्ञात वाहनचालकाच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## खासदार राहुल गांधी यांची आज नांदेडमध्ये सभा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ नोव्हेंबर**

देशाचे विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांची उद्या दिनांक १४ नोव्हेंबर रोजी शहरातील नवीन मोठा मैदानात सभा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती माजी मंत्री शब्बीर आली यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेत खासदार सुरेश शेटकर, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, शाम दरक, सुरेंद्र घोडजकर, एकनाथ मोरे यांची उपस्थिती होती.

उद्या दि.१४ नोव्हेंबर रोजी शहरातील नवीन मोंढा मैदानात खासदार राहुल गांधी यांची दुपारी दोन वाजता सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेची जय्यत तयारी करण्यात आली असून किमान एक लाख लोकं बसातील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. खासदार राहुल गांधी यांची ही सभा ऐतिहासिक होणार



आहे. नांदेड काँग्रेसचा गड असून सहा विधानसभा, लोकसभा मतदार संघातील उमेदवारांच्या प्रचारार्थ राहुल गांधी मार्गदर्शन करणार आहेत. समाजसेवेसाठी वाहून घेतलेला गांधी परिवार आहे. गांधी परिवार जे बोलतो ते करून दाखवतो. तर दुसरीकडे महायुतीचे सरकार केवळ आश्वासने देत असून विधान वाचवण्यासाठी आरक्षण वाचविण्यासाठी तसेच विकासासाठी महाविकास आघाडीची आवश्यकता असून राहुल गांधी यांच्या सभेत लाखोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शब्बीर आली यांनी दिले.

## सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांची सभा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ नोव्हेंबर**

नांदेड रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांची १६ नोव्हेंबर रोजी सभा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती रिपब्लिकन सेनेचे



लोकसभेचे उमेदवार प्रा. राजू सोनसळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शहरातील इंदिरा गांधी मैदानात ही सभा आयोजित करण्यात आली आहे. त्याचबरोबर १४ रोजी भीमघाट ,१५ रोजी श्रावस्ती नगर, १७ रोजी जय भीम नगर तर १८ नोव्हेंबर रोजी आंबेडकर नगर येथेही सभा आयोजित करण्यात आल्या असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

घराणेशाही विरोधात ही निवडणूक असून या निवडणुकीत चळवळीतील कार्यकर्ता खंबीरपणे उभा असल्याने या उमेदवाराला साथ देण्यासाठी राष्ट्रीय जन विकास सेना पक्ष व बहुजन लोकन्याय संघ यांनी पाठिंबा दिला असल्याचे यावेळी प्रा. राजू सोनसळे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस राष्ट्रीय जनविकास पक्षाचे ॲड. शिवराज कोहळीकर, अनिल शिरसे, रवी हडसे प्रतिक मोरे, बहुजन लोकनायक संघाचे संस्थापक राहुल चिखलीकर यांची उपस्थिती होती.

## प्रधानमंत्री मोदींच्या नेतृत्वामुळे देशात बदल घडतोय : पियुष गोयल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ नोव्हेंबर**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाची तिसऱ्या जागतिक महासत्तेकडे वाटचाल सुरू असून मोदींच्या नेतृत्वामुळे देशात बदल घडत असल्याचे मत केंद्रीय वाणिज्य मंत्री व उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी व्यक्त केले.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीतील महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित बैठकीत ते बोलत होते.

यावेळी बोलताना केंद्रीय मंत्री पियुष गोयल म्हणाले की, मोदींच्या नेतृत्वामुळे देशात बदल घडत आहे, येत्या २०४७ मध्ये देश संपूर्ण विकसित भारत असेल. बदलत्या विकसित भारतात नांदेडचा सहभाग असला पाहिजे यासाठी भाजपा महायुतीचे लोकसभेचे उमेदवार डॉ. संतुक हंबर्डे व विधानसभेतील





महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याची गरज आहे. उमेदवार उच्च विद्या विभूषित आहेत. त्यांना शैक्षणिक सामाजिक जाणीव आहे. त्यामुळे गतिमान नांदेडसाठी डॉ. संतुक हंबर्डे यांना लोकसभेत खासदार म्हणून पाठवण्याची गरज आहे. उच्चशिक्षित युवकांना नांदेडमध्ये रोजगार मिळाला पाहिजे त्यासाठी नांदेडमध्ये कौशल्य विकास यावर आधारित उद्योगाला महायुती चालना देणार आहे. गेल्या निवडणुकीत झालेली चूक सुधारण्याची संधी मतदारांना असून कोणताही भेदभाव न ठेवता महायुतीच्या उमेदवाराला विजयी करावे असे आवाहन यावेळी केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी केले.

या बैठकीस माजी खासदार हेमंत पाटील, नांदेड दक्षिणचे उमेदवार आनंद तिडके, माजी आमदार पाशा पटेल, प्रवीण साले, दत्तात्रय पईतवार, डॉ. महेश तळेगावकर, हर्षद शहा, भाजप व्यापारी आघाडीचे प्रदेश जिल्हाध्यक्ष प्रेमकुमार फेरवाणी, शितल खांडील, दीपक मोरताळे, दीपक गोयंका, नरेश गोयंका, अली पंजवाणी , गंगाविशन कांकर, जयेश ठक्कर, केतन नागडा, नरेंद्र परवाणी आदी उपस्थित होते.

## शिवतांडव स्त्रोत पठण व प्रबोधनात्मक मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड ,दि. १३ नोव्हेंबर**

पवित्र हिंदू समाजाला एकत्र आणण्यासाठी आणि जातीयवादाचे ओझे दूर करत हिंदुत्वाला बळ देण्यासाठी श्री कालीपुत्र कालीचरण महाराज यांचे १६ नोव्हेंबर २०२४ रोजी सायं ६.०० वाजता नांदेड शहरातील मल्टीपर्पज मैदान, वजिराबाद येथे शिवतांडव स्त्रोत पठण व प्रबोधनात्मक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी या धर्म जागरण कार्यक्रमाला नांदेड जिल्ह्यातील सर्व युवक-युवती, हिंदुत्व प्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन महंत सौम्यभारती महाराज विष्णुपुरी यांनी केले आहे.

जातिवाद तोडा, हिंदुत्व जोडा या माध्यमातून हिंदू समाजाच्या ऐक्याचा आणि धर्म जागरणाचा संकल्प करत संपूर्ण भारतभर कालीपुत्र कालीचरण महाराज यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन नांदेडकरांना ऐकायला मिळणार आहेत. त्यांच्या या प्रेरणादायी विचारांनी अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविले असून आपल्या हिंदू समाजाच्या उन्नतीसाठी धर्म जागरण महासभेचे आयोजन केले असल्याने अनेक दिवसापासूनची नांदेडकरांची उत्सुकता पूर्ण होणार आहे. हिंदू समाजाला जातीवाद, भाषावाद, प्रांतवाद, पंथवाद आणि सांप्रदायिकतेपासून मुक्त करून, एका अस्मितेने एकत्रित आणणे आणि राष्ट्रवादासाठी सज्ज करणे हा या महासभेचा उद्देश आहे.

## गावोगावी वाडीतांड्यत कमळच फुलणार : बालाजी आलेवार

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर, दि. १३ नोव्हेंबर**

केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता आहे. सत्तेच्या काळात आमदार भिमराव केराम यांनी या भागातील सर्व प्रकारच्या विकासाची कामे पुर्ण केली आहेत. त्यामुळे जनतेचा, आमदार केरामांना अफाट प्रतिसाद मिळत आहे. आता उर्वरीत राहिलेल्या विकासाची कामे आगामी पाच वर्षांत पूर्ण करून विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी जनतेंनी शिवसेना भाजपा मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार भिमराव केराम यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे, असे अवाहन भाजपा चे तालुका अध्यक्ष बालाजी आलेवार यांनी केले.

इस्लापूर, शिवणी, अप्परावपेठ, मलकजाम सह ग्रामीण भागातील अनेक गावात बालाजी आलेवार यांनी भेटी देऊन कॉर्नर बैठका घेतल्या. या दरम्यान पुढे बोलतांना बालाजी आलेवार म्हणाले की, भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसव माजी मंत्री तथा ओबीसी नेत्या विधान परिषदेच्या आमदार पंकजाताई मुंडे यांच्या जाहीर सभा झाल्या आहेत. महायुतीच्या कार्यकर्त्यात आता उत्साहाचे वातावरण संचारले आहे. मुख्यमंत्र्याच्या लाडक्या बहिणीने तर आमदार भिमराव केराम यांचे नाव सोडून दुसऱ्याचे नाव ही घ्यावयास तयार नाहीत. लाडक्या भावाने दिवाळीची ओवाळणी दिवाळीच्या अगोदरच दिली. त्यामुळे आता लाडक्या बहिणींनी आमदार भिमराव केराम यांना निवडून देण्याचा आता विडाच उचलला आहे.

मतदार राजा बंधू, भगिनींनी आमदार भिमराव केराम यांच्या पारड्यात आपले अमूल्य असे मत टाकून त्यांना प्रचंड बहू मतांनी विजयी करावे, असे आवाहन तालुका अध्यक्ष बालाजी आलेवार यांनी केले.

## मुदखेड शहराच्या विकास कामासाठी मी सदैव तयार : खा.अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १३ नोव्हेंबर**

भोकर विधानसभा ॲड. श्रीजया चव्हाण व नांदेड लोकसभा डॉ. संतुक हंबर्डे यांच्या प्रचारार्थ माजी मुख्यमंत्री अशोराव चव्हाण यांनी कॉर्नर बैठकी भीमनगर, खुरेशी गल्ली, साठे नगर, मराठा गल्ली अशोका यासह इतर ठिकाणी जाऊन नागरिकांना मुदखेड शहरात आजपर्यंत झालेला विकास आणि प्रलंबित असलेले विकास कामांवर नागरिकांशी चर्चा केली.

यावेळी बोलताना खा. अशोक चहिाण म्हणाले कि, महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेत महिलांना लाभ, वयोश्री, व मोफत अन्नधान्य योजना व वर्षात तीन मोफत गॅस सिलेंडर आशा अनेक योजना आपल्या महायुती सरकारने लागु केल्या आहेत आणि आशा बऱ्याच योजना पुढे पण चालुच ठेवणार आहे त्यामुळे महायुतीचे लोकसभा उमेदवार



डॉ. संतुक हाबंर्डे व भोकर विधानसभेचे उमेदवार ड श्रीजया चव्हाण यांना आपले बहुमूल्य मतदान देऊन विजयी करा तुमच्या वार्डातील व शहरातील प्रलंबित सर्व विकास कामे पूर्ण करण्यासाठी मी सदैव तयार राहणार आहे. मी सहा वर्षे खासदार राहणार असुन आपल्या शहराच्या विकासासाठी मी कमी पडणार नाही असे मत त्यांनी व्यक्त केले.

या कॉर्नर बैठकी दरम्यान माजी नगरसेविका वैशाली रावसाहेब चौदंते, माजी नगरसेविका कमलबाई भगवानराव कांबळे, यांनी खा. अशोक चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रावसाहेब चौदंते, माजी नगराध्यक्ष देविदास चौदंते, खुर्शीद सेठ, शंकर शेठ राठी, माजी नगरसेवक चांदु बोकेफोड, शहर अध्यक्ष संजय सोनटक्के,रामसिंग चव्हाण, ऋषीकेश पारवेकर,साजिद कुरेशी, महम्मद नवाज कुरेशी, जुनेद अली अकबर कुरेशी, हमीद भाई भंगारवाले, अलिम कुरेशी, नशिर कुरेशी, यांच्यासह अनेक भाजप कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

CMYK

# लातूर दिनांक

**लातूर तरुण भारत**, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## लातूर सिटी रिपोर्ट कार्डचे मल्लिकार्जुन खर्गे यांच्या हस्ते विमोचन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १३ नोव्हेंबर-**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर शहरातील दयानंद कॉलेज मैदानावर महाविकास आघाडीची प्रचार सभा संपन्न झाली.

या सभेत लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचा कार्य अहवाल लातूर रिपोर्ट कार्डचे ऑनलाईन विमोचन करण्यात आले. गेल्या पाच वर्षात २४०० कोटींची विकासकामे करण्यात आली आहेत. या सर्व कामाचा आढावा मांडणारे



लातूर सिटी रिपोर्ट कार्डचे विमाचन अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या हस्ते करण्यात आले.



### संक्षिप्त वृत्त...



## डॉ. शंकर कल्याणे यांना राज्यस्तरीय कार्यनिष्ठ शिक्षक पुरस्कार प्रदान

**निलंगा, दि. १३ नोव्हेंबर-**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ.शंकर हणमंतराव कल्याणे यांना कर्मयोगी कै.ड.देविदासराव जमदाडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने 'राज्यस्तरीय कार्यनिष्ठ शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. लातूर येथील जयक्रांती महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित पुरस्कार वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सूर्यनारायण रणसुभे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध व्याख्याते डॉ.राजशेखर सोलापुरे हे उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य प्रशांत घार, प्राचार्य डॉ.श्रीधर कोल्हे, डॉ.संतोष जमदाडे,डॉ. संजय जमदाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.शंकर कल्याणे यांच्या प्रस्तुत यशाबद्दल शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपसचिव पंकज बियाणी, सर्व संचालक मंडळ व संस्था सदस्य, माजी प्रा.महेंद्र गिरी, प्रा. सुरेंद्र पाटील, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.विजयकुमार पवार, मराठी विभागातील डॉ.अशोक नारनवरे व प्रा. बलभीम सातपुते, प्रा.रवींद्र अंबुलगे, डॉ.विनोद जाधव, डॉ.प्रदीप पाटील, डॉ.सचिन हंचाटे, संजीवकुमार होसुरे यांनी अभिनंदन केले.

## गोविंदाच्या पायाची फिजिओथेरपी; लातूरच्या विद्यार्थिनीला मिळाली संधी

**औसा, दि. १३ नोव्हेंबर-**

शिक्षणानंतर मुंबई येथे नामांकित दवाखान्यात काम करीत असलेल्या हासेगाव संकुलातील लातूर कालेज आफ फिजिओथेरपी महाविद्यालयातील विद्यार्थिनी सुश्मिता महापलेने प्रख्यात सिने अभिनेता गोविंदा यांच्या पायावर फिजिओथेरपी उपचार केले असून सर्वत्र कौतुक होत आहे. हासेगाव येथील श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयातून सुश्मिता महापले विद्यार्थिनीने २०१८ मध्ये शिक्षण पुर्ण केले.यानंतर मुंबई येथील नामांकित दवाखान्यात वैद्यकीय सेवा सुरु केली. याकाळात प्रख्यात सिने अभिनेता गोविंदा यांच्या पायाची फिजिओथेरपी उपचार करण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर केलेल्या उपचारावर अभिनेता गोविंदा समाधान व्यक्त केले आहे.तसेच सिने अभिनेता गोविंदा यांनी सुष्मिताचे कौतुक तोंड भरून केले आहे.यामुळे लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी लातूर चे विद्यार्थी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात नामांकित हॉस्पिटलमध्ये चांगल्या पद्धतीने आपले कार्य करत आहेत. या कार्याचे संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, माधुरी बावगे, प्राचार्य डॉ. वीरेंद्र मेश्राम आदी शिक्षकांनी सुष्मिता महापले या विद्यार्थिनीचे अभिनंदन केले.






## रामनाथ विद्यालयातील विद्यार्थ्यांचा २४ वर्षानंतर गेट टूगेदर

**औसा, दि. १३ नोव्हेंबर-**

शालेय जिवनातील आठवणींना उजाळा देण्यासाठी तालुक्यातील आलमला येथील रामनाथ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी २४ वर्षानंतर एक दिवसाचा गेट टूगेदर करीत आठवणींना उजाळा दिला. मित्र व गुरुजनांच्या भेटी गाठीनंतर स्नेहभोजन करुन एकमेकांना शुभेच्छा देत निरोप घेतला. विद्यालयाच्या प्राचार्य अनिता पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या या उपस्थित होत्या. माजी प्राचार्य शिवाजीराव मुळे, एस एस बिराजदार प्रा.अशोक कदम प्रा. अशोक अभंगे, पर्यवेक्षक पी सी पाटील, क्रीडा शिक्षक रंगनाथ आंबुलगे यांची प्रमुख उपस्थिती होती. सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ज्ञानर्जन केलेल्या आजी-माजी शिक्षकांचा शाल, श्रीफळ पुष्पहार आणि एक सुंदर लेखनिक देऊन उपस्थित विद्यार्थ्यांनी सत्कार केला.यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपण सध्या कोणत्या क्षेत्रात काय करत आहोत. भास्कर सूर्यवंशी यांनी सुत्रसंचालन केले. तरे आभार अभियंता आशिष संभाजी बिरादर यांनी मानले. सर्वातर्फे विद्यालयाचे आभार व्यक्त केले. सौ अमरजा उकरडे, शंभू धाराशिवे , ईश्वर वाडकर, युवराज पाटील, फयाज फाजल, श्याम कोकाटे, नरसिंग पंडगे व आजी माजी सर्व कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. शरण धाराशिवे ,सुभाष भोसले, सचिन खराबे ,सुनील अपसिंगेकर, महादेव सूर्यवंशी, महेश कोरे ,दिलीप बिराजदार, हावगिराव मोरगे, प्रेमला किडीले रेश्मा कुंभार जयश्री कदम, शिवकन्या निलंगेकर शुभांगी हुरदळे ज्योती कुंभार यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला होता. स्नेहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# विरोधकांनी केलेले आरोप हास्यास्पद : आ. पवार

**तभा वृत्तसेवा,**
**औसा दि. १३ नोव्हेंबर-**

विरोधी उमेदवाराकडे मतदारासमोर जाऊन मते मागण्यासारखे कांहीच शिल्लक नाही. माझ्यावर आणि माझ्या कुटुंबियांसह कार्यकर्त्यांवर बिनबुडाचे बेछूट आरोप करीत आहेत. कष्ट करून जिद्दीने कोणी मोठे होत असेल तर त्याचा मला आनंद आणि अभिमान आहे. पण स्वताःच्या पुतण्यालाही मोठे करता आले नाही. ते कार्यकर्त्यांना काय मोठे करणार. बिनबुडाचे आरोप करताना एक सायकलचे पंक्चर काढणारा फॉर्च्युनरमधून कसा फिरतो. कोट्यवधींचा मालक कसा होतो हे सर्वांनाच माहीत आहे. आणि केलेले आरोप हास्यास्पद आहेत. या निवडणुकीत स्वताःला स्वताःच्या पराभवाची चाहूल लागल्याने भांबावून खोटं बोल पण रेटून बोलत आहात. ज्या कंपन्या आणि मालमत्तांच्या चिटोऱ्या दाखवीत माझ्यावर आरोप केले जात आहे. त्या कंपन्यात एक रुपयाचाही व्यवहार मी आणि माझ्या कुटुंबाने केला नाही. असा पलटवार भाजप महायुतीचे उमेदवार आमदार अभिमन्यू पवार यांनी करुन महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी केलेले आरोप फेटाळून लावले.



औसा येथे बुधवार दि. १३ रोजी अनेक जणांनी पक्षप्रवेश केला.त्यावेळी उपस्थित भाजपसह महायुतीच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना आ.अभिमन्यू पवार बोलत होते. कासारशिरशी येथे मंगळवार दि. १२ रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार दिनकर माने यांनी गंभीर आरोप करीत प्रापर्टीची कागदपत्रे दाखवली होती. अशा आरोपाचे खंडन करुन ज्या प्रापर्टी व कंपन्याचे दाखले देऊन आरोप केले आहेत. ते साफ खोटे असल्याचे आ. पवार यांनी यावेळी सांगितले. माझ्या कार्यकर्त्यांनी निर्व्यसनी राहून मोठ्या कष्टाने, मेहनतीने प्रगती केली आसेल तर यात वावगे काय? असा सवालही उपस्थित करुन एक सायकलीचे पंम्चर काढणारा माणूस आज कोट्यावधी रुपयांची प्रापर्टी गोळा करुन फॉर्च्युनर मध्ये फिरतो.त्यांच्याकडे कोट्यावधी रुपयांची संपती कोठून आली. हा खरा संशोधनाचा विषय आहे.

ज्या कंपन्यात माझे, माझ्या पत्नीचे व मुलाचे नाव आहे त्यामध्ये आम्ही एक रुपयाचाही व्यवहार केलेला नाही. कार्यकर्ते कंपनी स्थापन करून मोठे होत असतील तर मला याचा अभिमानच आहे.विरोधकांनी पतसंस्था स्थापन करून कोट्यवधी रुपयांचा गफळा केला. अनेक गरीब कुटुंबाची जमीन लिहून घेऊन त्यांना व्याजात बुडविले. कार्यकर्त्यांना चांगले शिकविण्यापेक्षा त्यांना दारूच्या व्यसनात गुंतवले.मी माझ्या कार्यकर्त्यांना व लोकांना लागणारे साहित्य देऊन भजनाचा फड दाखविला.तर तुम्ही तमाशाचा फड दाखविला आहे. लातूर औसा मार्ग कोणी आणि कशासाठी अडविला होता याची सर्वांना माहिती आहे.

गुत्तेदाराला कमिशन मागितल्याने काम रखडले होते. आणि या रोडवर जवळपास शंभर ते दीडशे लोकांचा अपघातात बळी गेला होता. त्या अपघातात दगावलेल्या कुटुंबाचा तळतळाट तुम्हाला लागल्याशिवाय राहणार नाही. जो माणूस स्वताःच्या पुतण्याला मोठे करू शकला नाही. तो कार्यकर्त्यांना काय मोठे करणार. असा टोला आ. पवार यांनी माजी आ. माने यांना लगावला. माझ्याकडे संयम आहे म्हणून कोणी त्याला कमजोरी समजून काहीही बेताल वक्तव्य करीत असेल तर यापुढे जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा त्यांनी यावेळी दिला आहे.

## गृह मतदानामध्ये पहिल्याच दिवशी ९४ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १३ नोव्हेंबर-**

भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग नागरिकांना गृह मतदानाची (होम वोटिंग) सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ही सुविधा ऐच्छिक असून गृह मतदानाचा विकल्प दिलेल्या मतदारांचे मतदान करून घेण्यासाठी सोमवारी लातूर ग्रामीण मतदारसंघात पहिली फेरी पार पडली. यामध्ये पहिल्याच दिवशी ९४ टक्के मतदारांचे गृह मतदान पूर्ण झाल्याची माहिती लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी संदीप कुलकर्णी यांनी दिली.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील ८५ वर्षांवरील ज्येष्ठ मतदार आणि दिव्यांग मतदारांचे गृह मतदान करून घेण्यासाठी २४ पथके गठीत करण्यात आली होती. या पथकांनी पहिल्या टप्प्यात आपल्याला नेमून दिलेल्या गावात जावून मतदान प्रक्रिया पूर्ण केली. पहिल्या टप्प्यात २९३ ज्येष्ठ मतदार आणि ६० दिव्यांग मतदारांचे गृह मतदान करण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार मतदान पथकांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे पालन करून घरोघरी जावून मतदान प्रक्रिया पूर्ण करून घेतले. पहिल्याच दिवशी २७३ ज्येष्ठ मतदार आणि ५९ दिव्यांग मतदार असे एकूण ३३२ मतदारांचे मतदान करून घेण्यात आले असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी कुलकर्णी यांनी सांगितले.




## औसा विधानसभा निवडणूक प्रशिक्षणास २९ जणांची दांडी

**औसा दि.१३ नोव्हेंबर-**

विधानसभेच्या निवडणुकीच्या पाश्वभुमीवर औसा विधानसभा मतदारसंघाची निवडणुकीचे मतदान (दि.२०) रोजी होणार आहे. यानिमित्ताने निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे व सहाय्यक निवडणुक अधिकारी तथा तहसिलदार घानशाम अडसुळ यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या करण्यात दोन दिवशीय प्रशिक्षण शिबीरास १३७६ पैकी १३४७ कर्मचारी अधिकारी हजर होते तर २९ जणांनी दांडी मारली आहे.

औसा विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी यांचे दोन दिवशीय व दुसरे प्रशिक्षण निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कोरडे व सहाय्यक निवडणूक अधिकारी घनश्याम अडसूळ यांच्या उपस्थितीत आलमला येथील विश्वेश्वरय्या शैक्षणिक संकुलात घेण्यात आले. लोकशाही उत्सवाच्या मतदान प्रक्रियेत सहभागी असलेले अधिकारी, शिक्षक कर्मचारी यांनी तत्परतेने व पारदर्शीपणाने काम पहात दोन दिवशीय प्रशिक्षण पुर्ण केले. भारत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयोग अधिकारी, महाराष्ट्र राज्य व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निर्देशानूसार आलमला येथील विश्वेश्वर शैक्षणिक संकूलातील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला व विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालय, आलमला येथे दोन दिवशीय प्रक्षिक्षण झाले. अभिरुप मतदान केंद्राचे नियोजन करुन सर्व मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व कर्मचारी यांना क्लासरुम ट्रेनींग पीपीटीद्वारे मतदान केंद्र कसे असावे हे दाखविण्यात आले. तसेच फॅसिलेशन सेंटर ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल, आलमला येथे उभारण्यात आले होते. त्यामध्ये १०४६ कर्मचाऱ्यापैकी ८५४ कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष मतदान केले. याप्रसंगी लातूर जिल्ह्याचे निवडणूक निरीक्षक, ओडिसा येथील लक्ष्मिकांत पैरलाल प्रधान साहेबांनी प्रशिक्षणास भेट दिली. यावेळी उपविभागीय अधिकारी, औसा-रेणापूर तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, औसा विधानसभा मतदार संघ - अविनाश कोरडे, तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी घनश्याम अडसूळ, अप्पर तहसीलदार कासारशिरसीचे शिवाजी कदम, तहसीलदार वर्षा मनाळे, गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे, नायब तहसीलदार मुस्तफा खोरे, सुरेश पाटील, अजय पाटील, साहेबराव घोडके यांनी प्रशिक्षण शिबीर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला होता.

## उदगीर, निलंगा विधानसभा मतदारसंघात आजपासून 'होम वोटिंग'

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १३ नोव्हेंबर-**

भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांवरील ज्येष्ठ मतदार आणि दिव्यांग मतदारांना गृह मतदानाची (होम वोटिंग) सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील गृह मतदानाची प्रक्रिया सोमवारी झाली. तसेच उदगीर, निलंगा विधानसभा मतदारसंघात १४ नोव्हेंबर रोजी गृह मतदान प्रक्रियेस सुरुवात होणार आहे. तसेच लातूर शहर आणि औसा विधानसभा मतदारसंघात १५ नोव्हेंबर २०२४ पासून गृह मतदान सुरु होईल.

८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग नागरिकांना गृह मतदानाची (होम वोटिंग) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून ही सुविधा ऐच्छिक आहे. गृह मतदानाचा विकल्प दिलेल्या मतदारांचे मतदान करून घेण्यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय मतदान पथके स्थापन करण्यात आली आहेत. मतदानाच्या गोपनीयतेचा भंग होवू नये, यासाठी मतदान पथकातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच मतदान प्रक्रियेची पाहणी करण्यासाठी प्रत्येक मतदान पथकामध्ये एक मायक्रो ओब्जर्व्हर (सूक्ष्म निरीक्षक) नियुक्त करण्यात आला आहे.

लातूर ग्रामीण मतदारसंघात पहिल्यात टप्प्यातील गृह मतदान ११ नोव्हेंबर रोजी झाले असून १५ नोव्हेंबर २०२४ रोजी दुसरा टप्पा होणार आहे. लातूर शहर विधानसभा मतदारसंघात १५ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ रोजी गृह मतदान करून घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अहमदपूर विधानसभा मतदारसंघात १५ नोव्हेंबर, १६ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ रोजी, तर उदगीर विधानसभा मतदारसंघात १४ नोव्हेंबर, १५ नोव्हेंबर आणि १६ नोव्हेंबर २०२४ रोजी गृह मतदान होत आहे. निलंगा विधानसभा मतदारसंघात १४ नोव्हेंबर, १५ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ रोजी गृह मतदान होईल. तसेच औसा विधानसभा मतदारसंघात १५ नोव्हेंबर, १६ नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे.

## प. पु. माधवानंद महाराज लातुरात

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १३ नोव्हेंबर-**

उमरखेड संस्थानचे मठाधिपती प. पु. माधवानंद महाराज हे दि. १६ ते २४ नोव्हेंबर या कालावधीत लातूर येथे कमलाकरराव दैठणकर, मंत्रीनगर यांच्या निवासस्थानी मुक्कामी आहेत. प. पु. माधवानंद महाराज यांचे दि. १६ नोव्हेंबर रोजी सायं. ५ वाजता नाईक चौक येथे आगमन होईल. शोभायात्रेने त्यांचे स्वागत करून कमलाकरराव दैठणकर यांच्या निवासस्थानी मुक्कामी राहतील. दि. १७ नोव्हेंबरपासून दररोज लातूर शहर तथा जिल्ह्यातील भक्तांच्या वतीने पाद्यपुजा व पुडीचे आयोजन करण्यात आले आहे. प. पु. माधवानंद महाराज यांच्या संस्थानच्या नियमानुसार दररोज धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील तथा परिसरातील भक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# संभाजीराव पाटलांना आमदार करा; ते मंत्री म्हणून काम करतील

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरीः देवणी येथे प्रचार सभा

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. १३ नोव्हेंबर-**

आ.संभाजीराव पाटील निलंगेकर हे कार्यसम्राट आमदार आहेत.ते युवा असून त्यांच्याकडे काम करण्याची अफाट शक्ती आहे. एक प्रभावी आमदार अशी त्यांची ओळख आहे.त्यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करत आमदार करा.निवडणुकी नंतर केवळ आमदार नाही तर मंत्री म्हणून ते काम करतील. संभाजीरावांना मंत्रिपद मिळण्याची हमी मी घेतो,असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. मतदारसंघातील रेल्वेमार्गासाठी आपण आ. निलंगेकरांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

निलंगा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या प्रचारार्थ देवणी येथे आयोजित जन स्वाभिमान सभेत गडकरी बोलत होते.

या सभेस आ.शरणू सलगर, माजी खासदार रुपा पाटील-निलंगेकर व सुनिल गायकवाड, वीरुपाक्ष महाराज मुखेडकर, माजी आमदार गोविंद केंद्रे व प्रकाश खंड्रे, प्रदेश सचिव अरविंद पाटील-निलंगेकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप देशमुख, तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे, मंगेश पाटील, कुमोद लोभे, शिवानंद हैबदपुरे, शिवसेना उपजिल्हा प्रमुख सुधीर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी बोलताना नितीन गडकरी म्हणाले की, लोकशाहीत बदल घडविण्यासाठी योग्य धोरण आणि नीतीची गरज असते. केंद्र आणि राज्य सरकारकडून गरीब कल्याणाच्या योजना राबविल्या जात आहेत.सरकारने प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून गावे एकमेकांशी जोडली.सरकारची ही प्राथमिकता आहे.काँग्रेसला ६० वर्षात जे करता आले नाही ते आम्ही १० वर्षात करून दाखवले. भारताला विश्वगुरू बनवणे हे आपले ध्येय आहे. भ्रष्टाचार मुक्त भारत,ग्रामीण व कृषीमध्ये अग्रेसर भारत निर्माण करण्यासाठी आम्ही काम करत आहोत. लातूर-गुलबर्गा रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्यात लक्ष घालावे अशी मागणी करत देवणी गोवंशाचे संवर्धन व्हावे तसेच हंचनाळ ते धनेगाव व राणी अंकुलगा येथील पुलांना मंजुरी देण्याची मागणी आ. निलंगेकर यांनी आपल्या भाषणात केली.

निलंगा मतदारसंघात वारकरी संप्रदायाचे लोक राहतात परंतु बाभळगावातून येथे विष पेरणीचे काम केले जात आहे. हप्ते व खंडणी घेणाऱ्यांना आपले मत देणार का ? असा सवाल करत ही लढत महायुती विरुद्ध बाभळगाव अशी होणार असल्याचे आ.निलंगेकर म्हणाले. मुलीचे लग्न करताना आपण निर्व्यसनी मुलगा पाहतो. त्याच पद्धतीने योग्य उमेदवार पाहून मतदान करा,असे आवाहनही आ.निलंगेकर यांनी केले.

### महात्मा बसवेश्वर पुतळा न हलवण्याच्या सूचना दिल्या

लातूर शहरातील महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा हलवण्यास विरोध असताना आ.संभाजीराव पाटील शिष्टमंडळ घेऊन माझ्याकडे आले होते. हा पुतळा न हलविण्याच्या सूचना आ. निलंगेकर यांच्यामुळेच आपण दिल्याचेही गडकरी म्हणाले. आ. संभाजीराव पाटील निलंगेकर हे दमदार आमदार आहेत.ते कार्यसम्राट, मराठवाड्याचे दमदार नेते व महाराष्ट्रातील कार्यक्षम युवा नेते आहेत.त्यांची कार्यपद्धती उत्तम असून काम करण्याची क्षमता त्यांच्यात आहे. म्हणून मी पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभा आहे,असे ना. गडकरी म्हणाले.